# १

## आत्मकथन : एक साहित्यप्रकार

**घटक रचना :**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ विषय विवेचन

- १.३.१ आत्मकथन संकल्पनेचा अर्थ
- १.३.२ चरित्र - आत्मचरित्र - आत्मकथन यातील भेद
- १.३.३ आत्मकथन साहित्यप्रकाराचे स्वरूप
- १.३.४ दलित आत्मकथनांची वैशिष्ट्ये
- १.३.५ आत्मचरित्र, आत्मकथन यांच्या व्याख्या
- १.३.६ आत्मकथन लेखनामागील प्रेरणा
- १.३.७ आत्मकथन साहित्यप्रकाराचे घटक
- १.३.८ आत्मकथन साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये, गुणधर्म
- १.३.९ मराठी साहित्यातील काही महत्त्वाची आत्मकथने

१.४ समारोप

१.५ संदर्भग्रंथ सूची

१.६ संभाव्य प्रश्न

munotes.in

## १.१ उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

- आत्मकथन संज्ञेचा अर्थ समजून घेता येईल.
- चरित्र - आत्मचरित्र - आत्मकथन यातील भेद अभ्यासता येईल.
- आत्मकथन साहित्यप्रकाराचे स्वरूप अभ्यासता येईल.
- आत्मकथन लेखनामागील प्रेरणा समजून घेता येईल.
- आत्मकथन साहित्यप्रकाराच्या घटकांचा अभ्यास करणे शक्य होईल.

- दलित आत्मकथनांची वैशिष्ट्ये अभ्यासता येतील.
- आत्मकथन साहित्यप्रकाराची वैशिष्टये, गुणधर्म अभ्यासणे सोपे होईल.
- मराठी साहित्यातील काही महत्त्वाच्या आत्मकथनाचा आढावा घेता येईल.

## १.२ प्रस्तावना

कथा, कादंबरी, नाटक, कविता, प्रवासवर्णन या साहित्य प्रकाराप्रमाणे आत्मचरित्र-आत्मकथन हा महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. मराठीमध्ये आत्मपर लेखनाची परंपरा जुनी आहे. संत नामदेव, संत तुकाराम, बहिणाबाई यांच्यापासून ही परंपरा असलेली दिसून येते. पण त्याचे स्वरूप पद्यात्मक होते; पण खऱ्या अर्थाने आत्मचरित्राची सुरुवात झाली ती एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर. व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांनी 'आत्मकथन', 'आत्मचरित्र', 'आत्मकथा' या शब्दांनी ही सुरुवात केली.

'आत्मकथन' हा मराठीतील गद्यात्मक साहित्यप्रकार आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आत्मकथनपर लेखनाला सुरुवात झाली. आत्मकथन हा मानवी स्वभावाचे आणि जीवनदर्शनाचे सामर्थ्य असणारा साहित्यप्रकार आहे. स्वत:च्या जीवनाचे कथन करणे यालाच 'आत्मकथन' असे म्हणतात. आत्मकथन हा व्यक्तीप्रधान साहित्यप्रकार आहे. हा व्यक्तीप्रधान साहित्यप्रकार असला तरी लेखकाने स्वकथनासोबतच त्याच्या भोवतालची माणसे, त्यांचे स्वभावविशेषही आत्मकथनातून रंगवलेले असतात. आत्मकथनात 'मी' हाच केंद्रस्थानी असला तरी तो स्वत:च्या व्यथा, वेदनांबद्दल लिहिताना त्याच्या आजूबाजूच्या, त्याच्या सारख्याच असणाऱ्या इतरांचेही चित्रण करत असतो.

आत्मकथन हे व्यक्तीमनाचे असले तरी त्यातून समाजमनाचे दर्शन घडत असते. त्या व्यक्तीबरोबर जणू तो समाजच बोलत असतो. एका प्रचंड समूहाचे प्रत्ययकारी दर्शन त्यातून घडत असते. आत्मकथनामध्ये लेखकाच्या अभिव्यक्ती सोबतच त्या त्या समाजाची व्यथा, वेदना, संघर्ष, सुखदु:खे त्यातून व्यक्त होत असतात. आत्मकथनात लेखक आपल्या समाजाच्या भावभावना, तसेच इतर समाजाकडून झालेले अन्याय, अत्याचार व्यक्त करत असतो. त्याचबरोबर आपल्या अवस्थेला आपला समाज अनेकदा कसा कारणीभूत ठरत असतो याचेही चित्रण तो करत असतो.

उषा हस्तक यांच्या मते, "आत्मचरित्र-आत्मकथन मानण्याकडे काही अभ्यासकांचा कल आहे तर काहींच्या मते आशय, रचना, मांडणी व भाषाशैली या दृष्टीने या साहित्यप्रकाराचे कोणतेही निश्चित संकेत निर्माण न झाल्यामुळे त्याला साहित्यप्रकाराचे स्वरूप प्राप्त झाले नाही. शिवाय सर्जनशील लेखनामागे जशा वाङ्मयीन प्रेरणा, जाणिवा असतात तशा आत्मचरित्रपर लेखनातून त्या जाणवत नाहीत."

आनंद यादव यांच्या मते, 'आत्मचरित्र हा साहित्यप्रकार आपण मानला तरी ललित साहित्याचे स्वरूप जसे कल्पित वास्तव या प्रकारचे असते तसे आत्मचरित्र-आत्मकथनाचे स्वरूप नसून ते प्रत्यक्षातील वास्तव स्वरूपाचे असते. शिवाय वाङ्मयीन कलात्मक

भाषाशैली आत्मकथनपर लेखनात अपेक्षित नसते. म्हणून हा साहित्यप्रकार वास्तववादी ठरतो."

## १.३ विषय विवेचन

आत्मकथन एक साहित्यप्रकार समजून घेण्यासाठी आत्मकथन संज्ञेचा अर्थ, चरित्र-आत्मचरित्र - आत्मकथन यातील भेद, आत्मकथन साहित्यप्रकाराचे स्वरूप, आत्मकथन लेखनामागील प्रेरणा, आत्मचरित्र, आत्मकथन यांच्या व्याख्या, त्याचे घटक, या साहित्यप्रकाराची वैशिष्टये, गुणधर्म, दलित आत्मकथनांची वैशिष्ट्ये, मराठी साहित्यातील काही महत्त्वाची आत्मकथने, मराठी साहित्यातील स्त्रियांची आत्मकथने यांचा अभ्यास या प्रकरणामध्ये करावयाचा आहे.

### १.३.१ आत्मकथन संकल्पनेचा अर्थ :

आत्मकथनासाठी वेगवेगळ्या संज्ञा वापरल्या जातात. यासाठी आत्मचरित्र, आत्मकथन, आत्मकथा, आत्मनिवेदन, स्वनिवेदन अशा वेगवेगळ्या संज्ञा प्रचलित आहेत. अशा वेगवेगळ्या संज्ञा या प्रकारासाठी वापरल्या जात असल्या तरी त्या सर्वांचा मूळ आधार 'मी' हाच असतो. स्वत: स्वत:च्या जीवनाचा काढलेला आलेख म्हणजे आत्मकथन होय, अशी आत्मकथनाची व्याख्या करता येते.

एकोणिसाव्या शतकापासून मराठीमध्ये आत्मकथन या साहित्यप्रकारात लेखन होऊ लागले. आत्मकथन लेखकसापेक्ष असते. कारण आत्मकथन लिहिण्याचे वय निश्चित करता येत नाही. ते कधी लिहावे हा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य लेखकाला असते. आत्मकथनामध्ये स्वत:चा शोध स्वत:च घेतला जातो. त्यात 'मी' बरोबरच कुटुंब, समाज, संस्कृती यांचाही संदर्भ येतो. दलित साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आत्मकथने लिहिली गेली. त्यातूनच मराठीमध्ये 'आत्मकथन' ही संज्ञा प्रचलित झालेली दिसते.

आत्मकथन या आत्मपर लेखनाला अभ्यासकांनी वेगवेगळ्या पर्यायी संज्ञांनी संबोधले आहे. अशोक पाटील यांनी आत्मकथन असा शब्दप्रयोग न करता 'स्वकथन' असा काहीसा वेगळा शब्दप्रयोग केला. डॉ.सदा कऱ्हाडे यांनी 'आत्मकथा' असा शब्द वापरला. तर डॉ.यशवंत मनोहर यांनी 'स्वकथन' संज्ञेचा पुरस्कार केला. त्यासाठी त्यांनी दलित आत्मकथनांचा संदर्भ दिला.

डॉ.आरती कुलकर्णी यांनी, "या लेखनातील समूहभावना, समाजचित्रण, 'स्व'च्या जाणिवा आणि सत्य व प्रांजळ निवेदन ही वैशिष्ट्य लक्षात घेऊन त्यांना 'स्वकथन' ही संज्ञा द्यावी असे मत मांडले."

वा. ल. कुलकर्णी यांच्या मते, "ज्या अनुभवांची सृष्टी येथे साकार होण्यासाठी धडपडत असते तो एका व्यक्तिमनाला जाणवलेला व जाणवणारा एक अनन्यसाधारण अनुभव असतो."

आत्मकथन या संज्ञेबाबत अभ्यासकांमध्ये विविध मतमतांतरे असली तरी 'आत्मकथन' ही संज्ञा सर्वमान्य झालेली दिसून येते.

### १.३.२ चरित्र - आत्मचरित्र - आत्मकथन यातील भेद :

आत्मचरित्र - आत्मकथन हा साहित्यप्रकार मराठी साहित्यात व वेगवेगळ्या कालखंडात अनेक अंगाने विकसित होत गेला. चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन या एकाच विभागाच्या शाखा आहेत. चरित्र-आत्मचरित्र म्हटले की या दोन्हींमध्ये वास्तवातील खऱ्या व्यक्ती केंद्रस्थानी असतात. तरीही या दोन्ही साहित्यप्रकारांमध्ये फरक दिसून येतो.

चरित्रलेखनामध्ये दुसऱ्या व्यक्तीचे चरित्र लिहिले जाते. तर आत्मचरित्र-आत्मकथन यामध्ये दुसऱ्या व्यक्तीबद्दल न लिहिता स्वत:च्या जीवनाचे कथन केले जाते. चरित्र वाङ्मय वस्तुनिष्ठ व इतिहासाच्या आशयाचे असते. त्यामुळे चरित्र वाङ्मय बाहेरुन अंतरंगात डोकावण्याची वृत्ती असलेली दिसते.

कोणत्याही थोर व्यक्तींच्या जीवनाबद्दल जाणून घेण्यासाठी लोकांमध्ये कुतूहल असते. यातूनच थोर व्यक्तींचे चरित्र लिहिले जाते. या चरित्रातून सर्वसामान्यांना काहीतरी बोध घडावा या उद्देशातून असे चरित्रलेखन केले जाते. चरित्रात एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनाचा शोध घेत असते. उदा. बाबासाहेब पुरंदरे यांचे 'राजा छत्रपती' हे चरित्र. चरित्र लिहिणारा लेखक व चरित्रविषय दोन्ही एकजीव झालेले असतात.

आत्मचरित्राला इंग्रजीमध्ये 'ऑटोबायोग्राफी' असे म्हटले जाते. या इंग्रजी शब्दाचा अर्थ स्वत:च स्वत:च्या जीवनाचा काढलेला आलेख असा होतो. या शब्दाला प्रतिशब्द म्हणून मराठी वाङ्मयात 'आत्मचरित्र' असा शब्द रूढ झालेला आहे. रा. ग. जाधव यांच्या मते, "आपल्या जीवनविषयक अनुभवाचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वत: लेखन रूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय."

आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार आहे. चरित्र लेखनात एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनाचा शोध घेत असते, तर आत्मचरित्र लेखनात चरित्र व लेखक दोन्ही एकच असतात. आत्मचरित्र म्हणजे स्वत:चा शोध घेऊन तो शब्दबद्ध करणे होय. चरित्र म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास होय.

आत्मकथनामध्ये लेखक स्वत:च्या आयुष्यातील अनुभवांचे कथन करतो, तसेच स्वत:चे व्यक्तिमत्त्व मांडत असतो. तर आत्मचरित्र म्हटले की त्यात, आत्मगौरव आणि आत्मसन्मान या गोष्टी येतात. आत्मकथने ही ऐन उमेदीच्या काळात लिहिली जातात. तर आत्मचरित्रे ही आयुष्याच्या उत्तरार्धात लिहिली जातात. आपल्या पूर्वजीवनाकडे तटस्थपणे पाहत त्यातील अनुभव, घटना, प्रसंग आत्मचरित्रात मांडलेले असते. यातील बऱ्याच गोष्टी या स्मृतीवर अवलंबून असतात. तर कधी आत्मसमर्थनही त्यात समाविष्ट होते.

आत्मचरित्रामध्ये केवळ इतिहासाचे वर्णन असते, तर आत्मकथनात इतिहासाच्या पार्श्वभूमीवर वर्तमानाशी संवाद साधलेला असतो. आत्मचरित्र आणि आत्मकथन यामध्ये काळ हा घटक महत्त्वाचा आहे. काळ या घटकाप्रमाणेच वृत्ती विशेष हा घटकही महत्त्वाचा

आहे. वृत्ती विशेषामुळे इतिहास आणि वर्तमान या दोहोंकडे पाहण्याच्या दृष्टीत फरक पडतो. त्यामुळे आशय आणि अभिव्यक्ती यांच्यावरही परिणाम होतो.

आत्मचरित्रात बालपण, तरुणपण, प्रौढपण, म्हातारपण असा क्रम सांभाळलेला असतो. तर आत्मकथनामध्ये असा क्रम सांभाळलेला असेलच असे नाही. त्यामुळे आत्मकथन मधूनच सुरू होते आणि मधूनच संपते. प्रारंभी सर्व समीक्षक व अभ्यासकांनी दलित आत्मकथनांकडे आत्मचरित्र म्हणूनच पाहिले. कारण दलित आत्मकथनांचा गाभा जरी वेगळा असला तरी काही अंशी तोंडवळा मात्र पारंपरिक आत्मचरित्रासारखाच होता.

आत्मचरित्रामध्ये एकप्रकारे स्थिर जीवनाचे चित्रण असते तर आत्मकथनकाराचे नाते घडण्याच्या अवस्थेशी, गतिमानतेशी असते. आत्मकथनकार आपल्या जीवनातील अनुभवाचे कथन करत असतो, पुढेही करणार असतो. आत्मचरित्रकार एखादाच अपवाद वगळता मध्यमवर्गीय जीवनाचे प्रतिनिधी असतो. तर आत्मकथनकार नाकारलेल्या समाजाचे प्रतिनिधी असतो. आत्मकथनकार वेगवेगळ्या अस्पृश्य जातीतून आलेले असल्यामुळे त्यांच्या अनुभव कथनातील दाहकता, वेगळेपणा आणि जीवनाचे पदर भिन्न भिन्न असल्याचे दिसते.

अशाप्रकारे चरित्र, आत्मचरित्र आणि आत्मकथन यामध्ये वास्तवातील खऱ्या व्यक्ती केंद्रस्थानी असल्या तरी आशय आणि अभिव्यक्ती यांच्यामध्ये भिन्नता असलेली दिसते.

### १.३.३ आत्मकथन साहित्यप्रकाराचे स्वरूप :

आत्मकथन हा साहित्यप्रकार इतर साहित्यप्रकारांपेक्षा वेगळा आहे. मराठी साहित्यामध्ये या साहित्यप्रकाराचे स्वतंत्र स्थान आहे. शिवाय या साहित्यप्रकाराकडे वाचकांचा कल अधिक झुकू लागला आहे. समाजातील सामान्य व्यक्तींपासून ते असामान्य कर्तृत्व करणाऱ्या व्यक्तींच्या लेखनकृतीतून मानवी मनाची व मानवी जीवनाची जी अनेक रूपे व्यक्त होतात ती समाजासाठी प्रेरणादायक असतात. आत्मकथनातून स्वत:च्या जीवनाचे निवेदन लेखक करत असतो. हे करत असताना तो भोवतालच्या घटना, व्यक्ती यांच्या संबंधात स्वत:ची निरीक्षणे आणि मतेही मांडत असतो.

सत्याला आणि वास्तवाला बाधा येणार नाही याचे भान आत्मकथनकाराला बाळगावे लागते. केवळ स्वजीवनातील, स्वकाळातील घटना, व्यक्ती आणि प्रसंग यांचे उल्लेख व संकलन म्हणजे आत्मकथन नव्हे तर आपल्या साऱ्या मुर्तिरूप अनुभवांना सजीव करणे, त्यांच्याकडे तटस्थपणे पाहणे, आपल्या अनुभवांना संकेतरूप देऊन त्याला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देणे म्हणजे आत्मकथन होय.

आत्मकथनपर लेखन करणारी व्यक्ती साहित्यिकच असते असे नाही. ललितकला, रंगभूमी, क्रीडा, राजकारण, समाजसेवा, विज्ञान अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत व्यक्ती आत्मचरित्रपर लेखन करतात. आत्मकथनाचे केंद्र लेखक स्वत:च असल्याने त्यातून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन तर घडतेच पण त्याचवेळी त्या काळातील मानवी मनाचा इतिहास समजून घेण्यासाठी आत्मकथने उपयुक्त ठरतात. त्या समाजस्थितीत व्यक्तीच्या वाट्याला आलेले समाजजीवन, त्यातील ताणतणाव, व्यथा, वेदना, संघर्ष आत्मकथनातून

आविष्कृत झालेली दिसतात. उदा.बेबी कांबळे यांचे 'जीणं आमुचं' व नीलम माणगावे यांचे 'जसं घडलं तसं' हे आत्मकथन.

आत्मकथन लिहिणारी व्यक्ती सर्वसाधारणपणे आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व त्या अनुरोधाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे लेखनरूपाने दर्शन घडवित असते. आत्मकथनपर लेखक स्वत:संबंधी लिहीत असला तरी सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ त्यात येतात. त्यामुळे आत्मकथने समाजाला प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरतात. जसे घडले तसे सांगण्याची भूमिका आत्मकथनकाराची असते. त्यामुळे सत्यकथन आणि वास्तव हे आत्मकथनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

दलित साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आत्मकथने लिहिली गेली. त्यातूनच मराठीमध्ये 'आत्मकथन' ही संज्ञा प्रचलित झालेली दिसून येते. १९६० नंतर दलित लेखकांनी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी आत्मकथनाचा मार्ग शोधून काढला. दलितांची आत्मकथने म्हणजे आत्मचरित्र नव्हेत. कारण आत्मचरित्र ही विशेषकरुन वयाच्या साठीनंतर लिहिली जातात आणि ते लिहिणारा मान्यवर असतो. तर आत्मकथन लिहिणारा वयाच्या ऐन उमेदीतील तरुण असतो आणि समाजात अस्तित्वशून्य आयुष्य जगणारा, जीवनात अनेक संघर्षांना सामोरे गेलेला तो असतो. आत्मकथन हे अशा संघर्षरत व्यक्तीच्या वेदनेला, उपेक्षेला उच्चार देण्याचा प्रयत्न करत असते.

**१.३.४ दलित आत्मकथनांची वैशिष्ट्ये :**

- दलित आत्मकथनकार स्वत:संबंधी लिहीत असला तरी तो समूहमनाचे प्रतिनिधित्व करीत असतो. इतकी सामाजिकता त्यात दिसून येते. म्हणून दलित आत्मकथन हे एक सामाजिक दस्तऐवज आहे असे म्हटले जाते.

- दलित आत्मकथनांमध्ये वेगवेगळ्या जमातीच्या लोकांनी आपली दु:खे, वेदना मांडली. व्यथा, वेदना आणि विद्रोह हे दलित आत्मकथनांचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे.

- आत्मकथनकाराची जी दु:खे आहेत ती समाजनिर्मित आहेत. त्यामुळे समाज व्यवस्थेतील दुजाभावाबद्दल राग त्यांच्या या आत्मकथनातून व्यक्त होतो. ही अन्यायवादी व्यवस्था नष्ट व्हावी व समता प्रस्थापित व्हावी यासाठीचे विचार व कृती त्यांच्या लेखनातून व्यक्त होते. त्याचा आग्रहही ते यातून धरतात. त्यामुळे १९६० नंतरच्या दलित चळवळीचे नाते या आत्मकथनातून पहायला मिळते.

- दलित आत्मकथनांबद्दल डॉ.भालचंद्र फडके म्हणतात, "या आत्मकथा विशिष्ट व्यक्तींच्या असल्या तरी सर्व बाजूंनी शोषण झालेल्या अभावग्रस्त समाजाचा दु:खाने भरलेला इतिहास यातून व्यक्त होतो."

### १.३.५ आत्मचरित्र, आत्मकथन यांच्या व्याख्या :

**रा.ग. जाधव :**

“आत्मा दुखावल्यामुळे स्वत्वाचे भान घेऊन स्वत:च्या व स्वसमाजाच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त करुन देण्यासाठी समाजजीवनाचे वास्तव वेशीवर टांगणारी आणि 'स्व' व स्वेतरांचे प्रबोधन घडविण्याचे कार्य करणारे साहित्य म्हणजे दलित आत्मकथन होय.’’

**डॉ. सदा कऱ्हाडे :**

“स्वत:च्या जीवनाचे दूरस्तपणाने सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्या विषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र होय.”

**वासुदेव मुलाटे :**

“आत्मकथनाचे स्वरूप केवळ तृप्त मनाने केलेल्या आयुष्याचे सिंहावलोकन नाही तर आतल्या आत ठसठसणाऱ्या जखमांनी विव्हळ झालेल्या अस्वस्थ मनाने केलेले कथन आहे. ती केवळ रंजनासाठी लिहिलेली नसून त्यांनी भोगलेल्या जीवनाची सत्य कहाणी आहे.” (वासुदेव मुलाटे, पृ. १३)

**डॉ. अंजली सोमण :**

“आत्मचरित्र हा व्यक्तीप्रधान साहित्यप्रकार असला तरी तो व्यक्तीकेंद्री होऊन चालणार नाही. स्वत:बरोबर सभोवतीची माणसे, त्यांचे स्वभावविशेष रंगवणे आवश्यक असते. ज्या काळात आपल्या जीवनजाणिवा घडल्या त्या काळाचे सारतत्त्व आत्मचरित्रातून वाचकांसमोर येणे आवश्यक आहे.”

### १.३.६ आत्मकथन लेखनामागील प्रेरणा :

इंग्रजी राजवटीमध्ये मराठीमध्ये आत्मचरित्र लेखनाला सुरुवात झाली तेव्हापासून ते आजपर्यंत विविध क्षेत्रातील व्यक्तींनी आपापली आत्मचरित्रे लिहिली आहेत. साहित्य, राजकारण, समाजकारण, क्रीडा, विज्ञान, चित्रपट, उद्योग अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपले जीवनानुभव आत्मचरित्र, आत्मकथन यांच्या माध्यमातून मांडले आहे.

उदा. राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची आत्मचरित्रे म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे ‘कृष्णाकाठ’, वि.दा. सावरकर - ‘माझी जन्मठेप’, वाय.सी. पवार यांचे ‘मी - वाय. सी. पवार’ या आत्मचरित्रांचा उल्लेख करावा लागेल. तर वि.स. खांडेकर– ‘एका पानाची कहाणी’, प्र. के. अत्रे- ‘कऱ्हेचे पाणी’, गंगाधर गाडगीळ- ‘एका मुंगीचे महाभारत’, कृ. पा. कुलकर्णी- ‘कृष्णाकाठची माती’ ही साहित्यिक क्षेत्रातील मान्यवरांची आत्मचरित्रे आहेत.

आत्मकथनपर लेखनामागे काहीतरी हेतू असतो, काहीतरी प्रेरणा असतात. आत्मपरीक्षण, वर्तनामागील कारणमीमांसा, त्याचे विश्लेषण, आत्मसमर्थन या प्रेरणा आत्मकथनपर लेखनामागे दिसून येतात. गतस्मृतींना उजाळा मिळावा या प्रेरणेतूनही आत्मचरित्रे,

munotes.in

आत्मकथने लिहिली जातात. भूतकाळातील आठवणींमध्ये रमून त्यातून आनंद मिळावा या हेतूने अशी आत्मचरित्रे लिहिली जातात.

आत्मचरित्र, आत्मकथन लिखाणामागची प्रमुख प्रेरणा ही आत्मशोधाची असते. लेखक कधी हा शोध प्रामाणिकपणे घेतो तर कधी आयुष्यातील स्मरणीय घटनांच्या निवेदनावरच अधिक भर दिला जातो. आयुष्याच्या उत्तरार्धात आपल्या जीवनाचे तटस्थपणे मूल्यमापनासाठी आत्मपरीक्षणाच्या हेतूने आत्मचरित्रे लिहिली जातात. आपल्या जीवनातील विविध प्रसंग, संघर्ष, चांगले - वाईट अनुभव, स्वभावातील गुणदोष या सर्वांवर आत्मचरित्रात प्रकाश टाकलेला असतो. उदा. महात्मा गांधी यांचे 'सत्याचे प्रयोग', यशवंतराव गडाख यांचे 'अर्धविराम' ही आत्मचरित्रे.

मनुष्य जीवन जगत असताना अनेक बरे वाईट अनुभव त्याला येत असतात. असे अनुभव वाचकांना सांगितल्यामुळे त्यांचे मन हलके होते. म्हणजेच आंतरिक उर्मीतून आत्मचरित्रे लिहिली जातात. आत्मकथनात आपल्या वैयक्तिक भावभावना, जाणिवा यांचा आविष्कार दिसून येतो. बऱ्याच अंशी त्यात बंडखोरपणा दिसून येतो. दलित आत्मकथनांच्या मागे आविष्काराची प्रेरणा असल्याचे दिसून येते.

आपले कार्यकर्तृत्व समाजासमोर मांडणे या प्रेरणेतून समाजामध्ये विशिष्ट क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करणाऱ्या व्यक्ती आत्मकथनपर लिहिताना दिसतात. व्यक्तिगत सामाजिक व संघटनात्मक पातळीवर कार्य करणाऱ्या व्यक्तींभोवती अशी आत्मचरित्रे फिरत असतात. अशा आत्मचरित्रांमधून व्यक्ती आदर्श म्हणून समाजासमोर येत असतात. उदा. 'प्रकाशवाटा' - डॉ.प्रकाश आमटे, 'मी वनवासी' - सिंधुताई सपकाळ , 'आत्मवृत्त' - धोंडो केशव कर्वे.

मालती बेडेकर यांच्या मते, "आत्मचरित्र तेव्हाच लिहिली जातात, जेव्हा लेखक - लेखिकेला आपल्या आयुष्यात काहीतरी सांगण्यासारखे आहे असे वाटते, कधी स्वत:च्या कर्तबगारीचा अभिमान असतो, तर कधी स्वत:च्या दु:खाची, संघर्षाची, अन्यायाची तीव्र जाणीव झालेली असते."

### १.३.७ आत्मकथन साहित्यप्रकाराचे घटक :

आत्मकथन लिखाणामागे मूळ स्वरूप हे आत्मशोधाचे असते; तसेच हा आत्मशोध कलात्मक रीतीने मांडणे हेही असते. आत्मकथनातील 'मी' चे मानवी जीवन अचूकपणे सांगणे, जीवनाचे स्व-स्वरूप शोधणे हा आत्मकथनाचा विषय असतो.

**आत्मकथन साहित्यप्रकाराचे घटक -**

- 'मी' / 'स्व' चे सत्यकथन
- वास्तवता
- सभोवतालची माणसे
- घटना - घडामोडी व प्रसंगचित्रण
- संवाद

कोणत्याही आत्मचरित्रपर लेखनाचा मुख्य घटक म्हणजे 'मी'चे सत्यकथन हा असतो. अनुभवांचे निवेदन करणारा हा घटक असतो. आत्मकथन हे 'मी' ने म्हणजेच लेखकाने जीवनभर केलेल्या वाटचालीचे, त्याच्या जीवनप्रवासाचे दर्शन असते. लेखक त्याची झालेली जडणघडण, अनुभव, विचार, जाणिवा, मूल्य याबाबतचे यश-अपयश सत्यकथनातून सांगत असतो. गतआयुष्यात जसे घडले तसे सांगण्याचे प्रयोजन आत्मकथनाचे असते. त्यामुळे साहजिकच त्यात वास्तविकता येते. सत्याला आणि वास्तवाला बाधा येणार नाही याचे भान आत्मकथनकाराला बाळगावे लागते. आपल्या साऱ्या मूर्तरूप अनुभवांना सजीव करणे, त्यांच्याकडे तटस्थपणे पाहणे, आपल्या अनुभवांना संकेतरूप देऊन त्याला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करुन देणे हे आत्मकथनात महत्त्वाचे असते.

स्वत:बरोबर सभोवतालची माणसे, निसर्ग, परिसर, समाज यांचेही चित्रण आत्मकथनातून होत असते. आत्मदर्शनाबरोबरच व्यक्तीदर्शन, समाजदर्शन घडवण्याचा प्रयत्न लेखक करत असतो. आत्मकथनामधून स्वत:च्या जीवनाचे निवेदन लेखक करत असताना तो भोवतालच्या घटना, व्यक्ती यांच्या संबंधात स्वत:ची निरीक्षणे आणि मतेही मांडत असतो. उदा. 'बिराड' आत्मकथनामध्ये अशोक पवार यांनी स्वत:च्या समाजाच्या व्यथा, वेदनांसोबतच इतर समाजाच्या व्यथा, वेदना मांडल्या आहेत. जीवनाची वाटचाल, जीवनाचा हा प्रवास लेखकाचा एकट्याचा नसतो. जीवनाच्या वाटेवर चालत असताना आयुष्याच्या विविध टप्प्यावर त्याला भेटलेली सभोवतालची माणसे, त्याच्या आयुष्यात आलेली संकटे, जीवनातील चढउतार, त्याला लाभलेली परिस्थिती या बाबीही त्यात येतात.

आत्मकथनातील घटना घडामोडींचे चित्रण हे त्याला जिवंतपणा प्राप्त करुन देत असते. आत्मकथनातून लेखक स्वत:शी संवाद साधताना वाचकांशीही संवाद साधत असतो. निवेदक हे सर्व कथन करत असतो. वाचकांना खिळवून ठेवण्याची क्षमता या साहित्यप्रकारात असते. म्हणूनच आत्मकथने वाचकप्रिय ठरतात.

munotes.in

### १.३.८ आत्मकथन साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये, गुणधर्म :

- आत्मकथन हा मराठीतील गद्यात्मक साहित्यप्रकार आहे. त्यामुळे गद्यात्मक स्वरूपाची अभिव्यक्ती हे आत्मकथनाचे प्रमुख वैशिष्टय आहे.
- आत्मकथनातून लेखक आपली जीवन कहाणी, त्याचे जीवनानुभव सांगत असल्याने त्यात विश्वासार्हता असते.
- जसे घडले तसे सांगण्याची भूमिका आत्मकथनकाराची असते. त्याने स्वत:च्या व्यथा, वेदना निर्धास्तपणे मांडलेल्या असतात. त्यामुळे सत्यकथन आणि वास्तव हे आत्मकथनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.
- आत्मकथनकार स्वत:संबंधी लिहीत असला तरी सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ त्यात दिसून येतात. त्याशिवाय ते व्यक्त होत नाही.

- आत्मकथनामध्ये सत्यकथन आणि वास्तव असल्यामुळे आत्मकथन या साहित्यप्रकारामध्ये कल्पनाविलास, सौंदर्यदर्शन या घटकांना फार महत्त्व नसते.
- आत्मकथने समाजाला प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरतात हे आत्मकथन साहित्यप्रकाराचे प्रमुख विशेष आहे.
- आत्मजीवनाबद्दलची अर्थपूर्णता, लेखनविषयक भान, स्वानुभवातील निवडीची दृष्टी ही या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये ठरतात.
- आत्मकथनपर लेखन करणारी व्यक्ती साहित्यिकच असते असे नाही. ललितकला, रंगभूमी, क्रीडा, राजकारण, समाजसेवा, विज्ञान अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत व्यक्ती आत्मचरित्रपर लेखन करतात.

**१.३.९ मराठी साहित्यातील काही महत्त्वाची आत्मकथने**

- बलुतं - दया पवार
- तराळ अंतराळ - शंकरराव खरात
- उपरा - लक्ष्मण माने
- उचल्या - लक्ष्मण गायकवाड
- जिणं आमुचं - बेबी कांबळे
- काट्यावरची पोटं - उत्तम बंडू तुपे
- गबाळ - दादासाहेब मोरे
- माज्या जल्माची चित्तरकथा - शांताबाई कांबळे
- गावकी - रुस्तम आचलखांब
- अक्करमाशी - शरणकुमार लिंबाळे
- मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे - माधव कोंडविलकर
- कोल्हाट्याचं पोर - किशोर शांताबाई काळे
- आयदान - उर्मिला पवार
- आठवणींचे पक्षी - प्र. ई. सोनकांबळे
- आभरान - पार्थ पोळके
- जिहाद - हुसेन जमादार
- बेरड - भीमराव गस्ती
- अंत:स्फोट - कुमुद पावडे

**मराठी साहित्यातील स्त्रियांची आत्मकथने :**

स्त्रियांनी आत्मकथने लिहिताना आठवणींवर भर दिलेला दिसतो. गतकाळातील आठवणींना उजाळा दिलेला असतो. तसेच कधी मर्यादित चौकटीतले जीवनाचे अनुभव मांडलेले असतात. तरीही या लेखनातून स्त्रीचे स्वत:विषयीचे, सभोवतालचे व जीवनाविषयीचे संवेदन व्यक्त होत असते. मराठीतील स्त्रीलिखित पहिले आत्मकथन रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे आहे. हे आत्मकथन १९१० मध्ये प्रकाशित झाले.

**महत्त्वाची स्त्री आत्मकथने :**

- माझी कहाणी - पार्वतीबाई आठवले
- सांजवात - आनंदीबाई शिर्के
- स्मृतिचित्रे - लक्ष्मीबाई टिळक
- सांगते ऐका - हंसा वाडकर
- जेव्हा माणूस जागा होतो - गोदावरी परुळेकर
- मला उद्ध्वस्त व्हायचंय – मलिका अमर शेख
- जिणं आमुचं - बेबी कांबळे
- माज्या जल्माची चित्तरकथा - शांताबाई कृष्णाजी कांबळे
- बंध-अनुबंध - कमल पाध्ये
- आहे मनोहर तरी - सुनिता देशपांडे
- नाच गं घुमा - माधवी देसाई

## आपली प्रगती तपासा:

१) तुम्ही वाचलेल्या मराठीतील कोणत्याही आत्मकथनाचे स्वरूप स्पष्ट करा.

munotes.in

## १.४ समारोप

अशाप्रकारे आत्मकथन हा साहित्यप्रकार इतर साहित्यप्रकारांपेक्षा वेगळा आहे. मराठी साहित्यामध्ये या साहित्यप्रकाराचे स्वतंत्र स्थान आहे. आत्मकथनातून लेखक आपली जीवन कहाणी, त्याचे जीवनानुभव सांगत असल्याने त्यात विश्वासार्हता असते. तो स्वत:संबंधी लिहीत असला तरी सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ त्यात दिसून येतात. म्हणून आत्मकथने समाजाला प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरतात. वाचकांना खिळवून ठेवण्याची क्षमता आत्मकथनामध्ये असते. म्हणूनच या साहित्यप्रकाराकडे वाचकांचा कल अधिक झुकू लागला आहे व ती वाचकप्रिय ठरत आहेत.

## १. ५ संदर्भग्रंथ सूची


- हस्तक, उषा : 'मराठीतील आत्मचरित्रपर लेखन', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.
- डॉ. यादव, आनंद : 'आत्मचरित्र मीमांसा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
- डॉ. कऱ्हाडे, स. दा. : 'चरित्र आणि आत्मचरित्र', लोकवाङ्मय गृह, मुंबई.
- डॉ .कऱ्हाडे, स. दा. : 'दलित साहित्य चिकित्सा', स्वरूप प्रकाशन, पुणे.
- डॉ. कुलकर्णी, व. दि. : 'विमर्श आणि विमर्शक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
- भागवत, श्री. पु. आणि इतर (संपा.) : 'साहित्य: अध्यापन आणि प्रकार', मौज प्रकाशन, मुंबई.
- जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा.) : 'मराठी विश्वकोश खंड-२', महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृती मंडळ, मुंबई.
- डॉ. कुलकर्णी, आरती : 'दलित स्वकथने साहित्यरूप', विजय प्रकाशन.
- मुलाटे, वासुदेव : 'सहा दलित आत्मकथने : एक मुक्त चिंतन' कैलास प्रकाशन, १९८५.


## १. ६ संभाव्य प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) आत्मकथन या साहित्यप्रकाराचे स्वरुप, वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) आत्मकथन या साहित्यप्रकाराचे अन्य साहित्यप्रकाराहून असणारे वेगळेपण मांडा.

३) 'आत्मकथनाचे केंद्र लेखक स्वत: असतो' या विधानाची साधकबाधक चर्चा करा.

**ब) टीपा लिहा :**

अ) आत्मकथन संकल्पना

ब) आत्मकथन : एक गद्यात्मक साहित्यप्रकार

क) आत्मकथनातील स्वकथन

**क) रिकाम्या जागा भरा.**

१) आत्मकथन हा मराठीतील ——— साहित्यप्रकार आहे.

२) दलित आत्मकथनकार स्वत:संबंधी लिहीत असला तरी तो ——— प्रतिनिधित्व करीत असतो.

३) आत्मकथने समाजाला प्रेरणादायी व ——— ठरतात.

४) ——— आत्मकथनामध्ये अशोक पवार यांनी स्वत:च्या समाजाच्या व्यथा, वेदनांसोबतच इतर समाजाच्या व्यथा, वेदना मांडल्या आहेत.

❖❖❖❖

munotes.in

# २अ

## 'मन में है विश्वास' - विश्वास नांगरे-पाटील

**घटक रचना**

२अ.० उद्दिष्टे

२अ.१ आत्मचरित्र व आत्मकथन -मराठीतील परंपरा

२अ.२ आत्मकथन या साहित्यप्रकाराचा परिचय

२अ.३ विश्वास नांगरे-पाटील – लेखक परिचय

२अ.४ आत्मकथनाच्या अभ्यासाची पद्धती

२अ.५ आत्मकथन - मन में है विश्वास

२अ.५.१ आत्मकथनाची रचना

२अ.५.२ आत्मकथनातील व्यक्तिविशेष

२अ.५.३ आत्मकथनाचे इतर विशेष

२अ.५.३.१ भाषाशैली

२अ.६ आत्मकथनाचा सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ

२अ.७ सारांश

२अ.८ पूरक वाचनासाठी संदर्भ

२अ.९ संदर्भ ग्रंथ

२अ.१० संभाव्य प्रश्न

## २अ.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

- आत्मचरित्र या साहित्यप्रकाराचा परिचय करून घेऊन चरित्र व आत्मकथन या साहित्यप्रकाराचे स्वरूप समजून घेता येईल.
- आत्मकथनकाराचे स्वभावविशेष व त्याचा जीवनप्रवास, जीवनसंघर्ष समजून घेता येईल.

- आत्मकथनकाराच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये ध्यानात येतील.
- आत्मकथनाचा प्रभाव तसेच परिणाम प्रचंड असतो हे जाणून घेता येईल.
- मन में है विश्वास हे आत्मकथन सेल्फ हेल्प स्वरूपाचे पुस्तक आहे, किंबहुना त्यामुळेच ते लोकप्रियही ठरले आहे; अशा पुस्तकाचे स्वरूप जाणून घेणे हाही एक हेतू येथे साधता होऊ शकेल.

## २अ.१ आत्मचरित्र व आत्मकथन - मराठीतील परंपरा

मराठी साहित्यात चरित्र, आत्मचरित्र व आत्मकथन या तीनही संज्ञा भिन्न अर्थाने वापरलेल्या दिसतात. चरित्रे ही प्रामुख्याने प्रेरणा देणाऱ्या, आदर्श वाटलेल्या व्यक्तींची, काही वेळा संशोधन किंवा अभ्यासाची गरज म्हणून लिहिलेली दिसतात. ही चरित्रकाराने कोणत्यातरी दुसऱ्या व्यक्तीवर लिहिलेली असतात. अर्थातच येथे चरित्रकाराचा चरित्रनायकाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणाचा प्रभाव असतो. आत्मचरित्रे ही बहुतांश वेळा वृद्धापकाळी 'स्व'चे अनुभव शब्दबद्ध करण्याच्या 'स्व'च्या इच्छेतून व्यक्त होतात.

आत्मकथन ही संज्ञा प्रामुख्याने दलित साहित्यपरंपरेतून मराठीत वापरलेली दिसते. जीवनाच्या कोणत्याही एका निश्चित टप्प्यावरून – साधारणत: हा आयुष्यात नोकरी, व्यवसाय इत्यादी करायला सुरूवात केल्यावर म्हणजे स्थिरस्थावर झाल्यावर किंवा मुख्य प्रवाहात सामील झाल्यानंतरचे आपल्याच आयुष्याकडे किंवा आजवरच्या जीवनसंघर्षाकडे मागे वळून पाहणे असते. हे आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर लिहिले जाऊ शकते. प्रामुख्याने आजवरचा जीवनसंघर्ष किंवा मी येथवर कसा पोहोचलो याचे ते एक अवलोकन असते. आत्मचरित्र व आत्मकथनात लेखक हाच त्या कथनातील नायक असतो. त्यामुळे बहुतेक वेळा त्याचाच जीवनविषयक दृष्टिकोण येथे प्रधान असतो.

मराठीतील काही महत्त्वाची चरित्रे, आत्मचरित्रे व आत्मकथने पुढीलप्रमाणे - (केवळ काहीच उदाहरणे संदर्भ म्हणून दिलेली आहेत.)

| चरित्रे | आत्मचरित्रे | आत्मकथने |
|---|---|---|
| लोकमान्य - न.र.फाटक | स्मृतीचित्रे - लक्ष्मीबाई टिळक | बलुतं - दया पवार |
| रविंद्रनाथ टागोर – गं. दे. खानोलकर | आहे मनोहर तरी - सुनिता देशपांडे | उपरा - लक्ष्मण माने |
| शोध बाळगोपाळांचा - य. दि. फडके | बंध अनुबंध – कमल पाध्ये | आठवणींचे पक्षी - प्र. ई. सोनकांबळे |
| पिकासो - माधुरी पुरंदरे | सांगत्ये ऐका - हंसा वाडकर | काट्यावरची पोटं - उत्तम बंडू तुपे |

| | | |
|---|---|---|
| हिटलर – वि. स. वाळिंबे | एक झाड : दोन पक्षी - विश्राम बेडेकर | माझ्या जल्माची चित्तरकथा - शांताबाई कांबळे |
| म. गांधी - नलिनी पंडित | कऱ्हेचे पाणी - आचार्य अत्रे | मला उद्ध्वस्त व्हायचंय - मलिका अमर शेख |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर – भालचंद्र फडके | जेव्हा माणूस जागा होतो - गोदावरी परूळेकर | कोल्हाट्याचं पोर – किशोर शांताबाई काळे |
| डॉ. केतकर – द. न. गोखले | अग्नीपंख – ए. पी. जे. अब्दुल कलाम | जीणं आमुचं - बेबी कांबळे |
| मास्तरांची सावली – कृष्णाबाई नारायण सुर्वे | प्रकाशवाटा - प्रकाश आमटे | उचल्या - लक्ष्मण गायकवाड |
| लंडनच्या आजीबाईची कहाणी - सरोजिनी वैद्य | झोंबी, नांगरणी - आनंद यादव | आमचा बाप अन् आम्ही - नरेंद्र जाधव |
| एक होता कार्व्हर – वीणा गवाणकर | लमाण – श्रीराम लागू | ढोर – भगवान इंगळे |

## २अ.२ आत्मकथन या साहित्यप्रकाराचा परिचय

आपल्या आयुष्यातील बरे वाईट भूतकालीन प्रसंग लेखकाला सांगावेसे वाटत असतात. ते दुसऱ्याला, वाचकाला कथन करण्यामागे त्याचे काही एक प्रयोजन असते. आपला जीवनसंघर्ष किंवा एका निश्चित कालबिंदूपर्यंतचा जीवनप्रवास मांडणे येथे अभिप्रेत असते. आपले आयुष्य अर्थपूर्ण आहे हे स्वत:च्या जगण्याविषयीचे आपले वाटणे इतरांपर्यंत विशेषत: जाणकार वाचकापर्यंत पोहोचविण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न असतो. काही वेळा आपण जगलेल्या काळाची व समोरच्या परिस्थितीला आपण कसे तोंड दिले याची माहिती भावी पिढीस उपयुक्त ठरू शकेल अशी भावना येथे प्रबळ असते. कोणतेही चरित्र/ आत्मचरित्र/ आत्मकथन तीन प्रमुख अंगांनी व्यक्त होते. त्या व्यक्तीचे व्यक्तित्व (character), जीवनक्रम (career) व परिस्थिती (environment) हे होत. चरित्रनायकाचे व्यक्तित्व, जीवनक्रम व परिस्थिती ही यात एकरूप असते. नायक/ नायिकेचे चरित्र, परिस्थिती व त्याने/ तिने जगलेले आयुष्य यात संवाद असायला हवा. जीवनक्रमात नायकाची बालपणीची घरातील परिस्थिती, आर्थिक पार्श्वभूमी, शिक्षण, नोकरी, नोकरीच्या निमित्ताने आलेले अनुभव, जीवनातील सुख-दु:खाचे प्रसंग इत्यादींचा समावेश होत असतो. स्वत:च्या आठवणी हा येथे मुख्य आधार असतो. त्यामुळे स्वाभाविकच येथे आत्माविष्काराला अधिक महत्त्व असते. स्वत:च्या अंतर्बाह्य जीवनाचे भान राखून आणि आत्मशोधक वृत्तीतून स्वत:च्या जीवनकथेचे निवेदन करावे अशी अपेक्षा

आत्मचरित्रकाराकडून केली जाते. आत्मशोधक वृत्तीतून आत्मचरित्रकार स्व-जीवनातील विशिष्ट टप्पे, वळणे, स्व-जीवनाशी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे संबद्ध असलेली घटिते आणि त्या संदर्भातील आपली मानसिकता यांची अर्थपूर्ण संगती लावत आपल्या जीवनकथेची रचना करत असतो. त्यातून तो स्वत:बरोबरच भोवतालच्या जीवनविश्वाला साकार करत असतो. मुळात आत्मचरित्र ही साहित्यकृतीद्वारे केली जाणारी लेखकाच्या गतजीवनाची रचना असल्यामुळे त्यात त्याची भावनात्मक गुंतवणूक असणे स्वाभाविक असते. त्यामुळे त्याच्या जीवनकथेतून लेखकाची जीवननिष्ठाही व्यक्त होत असते. सद्यकालीन जीवनाच्या एखाद्या विशिष्ट टप्प्यावरून आपल्याच भूतकालीन जीवनाचा आत्मचरित्रकार शोध घेत असतो. याला अर्थातच ऐतिहासिकतेचा संदर्भही असतो. यातूनच आत्मकथनातील जीवनकथेला आत्मनिष्ठा व ऐतिहासिक वस्तुनिष्ठेचे परिमाण लाभत असते. आत्मकथनकाराच्या जीवनपटाशिवाय समकालीन सामाजिक–सांस्कृतिक वातावरणाचा एक आलेख आत्मकथनातून स्पष्ट होत असतो. अर्थात हा आलेख आत्मकथनकाराच्या व्यक्तिगत जीवनाच्या संदर्भाद्वारेच व्यक्त होत असतो.

आत्मकथनातील 'मी' हा लेखकापेक्षा स्वतंत्र व्यक्ती आहे याचे भान नसले तर आत्मकथनाच्या स्वरूपावर त्याचा परिणाम होऊ शकतो. येथे नायक व लेखक भिन्न नसल्याने तसेच मुख्य आधार स्वत:च्या आठवणींचा असल्याने आपोआपच काही गोष्टी घडू शकतात. नायकाला आत्मसमर्पणाची संधी सहजतेने मिळते, प्रत्यक्ष व कल्पित यातले अंतर प्रत्येक वेळी राखले जाईलच असे नसते. काही वेळा वाचकाचा विचार करून घटनाक्रम कथन केला जाऊ शकतो. द.न.गोखले यांच्या मते, आत्मचरित्रकार लेखकाला अशा ज्या पुष्कळ वाटा मोह घालत असतात त्या स्वीकारण्यातून वाचक चांगल्या आत्मकथनाला मुकतात. आत्मस्तुती, दुसऱ्यांची निंदा, साधेपणाचा आव, वेगवेगळ्या संस्था, व्यवस्थांशी असणारे नाते निराळ्या प्रकारे व्यक्त होणे इत्यादी हे दोष होत. 'मन में है विश्वास' या आत्मकथनाचा उद्देश अगदी सुरूवातीलाच मनोगतात लेखकाने नोंदविलेला आहे. "माझ्यासारख्या तळागाळातल्या, कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या घरातल्या अपुऱ्या साधनसामुग्रीनं आणि पराकोटीच्या ध्येयनिष्ठेनं कुठल्या तरी कोपऱ्यात ज्ञानसाधना करणाऱ्या अनेक "एकलव्यांच्या" दिशादर्शनासाठी मी हा पुस्तकप्रपंच केला आहे." अशा प्रकारे उल्लेख केलेला आहे. त्यामुळे एकूणच मार्गदर्शन हा उद्देश सुरूवातीपासूनच आत्मकथनाच्या केंद्रस्थानी आहे.

## २अ.३ विश्वास नांगरे पाटील - लेखक परिचय

विश्वास नांगरे-पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील कोकरूड गावातील मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. बी. ए.चे इतिहास विषयातील सुवर्णपदक, एम. ए. नंतर प्रशासकीय अभ्यासास महत्त्व देऊन प्रशासकीय पदावर रुजू. नोकरी करत असतानाही नायकाने सातत्याने शिकत राहणे सोडले नाही. स्वत: लेखकाने त्याचा शैक्षणिक आलेख येथे मांडला आहे. त्यामुळे शिकत राहणे मी कधी सोडलं नाही... एल. एल. एम.च्या पहिल्या वर्षात शिकत आहे." (पृ.क्र.२७ )

munotes.in

पोलीस अधिक्षक म्हणून कारकिर्दीला सुरूवात केल्यानंतर मग पोलीसदल उपायुक्त, पोलीस आयुक्त, पोलीस महानिरीक्षक असा पोलीसी खात्यातील टप्प्याटप्प्याने कामामुळे झालेला विकास या आत्मकथनातून मांडला आहे. २६ नोव्हेंबर, २००८ ला ताज हॉटेलवर झालेल्या हल्ल्याचा प्रतिकार करणारे व या हॉटेलमध्ये शिरणारे ते पहिले पोलीस अधिकारी होत. २०१३ मध्ये त्यांना राष्ट्रपती शौर्य पुरस्कार मिळाला. श्री. विश्वास नांगरे - पाटील यांचा लहानपणापासून एक यशस्वी वरिष्ठ पोलीस अधिकारी इथवरच्या आयुष्याचा प्रवास हा या आत्मकथनाचा विषय आहे.

## २अ.४. आत्मकथनाच्या अभ्यासाची पद्धती

साहित्याभ्यासात पुष्कळदा गुणात्मक विश्लेषणपद्धताचा (Qualitative Analytical Method) आधार घेतला जातो. प्रस्तुत अभ्यासपद्धतीचा आधार येथेही घेतला आहे. कोणत्याही आत्मकथनाला आत्मकथनकाराच्या वैयक्तिक आयुष्याचा संदर्भ जसा असतो तसाच विशिष्ट काळाचा, ऐतिहासिक, सामाजिकतेचाही संदर्भ असतो. त्यामुळे लेखकाचा जीवनप्रवास जाणून घेण्याशिवाय समकालीन सामाजिक – सांस्कृतिक स्थितीगतींचा अभ्यासही याद्वारे करता येईल. सामाजिक व्यवस्थेतील बदल, व्यक्तींचे पारंपरिक दृष्टिकोण, पूर्वग्रह तर काही वेळा न्यूनगंड यांचाही आढावा येथे घेता येतो. या आत्मकथनात विशेषत: खेड्यातील एका सर्वसामान्य, मध्यमवर्गीय, मराठी माध्यमातून शिकलेला मुलगा भोवतालच्या परिस्थितीवर मात करून स्वत:च्या बळावर प्रशासकीय सेवेतील उच्चपदावर पोहोचतो. या त्याच्या प्रवासातील अडचणी तसेच त्याला प्रोत्साहन देणाऱ्या समकालीन वास्तवातील घटना लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे काही बाबींचे स्पष्टीकरण करत प्रस्तुत आत्मकथनाचे मूल्यमापन येथे करण्याचा प्रयत्न केला आहे.

## २अ.५ आत्मकथन – 'मन में है विश्वास' - श्री. विश्वास नांगरे - पाटील

### २अ.५.१ आत्मकथनाची रचना

प्रस्तुत आत्मकथनातील कथानक व घटनांच्या स्वरूपाचे तीन प्रमुख विभाग मानता येतील. १) पूर्वजांच्या आठवणी, गाव, शिक्षण – शाळा, महाविद्यालय व पदवी पातळीपर्यंतचे. २) स्पर्धा परीक्षा व तिचे वेगवेगळे टप्पे ३) वेगवेगळ्या टप्प्यावरील नायकाचे स्वत:चे अनुभव, नोकरी, शाळा, वैयक्तिक नाती इत्यादी वेगवेगळ्या संदर्भातील आठवणी व त्या निमित्ताने केलेली भाष्ये हे होत. प्रकरणांनुसार याचा सविस्तर विचार करता येईल. 'गाव आणि गोतावळा' या आत्मकथनाच्या पहिल्या प्रकरणात पूर्वज, नातेवाईक, गावातील निसर्गाचे वातावरण, कुस्तीला महत्त्व, भावकीतील भांडणे, गावातील राजकारण, त्यातील अंधश्रद्धा व सण – उत्सवांचे वातावरण, एकत्र व मोठे कुटुंब, आजी-आजोबा, आई–बाबांचे नाते, काकांचा आदर्श, त्याच वेळी त्यांचा उपदेश याचे वर्णन आहे. गावाची व गाववाल्यांची वैशिष्ट्ये सविस्तरपणे व्यक्त झाली आहेत. “खेड्यातील वैशिष्ट्यपूर्ण जीवनशैलीत वाढण्याचं भाग्य मला मिळालं. माथा कोकणात वसलेल्या माझ्या गावाला वारणा नदीनं तिन्ही बाजूंनी वेढा दिला आहे. बाजूला गवळोबाचा डोंगर शिवलिंगासारखा उभा आहे. हिरवीगार वनराई, उसाची शेती, मस्तवाल मल्ल, कुस्त्यांचे फड, शड्डूंचा आवाज, लेझमाच्या चाली, कोल्हापुरी बोली आणि मटणाचा रस्सा – अशी माझ्या गावाची आणि गाववाल्यांची वैशिष्ट्यं

सांगता येतील. गावात ज्यांच्या घरी हट्टेकट्टे पुरुष, त्यांचीच दहशत असायची. जत्रा, सण, उत्सव यामध्ये आनंदापेक्षा भावकीतल्या भांडणाचाच जास्त प्रभाव असायचा." (पृ.क्र.१) घरातील मोठे एकत्र कुटुंब, त्यातील प्रत्येकाच्या आवडीनिवडी व स्वप्ने, आई-बाबा, काकांचे लग्न, आजी-आजोबांची स्वप्ने व त्यांचे विश्वास, काकांनी दिलेले सल्ले याचे सविस्तर वर्णन या प्रकरणात आहे. काकांनी दिलेला सल्ला एकाच वेळी काकांनी नायकाला केलेले मार्गदर्शन व त्याच वेळी वाचकाला केलेला उपदेश या दृष्टीने महत्त्वाचे आहे. "न्यूनगंड फेकून दिला, की सगळे प्रश्न आपोआप सुटतात. स्वतःला कोणापेक्षाही कमी समजायचं नाही. झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवायची नाही. कशाचीही भीती बाळगायची नाही." असा सल्ला ते द्यायचे. त्यांचे शब्द प्रेरणादायी असायचे, "भीती म्हणजे काय, तर भविष्याची चिंता! अस्थिरता न स्वीकारणं. एकदा ती स्वीकारली, की आयुष्य एखाद्या साहसी खेळासारख बनतं. कोणाचाही तिरस्कार करायचा नाही. असूया बाळगायची नाही. दुसऱ्यातला चांगुलपणा स्वीकारला नाही, की ती असूया बनते आणि दुसऱ्यातल्या चांगल्या गुणांची कदर केली, तर ती प्रेरणा बनते. कोणत्याही व्यक्तीला जर आपण कोणत्याही अटीशिवाय स्वीकारलं, तर ते प्रेम बनतं आणि जर अटी, शर्ती घातल्या, की त्या व्यक्तीबाबत द्वेष तयार होतो. ज्या गोष्टी आपल्या हातात नाही, त्या गोष्टींबद्दल त्रागा केला; तर संताप निर्माण होतो व त्याच गोष्टी बदलू शकतो की बदलू शकत नाही, हे शहाणपण आलं, की सहिष्णुता तयार होते." काकांचे शहाणपणाचे बोल ऐकतच राहावं, असं वाटायचं' (पृ. क्र.५) आत्मकथनाचा प्रेरणादायी हेतू सुरूवातीच्या पहिल्या प्रकरणापासूनच अशा पद्धतीने व्यक्त झाला आहे. आत्मकथनातून येणारी थोरा-मोठ्यांची अनेक प्रेरणादायी वाक्ये वाचकांनाही प्रेरणा देणारी आहेत. व्यक्तीच्या चांगल्या वाईट घडण्याला कुटुंब महत्त्वाचे ठरते. हे यातून सिद्ध होते. लेखकाच्या काकांनी लेखकाला सांगितलेले हे विचार लेखकाच्या पुढच्या घडणीला कारणीभूत आहेत. शाळा या प्रकरणातून नायकाचे प्राथमिक शिक्षणाचे अनुभव व्यक्त झाले आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळेतील मस्ती, मित्रांबरोबरच्या खोड्या व खेळ, मास्तरांच्या शिकविण्याच्या, ओरडण्याच्या, माया करण्याच्या पद्धती यातून सविस्तरपणे व्यक्त झाल्या आहेत.

चौथीची शाळा, हायस्कूल, अकरावी - बारावी, बी.ए., एम.ए. या प्रकरणांतून प्रमुख शैक्षणिक प्रवास व्यक्त झाला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेतील काही प्रमुख आठवणी महत्त्वाच्या आहेत. "जिल्हा परिषदेची मुलांची शाळा नं. १ ही गावच्या माळरानातील छानशी इमारत होती. या इमारतीच्या मागच्या बाजूला बकरं कापलं जाई. समोरच्या बाजूला सलूनमधला सगळा कचरा, केस फेकलेले असायचे. त्यामुळे मधल्या सुट्टीत कापलेल्या बकऱ्याचं हलणारं शरीर निरखणं किंवा न्हाव्यानं टाकलेल्या केसातून जुनं ब्लेड शोधणं" हे नायकाचे उद्योग असायचे. शाळेतील फळ्यावर दिनांक लिहायचा रोजचा नियम असे. तेथेच मोठमोठ्यानं म्हटलेले आणि घोकलेले तीसपर्यंतचे पाढे सतत आठवायचे. एका बाजूला 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम' असा सुविचार लिहिलेला असे व जणू त्यावरच विश्वास असल्यासारखे काही पालक पोरांना जबरदस्ती शाळेत आणत. शिक्षक मग त्यांच्या "पराक्रमांनुसार" त्यांचे बेंबाट उपटणे, पाठीवर गुद्दा देणे, हातावर छडी देणे अशा प्रकारचा प्रसाद देत असत. गुढीपाडव्याच्या दिवशीची श्रद्धेने केलेली पाटीपूजा व त्यानिमित्ताने लागलेली शिक्षणाची गोडी ही नायकाच्या बाबतीतील महत्त्वाची घटना आहे. बालवाडी व पहिलीच्या अभ्यासासाठी अंकलिपीचं छोटंसं पुस्तक होतं. हळूहळू मग गोष्टीरूप इतिहास,

अंकगणिताचं पुस्तक, बालभारतीचं पुस्तक, पाटीकडून वह्या अशा अभ्यासाला सुरूवात होते. कदमबाई, लाकोळेगुरूजी, सुतारगुरूजी यांनी शिकवलेले जगण्याचे अर्थ आयुष्यभराची शिदोरीरूप राहिले. हिवाळ्यातील थंडीत शनिवार सकाळची शाळा मैदानावरच्या खरपूस उन्हात होई. घरातल्या मोठ्या मुलांच्या जुन्या वह्यांची उरलेली पाने शिवून तयार केलेल्या वह्या, जुनी पुस्तकंही हळूहळू दप्तरात जाऊ लागली होती. शिराळ्याच्या 'न्यू इंग्लिश स्कूल' मधील सहावीपासूनचे शिक्षण तुलनेने शिस्तीत पार पडते. तेथील वातावरणही शैक्षणिक व शिस्तीचे असते. मैदान, भला मोठा परिसर, मोठे वर्ग व भला मोठा फळा, शिक्षकही शर्ट–पँट, विजारीतले स्वच्छ व नीटनेटके, अभ्यासाच्या बाबतीत ते अधिक काटेकोर होते. ग्रंथालय या पुस्तकांच्या अद्भुत जगाचा, प्रयोगशाळेचा परिचयही त्यांना येथेच झाला. इथल्या शिक्षकांनी ध्येय निश्चितीकडे नेले, मोठमोठी स्वप्ने दाखवली.

“ज्ञानाच्या कक्षा जेवढ्या विस्तृत व समृद्ध करता येतील, त्या करीत राहायचं; हे सातवीला असताना दिगवडेकर सरांच्या संस्कृत सुभाषितांच्या वर्गात ठरवलं होतं... आता गुद्यांची नाही, तर मुद्यांची लढाई करायची, असा मी पण केला.” (पृ. क्र. २८-२९) शाळेतील अनेक गोष्टींचा प्रभाव लेखकाचे भवितव्य घडण्यास साह्यभूत ठरतात. शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अशा सर्वच क्षमतांचा विकास होण्यासाठी शाळा हातभार लावताना यातून दिसते.

'एकंदर शाळेत व्यक्तिमत्त्वाला पैलू दिले जात होते. छडीही मिळायची व शाबासकीही मिळायची. शिक्षेची भीती आणि कौतुकाची ओढ आवडीनं एकत्र नांदू लागली. इंग्रजीचं आकर्षण वाढू लागलं. गणितात रस निर्माण झाला. संस्कृतचे पाठ कानावर पडू लागले व गुंजूही लागले. शाळेबद्दल प्रेम, तिरस्कार, असूया व आकर्षण अशा अनेक भावना वेगवेगळ्या वेळी जागृत व्हायच्या." (पृ. क्र.३६) शाळेबाबत जिव्हाळा निर्माण करणाऱ्या, वेगवेगळ्या विषयाची भीती मोडून त्याबद्दल प्रेम निर्माण करणाऱ्या याची सरमिसळ या शालेय जीवनात घडताना दिसते.

वाचनाचे वेडही येथेच वाढीस लागले. चांदोबा, चंपक पासून भुतांच्या गोष्टी, वर्तमानपत्रातल्या रविवारच्या पुरवण्या, रामायण–महाभारत, मग शिवाजी सावंत व आत्मचरित्रे वाचायची निवेदकाला गोडी लागली. दरम्यान तरुण होतानाचे प्रश्न, शंका याचे समाधान त्याने डॉक्टर मामांकडून करून घेतले. लाकोळे गुरूजींचे मार्गदर्शनही सतत प्रेरणादायी स्वरूपात व्यक्त झाले आहे. “स्वप्न पाहायचं तर खूप मोठी उंची गाठण्याचं. तुम्ही गाठलेली उंची ही तुम्ही कुठून सुरुवात केली, या मापकानं मोजली जाते. उच्च ध्येय ठेवायचं. आकाश गाठायचं. स्वप्नं पाहायची, स्वप्नांना वास्तवात उतरवण्यासाठी जिद्द ठेवायची. त्याला प्रयत्नांची जोड द्यायची, मग काय तुम्ही देशाचे राष्ट्रपतीच काय; जगाचं नेतृत्वसुद्धा करू शकता!” त्यांचे शब्द त्सुनामीप्रमाणे ऊर्जेची लाट घेऊन यायचे... तुमचं आयुष्यही तुम्हाला असंच घडवायचं आहे. ते घडवायचं की वाईट संगतीनं बिघडवायचं – हे पूर्णतः तुमच्या हातात आहे. प्रत्येकाला मिळणारं आयुष्य तेवढंच आहे. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरू, इंदिरा गांधी, अल्बर्ट आईन्स्टाइन किंवा न्युटन यांना जेवढी वर्षं आयुष्य मिळालं; जवळपास तेवढीच वर्षं तुम्हाला देखील मिळणार आहेत, मग तुम्ही त्यांच्या एवढं मोठं व्हायचं स्वप्न का बघू शकत नाही? स्वप्न

असं बघा, की जे क्षेत्र तुम्ही निवडाल, त्या क्षेत्रातील अत्युच्च पायरी गाठायची आणि एकदा ती पायरी गाठली, की मग तिथे फार गर्दी नसते. सगळ्या गोष्टी नीट होतात आणि जगण्याचा अर्थ लागतो व आयुष्य कारणी लागतं!" गुरुजी सांगायचे आणि आम्ही ऐकत बसायचो. फार काही कळायचं नाही, पण आतून चलबिचल सुरू व्हायची. ऊर्जेचा स्फुल्लिंग पेटायचा. 'मोठं होणं, श्रेष्ठ होणं हे आपल्यालाही शक्य आहे!' हा संदेश गुरुजींच्या प्रत्येक भाषणातून मिळायचा. (पृ. क्र.१८-१९) एकूणच लेखकाच्या कुटुंबातून जसे प्रेरणादायी विचार सांगितले जायचे, तसेच लेखकाच्या शाळेतील शिक्षकांकडूनही लाकोळे गुरुजींचे हे विचार असेच प्रेरणादायी होते. स्वप्नं कोणती बघावी, त्यासाठी कसे कष्ट करावे. सामान्य व असामान्य माणसांच्या जगण्यातील अंतर याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्याचे काम शिक्षक करून देताना दिसतात.

दहावीच्या वर्षाबद्दल अनेक आख्यायिका निवेदकाने ऐकल्या होत्या. या वर्षाची भीतीच अनेकांनी घातली होती. परंतु त्याच वेळी पहिल्या येणाऱ्या मुलाचे कौतुक, त्यांचे पेपरमधले फोटो, मुलाखती याचेही आकर्षण खूप होते. निवेदकाने नियोजनबद्ध अभ्यास करून यातही चांगले मार्क मिळवले. केंद्रातून पहिले येण्याच्या निमित्ताने इथे निवेदक सर्वप्रथम मोठे यश अनुभवतो. अकरावीला हॉस्टेल, कॉलेजची विस्तीर्ण इमारत याचा थोडा त्याच्यावर ताण येतो. इंग्रजी माध्यम, सायन्सचा अभ्यास कितीही रेटून केला तरी त्याच्याशी फार जमत नव्हतं. बारावीनंतर मात्र आर्ट्सला जाण्याचे निवेदक ठरवतो. इथूनच त्याचे स्पर्धा परीक्षांमधील कार्यक्षेत्र निश्चित होत जाते. दहावी बारावीचा अभ्यास करतानाही वारंवार मन द्विधा होते, मजा करावीशी वाटते, समवयीन मुला-मुलींशी वेगवेगळ्या विषयांवरच्या गप्पा माराव्याशा वाटतात, मैदानामध्ये खेळावे असे वाटते परंतु त्याच वेळी अभ्यास व परीक्षा हेही तितकेच महत्त्वाचे होऊन बसलेले असते. अशावेळी या प्रलोभनांच्या मागे न जाता आपले कर्तव्य व आपले प्रयत्न यांच्या मागेच सातत्याने राहिले पाहिजे असे निवेदक पुन्हा पुन्हा स्वतःला बजावत राहतो. दहावी बारावी म्हणजे एक परीक्षा स्तर होय. ती काही आपल्या आयुष्यापेक्षा मोठी नव्हे, ठरवले तर तेही सर्व सोपे आहे. परंतु मेहनत करायला हवी. प्रसंगी अपयश आले तरीही त्याचा सामना करण्याची तयारी असायला हवी.

गावच्या ठिकाणी असणारी मुलांच्या भवितव्याबाबतची उदासिनता समकालीन वातावरणाचे निरीक्षण यातून व्यक्त होते. "खरं तर ग्रामीण भागामध्ये करिअर कौन्सिलिंग हा प्रकारच नाही. डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हायचं म्हणजे अत्युच्च ध्येय. शिक्षक किंवा पोलीस होणं म्हणजे मध्यम ध्येय आणि बँकेत शिपाई किंवा साखरकारखाना कामगार म्हणजे कनिष्ठ ध्येय अशी करिअरची परिभाषा होती. आपापल्या वकुबाप्रमाणे प्रत्येक जण आपली उडी कुठपर्यंत जाऊ शकते, हे ठरवायचा. मुलींसाठी तर दहावी, बारावी झाली, की लग्नाचे पडघम सुरू व्हायचे. अनेक मुलींचे विवाह किशोर वयातच व्हायचे. झालीच तर एखादी मास्तरीण व्हायची, नाहीतर चूल व मूल हेच त्यांचं जीवनध्येय असायचं. जास्त शिकलेल्या मुलींना चांगली स्थळंही मिळायची नाहीत. गावाशी तुलना करता तालुक्याच्या ठिकाणी सामाजिक, शैक्षणिक परिस्थितीमध्ये फार काही फरक दिसत नव्हता." (पृ. क्र. २५-२६) यातून एकूणच ग्रामीण भागातील परिस्थिती लक्षात येते. करिअरबद्दल उदासीनता कमी असते. कोणी काय व्हावे हे कसे ठरविले जाते, मुलांची व मुलींची शिक्षणाची अवस्था कशी असते याचे वर्णन लेखक करताना दिसतो. शालेय जीवनातही लेखकाचे समाजाकडे कसे बारीक निरीक्षण होते याचे चित्रण यातून येते.

शालेय वयामध्ये मुला-मुलींच्या इतर शिक्षणाबरोबर शारीरिक व लैंगिक जागृतीचे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. याबाबत लेखकाचा एक वेगळा दृष्टिकोन आत्मकथनातून लेखक व्यक्त करतो. शाळेत शारीरिक आकर्षणाला बळी पडणारी मुले व त्यातून त्यांच्यावर ओढवणारी परिस्थिती, त्याचे परिणाम याचे लेखक वर्णन करतो. "ग्रामीण भागामध्ये मुलामुलींमध्ये एकमेकांकडे पाहण्याचे पूर्वग्रहदूषित व तिरस्कारमिश्रित दृष्टिकोन लहानपणापासूनच जाणीवपूर्वक रुजवले जातात. या अनैसर्गिक दृष्टिकोनामुळे विकृत आकर्षणाच्या विळख्यात अनेक जण सापडतात. दोन्हीकडून भावनिक कोंडमारा झाल्यामुळे अनेकदा ग्रामीण युवक वाढत्या वयात घोडचुका करतो आणि उर्वरित आयुष्य पश्चात्ताप करण्यात निघून जातं. खरंतर मुलींबद्दल असूया व नकारार्थी दृष्टिकोन ठेवणाऱ्या सर्व किशोरवयीन मुलांमध्ये मुलींचाच विषय चघळला जात असतो. त्यातून आलेली विकृती मग संडास, मुताऱ्यांमध्ये कलेच्या रूपानं चित्रित झालेली दिसते. 'लैंगिकता' या विषयावरचा वाढत्या वयातला कोंडमारा, शारीरिक बदल, त्यातून फुटणाऱ्या लैंगिकतेच्या भावना व घरात, शाळेत या विषयाची मुस्कटदाबी यामुळे बालवयातच अनेक जण प्रौढ लिंगपिसाटांच्या कचाट्यात सापडतात. छोट्या छोट्या प्रलोभनांच्या आहारी जाऊन आपलं अख्खं लैंगिक भावविश्व कुसकरून घेतात. काही मुलं याच नैराश्येतून आक्रमक होतात आणि समवयीन किंवा आपल्यापेक्षा लहान वयाच्या बालकांवर अनैसर्गिक अत्याचार करतात. त्यामुळे खरंच आज लैंगिक शिक्षण देणं योग्य की अयोग्य, याबाबत ठाम मत मांडता येणार नाही. पण कुटुंबात आणि शाळेत 'वासनेचा स्पर्श' कसा ओळखावा, 'लैंगिक' आक्रमणापासून स्वसंरक्षण कसं करावं; शरीराच्या बदलांना, वाढत्या गरजांना व मानसिक स्थित्यंतरांना कसं सामोरं जावं, यावर आरोग्यदायी संवाद होणं गरजेचं आहे." (पृ. क्र.३२-३३) यातून लेखक त्याचा दृष्टिकोन व्यक्त करतो. आरोग्यदायी संवाद होणे कसे गरजेचे आहे व त्यातून अनर्थ कसे टळू शकतात, याबाबतचे मत लेखक इथे मांडताना दिसतो.

शाळेतून महाविद्यालयात जाताना माध्यमाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. आज माध्यमाच्या नावाने जो बागुलबुवा केला जातो व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास त्यात मारला जातो त्यावर निवेदकाने येथे भाष्य केले आहे. नीट नियोजन व जिद्दीने अभ्यास केला तर माध्यम ही अत्यंत सर्वसामान्य गोष्ट आहे. किंबहुना माध्यम हा आपल्या प्रगतीला अडथळा बिलकुल नसतो हे पुन्हा पुन्हा संपूर्ण आत्मचरित्रातून नोंदवलेले दिसते. बी.ए. च्या वर्षात कॉलेजचे मित्र, त्यांचे विषय, स्नेहसंमेलन, अनेकविध कार्यक्रम, मुला-मुलींना परस्परांविषयी वाटणाऱ्या भावना, विशेषतः शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन या गोष्टी पुन्हा पुन्हा कथन केलेल्या दिसतात. एका दिवसात अचानक यश मिळत नाही तर त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतात. विशेषतः माणसाने आपला कम्फर्ट झोन सोडून निराशा व अपयशाला सामोरे जाण्याची तयारी ठेवायला हवी. किंबहुना माणसाला आयुष्यातील अपयश खरे तर नेहमी काहीना काही तरी गोष्ट शिकवत असते. त्यातून माणसाचा स्वाभिमान, जिद्द जागी व्हायला हवी असे निवेदकाचे प्रतिपादन आहे. येथवर येईपर्यंत आपल्याला स्पर्धा परीक्षा द्यायच्या आहेत म्हणजे नेमके काय करायचे आहे हेही निवेदकाने जवळपास निश्चित केलेले दिसते. आपल्याला स्पर्धा परीक्षांना बसण्याचा प्रयत्न करून केवळ साहेब म्हणून फिरायचे आहे, गावाकडे मोठा म्हणून वावरायचे आहे की आपल्याला काही एक काम करण्यासाठी म्हणून या क्षेत्रात यायचे आहे याविषयी निवेदकाने सविस्तर विचार मांडलेले दिसतात. उदाहरणार्थ -

'स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्यांच्या तीन कॅटेगरी असतात-स्वयंघोषित, जनताघोषित, आणि आयोगघोषित... आपलीही गत अशा भाकड बैलासारखी होणार की काय, अशी भीती मनाच्या कोपऱ्यात होती." (पृ. क्र. ८५) बी. ए., एम. एम.च्या वर्षांत विशेषतः स्पर्धा परीक्षांसाठीचा प्राथमिक अभ्यास, इंग्रजीवर मेहनत, वक्तृत्वाकडे लक्ष या गोष्टी निवेदक जाणीवपूर्वक करतो. या परीक्षांचे आराखडे, प्रश्नपत्रिकांचे स्वरूप, अभ्यासाची पद्धती याचे तो बारकाईने नियोजन करतो. वेगवेगळ्या प्रसिद्ध व्यक्तींच्या स्पर्धा परीक्षांच्या नोट्सही येथे संदर्भासाठी वापरतो. एस.आय.ए.सी, यु.पी.एस.सी. पूर्वपरीक्षा, एम.पी.एस.सी.चं घोडामेंदान, संयुक्त मोहीम, अखेरची पायरी या प्रकरणांतून स्पर्धापरीक्षांची तयारी, त्यात हळूहळू मिळू लागलेले यश, अपेक्षित स्थळी निवड झाल्याचे निवेदकाचे स्वप्न पूर्ण होणे हा प्रवास व्यक्त झाला आहे. या सर्व स्पर्धा परीक्षांविषयीच्या प्रकरणांत स्पर्धा परीक्षेचे तपशील बारकाईने वर्णन केलेले दिसतात. प्रश्नपत्रिकांचे स्वरूप, प्रश्नपत्रिका तपासले जाण्याचे व प्रश्नपत्रिकांच्या आखणीचे स्वरूप, मुलाखतींचे स्वरूप, त्यात असणाऱ्या अपेक्षा, विशेषतः मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या यात असणाऱ्या ठराविक अडचणी, त्यावर मात करण्याचे मार्ग व प्रामुख्याने माणसाचा आत्मविश्वास व जिद्द हाच ह्या सर्वांतून यशाचा मार्ग दाखवू शकतो याबाबत निवेदक सातत्याने बोलताना दिसतो. या अर्थाने हा विभाग आत्मचरित्राचा खऱ्या अर्थाने गाभा म्हणता येईल. आत्मचरित्राच्या शेवटी निवेदकाने आजवरच्या आपल्या प्रवासाचा आढावा किंवा त्याची काही सूत्रे मानल्यासारखे भाष्य केले आहे. या सर्व प्रवासातून आपल्या आयुष्याचे ध्येयच निवेदकाने व्यक्त केले आहे. उदाहरणार्थ -

"आतापर्यंतच्या जीवन प्रवासामध्ये सद्सदविवेक आणि सत्याची कास धरताना खूप द्वंद्वांना, संघर्षाला सामोरं जावं लागलं. काही किंतू, काही प्रश्न, काही शंका मनामध्ये अजूनही डोकावतात. वाईट प्रवृत्तीचा लांडगाही कधीकधी शेपूट हलवत लडिवाळपणे जवळ यायचा प्रयत्न करतो. 26 /11 च्या रात्री मृत्यूकडे विजिगीषू वृत्तीने धाव घेतली होती. तरीसुद्धा त्या अग्निदिव्यातून जिवंत बाहेर आलो. खरंतर परमेश्वरानं माझ्यासाठी बोनस आयुष्य देऊ केलं. त्याच्या मनात माझ्यासाठी काहीतरी रचनात्मक योजना असावी. म्हणून काही संकल्प, काही स्वप्न समोर आहेत. पहिलं - मनामधून उरलंसुरलं सर्व भय नष्ट करायचं आहे. मान ताठ ठेवून नजर ध्येयावर अखेरपर्यंत स्थिर ठेवायची आहे. ज्ञान संपादन करायचं आहे. खूप खूप वाचायचं आहे. जगाबद्दल जाणून घ्यायचं आहे. नवं नवं शिकायचं आहे. जे आखूड, स्वार्थी, अरुंद करणारे पाश आहेत, बंध आहेत; ते सगळे झुगारून द्यायचे आहेत. सत्याच्या चाळणीतून प्रत्येक शब्द पारखून घ्यायचा आहे. आपलं अस्तित्व हे पूर्णत्वाच्या दिशेने मार्गक्रमण करेल याचा ध्यास सतत ठेवायचा आहे. जाणिवांना मृत करणाऱ्या सगळ्या नकारात्मक सवयींचा नाश करायचा आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून कार्यकारणवादाची कास अखेरपर्यंत धरायची आहे. कर्म आणि विचार या दोहोंची सीमा अजून खूप विस्तृत करायची आहे. आतून-बाहेरून स्वतःला जागृत करायचं आहे. सकारात्मक व रचनात्मक दृष्टिकोन सदैव सोबत बाळगायचा आहे. यश-अपयश मिळत राहील, पण कोणत्याही अपयशाने गांगरून जायचं नाही की यशानं हुरळून! स्थितप्रज्ञ राहायचं. आयत्या मिळालेल्या घबाडाला कधी बळी पडायचं नाही. काळोखाच्या आणि निराशेच्या गर्तेमध्ये कधी रूतायचं नाही" (पृ. क्र. २०३) आत्मचरित्राचा मुख्य हेतू, निवेदकाची भूमिकाच यातून व्यक्त होते असे म्हणता येईल. यातील सर्व घटनाही एकाच दिशेने जाणाऱ्या आहेत. सर्व आत्मकथनाच्या प्रयोजनास पूरक अशाच पद्धतीने घटनांचे

सादरीकरण झाले आहे. या अर्थाने घटनांना स्वतंत्र मूल्य नसून त्या निवेदकाच्या विशिष्ट हेतूच्या दिशेने राबविलेल्या आहेत. वेगवेगळ्या आठवणींच्या निमित्ताने केलेले तुलनात्मक विचार, भाष्ये यातून वर्तमानकाळ व भूतकाळ यात अगदी थोड्याच वर्षात पडलेले अंतर अधोरेखित केले आहे. या सर्व आठवणी व भाष्यांतून नायकाला मिळालेली प्रेरणा व समकालीन वास्तवाबाबत नायक कोणत्या पद्धतीने विचार करतो ते व्यक्त झाले आहे. निवेदकाचा वाचकाला मार्गदर्शन करणे तसेच प्रेरणा देणे हा हेतू याद्वारे पुन: पुन्हा अधोरेखित होतो.

### २अ.५.२ आत्मकथनातील व्यक्तिविशेष-

आत्मकथनात तात्या, आजोबा, आजी, आई, काका यांचे वर्णन बारीक सारीक तपशीलांद्वारे झाले आहे. प्रत्येक शिक्षकाचे व्यक्तिचित्रही सविस्तरपणे वर्णन केलेले आहे. शिक्षक / मार्गदर्शकांचे सविस्तर व्यक्तिचित्र हे या आत्मकथनाचे निराळेपण आहे. त्यांच्या बारीक-सारीक लकबी, त्यांनी उभे केलेले आदर्श याचे तपशील येथे मांडले आहेत. कदमबाई, लाकोळेगुरूजी, सुतारगुरूजी यांनी शिकवलेले आयुष्याचे तत्त्वज्ञान याने व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया घातला गेला. यांनी सांगितलेल्या साध्यासाध्या गोष्टीतून जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण घडत जातो. विशेषत: कदमबाई आपल्याला नेमके काय व कोणासारखे व्हायचे ते योग्य वेळीच ठरवावे असे सांगून निवेदकाची दादागीरी ताळ्यावर आणतात. सुतारगुरूजी आपापले नेमून दिलेले काम नीट करावे हे शिकवतात. हायस्कूल मधील शिक्षकांचे वर्णनही तपशीलवार येते. दिगवडेकर गुरूजी व त्यांनी समोर ठेवलेले आदर्श हेही तपशीलवार येतात. उदाहरणार्थ - 'दिगवडेकर सरांनी मला गुद्यांनी नाही तर मुद्यांनी भांडायचं असतं असा सल्ला दिला... सरांच्या शब्दांतून खूप खूप शहाणपण शिकायला मिळायचं." (पृ. क्र. २६ – २९)

शाळेतले मित्र, त्यांच्या सवयी, त्यांचे आर्थिक व सामाजिक स्तर, त्यानुसार त्यांचे वागणे हेही सविस्तरपणे 'हायस्कूल', 'अकरावी – बारावी', 'बी.ए.', 'एम.ए. - मुंबई विद्यापीठ' या भागांतून यातून व्यक्त झाले आहे. उदाहरणार्थ -

या सर्व व्यक्ती समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातून आलेल्या आहेत, त्यांचे जीवनमूल्य संस्कृतीसंदर्भ, संघर्ष वेगवेगळे आहेत. लेखकाचा आणि त्या व्यक्तीचा असणारा संबंध व त्या संबंधातून लेखकाने त्यांच्याबाबतचे मांडलेले आकलन या आत्मकथनात येते. पुढे महाविद्यालयातील वेगवेगळे मित्र माधवन, विकास धस इ. होत. दहावीनंतरच्या गुंडगीरीला साथ करणारे मित्र व मार्गदर्शन करणारे सर, विकास व प्रकाशसर, घोलकरसर, गायकवाडसर, जगदाळेसर, गणेश कुलकर्णी, पांडू पाटील, बाळ्या कदम इ. होत.

लेखक – स्वत: विश्वास नांगरे-पाटील हे आत्मकथनाच्या केंद्रवर्ती स्वरूपात आहेत. हा नायक आदर्श स्वरूपाचा, विचारी, वाईट बाबींतूनही लगेच सावरणारा आहे. विचाराने समतोल, शूर, धडाडीचा व जिद्दीचा आहे. स्वत:च्या शिक्षणाच्या प्रेमाविषयीही हा स्वत:च सांगतो. 'त्यामुळे शिकत राहणं मी कधी सोडलं नाही.... ज्ञानाच्या कक्षा जेवढ्या विस्तृत व समृद्ध करता येतील, त्या करीत रहायचं." (पृ. क्र. २७) संपत्तीचा मोह होऊ द्यायचा नाही व सत्तेचा माज चढू द्यायचा नाही हे अगदी कळायला लागल्यापासूनच हा मनाशी पक्के करतो. प्रत्येक संकटातून किंवा अडचणीतून सातत्याने हा मार्ग काढत स्वत:चे मार्गक्रमण सुरू

ठेवतो. लेखकाची प्रत्येक प्रसंगानंतर स्वत:च त्या अनुभवावर केलेली जी भाष्ये आहेत त्यातून तो स्वतंत्रपणे स्वत:चाच मार्गदर्शक असल्याचे दिसते. दहावी, अकरावी, बारावीनंतर आपणच आपला मार्ग तो शोधतो, दहावीपासूनच्या परीक्षांच्या बागूलबुवावर आपणच मात करायची ठरवतो. परिस्थितीला घाबरून मार्ग अर्ध्यातच सोडण्यापेक्षा व आपल्या जीवापेक्षा अपयश निश्चितच वाईट नाही असे मानून तो त्यातूनही पुढे जात राहतो. आहाराच्या सवयींपासून (पृ. क्र.३८,३९), परीक्षेचे, अभ्यासाचे व वेळेचे नियोजन, इंग्रजीची भीती घालवण्यासाठी केलेले प्रयत्न शालेय जीवनावरील लेखापासून सर्व आत्मकथनभर सातत्याने येतात.

आदर्श नायकाचे सर्व संकेत स्वीकारलेली लेखकाची ही प्रतिमा आहे. कर्तृत्ववान असा हा एकमेव नायक व त्याला सकारात्मक अथवा नकारात्मकरित्या पोषक असे बाकीचे जग अशी याच्या भोवतालच्या विश्वाची रचना आहे. किंबहुना वाचकाच्या कोणत्याही क्रियाशील प्रतिसादाची येथे अपेक्षा नसते. त्याने येथील आदर्श नायकाचे सर्व संकेत बीनातक्रार स्वीकारणे अभिप्रेत असते.

### २अ.५.३ आत्मकथनाचे इतर विशेष

संपूर्ण आत्मकथन हे भूतकाळापासून वर्तमानातील किंवा आजपर्यंतच्या काळाचे कथन आहे. एका बाजूला कालक्रमानुसार सरळ भूतकाळ व घटना सांगितल्या जातात. त्यालाच समांतरपणे आताचा, सध्याचा मी भूतकाळामुळेच कसा घडलो किंवा भूतकाळापासूनच कसा स्वत:ला घडवत आलो याची अभिव्यक्ती आहे. खेड्यापासून महाराष्ट्रात व भारतातीलही काही ठिकाणी प्रामुख्याने नोकरीच्या निमित्ताने येणारे अनुभव येथे व्यक्त होतात. शिक्षण घेताना गावातली शाळा व तालुका-जिल्हास्तरीय हायस्कूल यातील फरक साध्या साध्या प्रसंगांतून, विशेषत: मित्र व शिक्षक यांचे राहणीमान व दृष्टिकोणातून व्यक्त होतो. पुढे विद्यापीठस्तरीय शिक्षणातून हा भेद अधिक ठळकपणे व्यक्त झाला आहे. विशेषत: कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यातला भेद केवळ विद्यार्थ्यांमधील भेद व दर्जा इतपतच मर्यादित राहत नाही. हा भेद महानगर व महाराष्ट्रातले एक महत्त्वाचे शहर, यातील जीवनपद्धतीतील भेद म्हणून व्यक्त झाला आहे. वर्तमानकाळात नायक जेव्हा स्वत:च्या मुलांशी संवाद साधतो तेव्हाही विज्ञान व संगणकाच्या प्राबल्याने समकालीन जीवनपद्धती व काही प्रमाणात त्याचा मूल्यव्यवस्थेवर झालेला परिणाम अधोरेखीत होतो.

या आत्मकथनात खरे तर वेगवेगळी स्थळे, वेगवेगळ्या कालातील घटना यांचे कथन असले तरी त्याला फारसे महत्त्व नाही. किंबहुना स्थल व कालाचे संदर्भ येथे पूर्णपणे निवेदकाच्या विशिष्ट हेतूच्या परिपूर्तीच्या दिशेने वापरलेले आहेत. यांचे स्वतंत्र अस्तित्व जवळपास नाकारलेले आहे. यापेक्षाही निवेदकाला जे मार्गदर्शन करायचे आहे ते येथे महत्त्वाचे ठरते. भूतकाळ हा पुष्कळ अंशी आदर्शच होता व वर्तमान मात्र तितकासा सुखद किंवा सोपा नाही हे येथे नोंदवलेले आहे. तरीही निवेदकाच्या मते वर्तमानकालीन माणसाच्या जवळपास सर्वच प्रश्नांवर स्वयंशिस्त, धैर्य, अभ्यास, चिकाटी, जिद्द व नियोजन हेच यशाचे मार्ग आहेत.

'मन में है विश्वास' हे एका यशस्वी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचे यशोगाथा स्वरूपाचे आत्मकथन आहे. अर्थातच आपला या उंचीपर्यंतचा आजवरचा प्रवास, त्याचे स्वरूप, त्यासाठी करावा लागलेला संघर्ष, विशेषत: सातत्याने व चिकाटीने घेतलेली मेहनत,

munotes.in

अपयशावर केलेली मात, अप्रिय घटना विसरून जाण्याचा प्रयत्न हे या आत्मकथनातील संपूर्ण कथानकाची एक बाजू आहे. हा सर्व प्रवास सतत कथन करत असताना सातत्याने वाचकाला वेगवेगळ्या पद्धतींनी प्रेरणा देणे हा या आत्मकथनाचा महत्त्वाचा उद्देश तसेच लेखनाचे कारण आहे. 'मी'चा आजवरचा प्रवास प्रेरणादायी आहेच परंतु त्याशिवाय या प्रवासानिमित्ताने या 'मी'ला वाचकाशी जो संवाद साधायचा आहे, तो महत्त्वाचा ठरतो. हा प्रवास मांडतेवेळी सतत समांतरपणे वाचकाशी संवाद साधणे, पुष्कळदा त्याला उपदेश करणे, त्याला प्रेरणा देणे, त्याचा आत्मविश्वास जागा करणे, त्याचे धैर्य व चिकाटी कायम ठेवणे इत्यादी मार्गांनी जीवनातील आशादायी मार्ग यातून दाखविला आहे. एकूणात वाचकाला जीवनात आधार व मार्गदर्शन पुरविणे हे या आत्मकथनाचे प्रमुख आशयसूत्र आहे. यामुळेच संपूर्ण आत्मकथन मार्गदर्शनपर भूमिकेतून व्यक्त झाले आहे. किंबहुना मी अशा मार्गाने यशस्वी झालो, हा मार्ग सोपा नसला तरीही यशाचा योग्य राजमार्ग हाच आहे. अशी यशाची गुरूकिल्ली सांगणे हे या आत्मकथनाचे ध्येय दिसते. त्यामुळेच सातत्याने उपदेशात्मक भूमिका स्वीकारलेली आहे. घटना किंवा पात्र स्वभावातील गुंतागुंतींपेक्षा मार्गदर्शनाचे प्रयोजन येथे प्रबळ आहे. विशेषत: नोकरीधंद्याच्या शोधात असलेला व त्यामुळे गोंधळून गेलेला तरुण या आत्मकथनाचा मुख्य वाचक आहे. वयाच्या या टप्प्यावर मार्गदर्शनपर अशा ज्या पुस्तकांची गरज असते त्या प्रकारचे हे आत्मकथन आहे.

### २अ.५.३.१ भाषाशैली

'मन में है विश्वास' या आत्मकथनात घटना - प्रसंगांचे कथन करणे, त्याचबरोबर पुष्कळ ठिकाणी व्यक्ती म्हणून तेव्हा मला काय जाणवले व आजचा यशस्वी नायक म्हणून माझे प्रत्येक बाबतीतील निरीक्षण सातत्याने भाष्यांच्या रूपाने व्यक्त होते. घटनांच्या निमित्ताने सहज मनात आलेले अलीकडच्या परिस्थितीचे निरीक्षणही भाष्यांद्वारे व्यक्त झाले आहे. या सर्व भाष्यांतून तेव्हाचा काळ–आताचा काळ असे पुष्कळसे स्मृतीरंजनात्मक चित्र आहे. कथनात सातत्याने उपदेश येतात. विशेषत: अलीकडच्या विद्यार्थ्यांनी जगण्याकडे कसे पहावे, परीक्षा, स्पर्धा याकडे कसे पहावे याचे मार्गदर्शन यांनी पुष्कळसे आत्मकथन व्यापलेले आहे. या *'मी'* भोवतालचे– 'मी'च्या विकासास सकारात्मक अथवा नकारात्मक पद्धतीने पोषक ठरलेले जग व 'मी'ने केलेले मार्गदर्शनपर बोल किंवा उपदेश हे या आत्मकथनाच्या निवेदनाद्वारे व्यक्त होणारे महत्त्वाचे घटक आहेत. संपूर्ण आत्मकथनाचे निवेदनही या अर्थाने आत्मकथनाच्या हेतूस पोषक असेच आहे. उपदेशात्मक भूमिकेतूनही माझे जगणे आदर्श आहे ही भूमिका सातत्याने व्यक्त झाली आहे. सुरूवातीपासूनच नियोजन, स्वयंशिस्त, जिद्द व अभ्यास या गुणांचा स्वीकार हीच आपल्या व एकूणच माणसाच्या यशाची गुरूकिल्ली असल्याचे कथन केले आहे. आदर्श स्वरूपाचा उपदेशही पुष्कळसा रोमँटिक कल्पनांवर आधारलेला आहे. येथे काही ठिकाणी पुनरावृत्तीही झालेली दिसते. खेडे, एकत्र कुटुंबपद्धती, त्यात व्यतीत केलेला काळ हे सर्व छान व आदर्शच आहे असे यातून व्यक्त झाले आहे. संपूर्ण आत्मकथनाचे कथन मार्गदर्शन व आशादायी दिशादिग्दर्शन या हेतूने झालेले आहे. त्यामुळे अर्थातच यातील भाषा केवळ माहिती किंवा तपशील पुरविण्यापेक्षा वाचकाला उद्देशून आदेशात्मक रूपात व्यक्त होते. आत्मकथन लिहिणारी व्यक्ती ही कोणी साहित्यिक नाही. पण तरीही लेखनाची भाषा प्रवाही आहे. घटना-प्रसंग, स्वानुभवांचे कथनही केवळ आत्मप्रौढीसाठी येत नाही. त्यामुळे पुढे काय घडते हे वाचण्याची उत्कंठा वाचकाला लागून राहते. तसेच वाचनादरम्यान संपूर्ण घटना-

प्रसंगाचे सार सांगणाऱ्या म्हणी, वाक्प्रचारांचा वापर लेखक सढळ हाताने करतो. उदा. नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे" (पृ.२५) अशी म्हण, 'एका दगडात तीन पक्षी' (पृ.७३) असा वाक्प्रचार किंवा 'जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही' (पृ.७२) यासारखे अनेक भाषाविशेष येतात. तसेच आत्मकथनात येणाऱ्या अनेक व्यक्तींचे विशेष त्यांच्या अंतर्बाह्य विशेषांसहीत येतात. उदा. "राम जोशी सरांचं मटक्यासारखं सुटलेलं पोट, वेदपाठक सरांचे घारे डोळे, देशिंगकर मॅडमची अश्विनी भावे सारखी सडपातळ देहयष्टी, हसबनीस सरांचा अर्ध्या बाह्यांचा सदरा, कुलकर्णी सरांची बुल्गानीन दाढी" (पृ.२३) यासारखी वर्णने येतात. ही वर्णने त्या त्या व्यक्तीचा लेखकाच्या मनावर असणारा ठसा दर्शविणारे आहेत. यासोबत लेखकाला आयुष्यभराचे संस्कार पुरविणारी, शिक्षकांनी शिकवलेल्या थोरा मोठ्यांची वचने, श्लोक, कविता, अभंग यांचे सहसंदर्भ उल्लेख आत्मकथनात येतात. हे सर्व विशेष आत्मकथनाला वाङ्मयीन महत्त्व प्राप्त करून देतात.

## २अ.६ आत्मकथनाचा सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ

सातत्याने वाचकाला वेगवेगळ्या पद्धतींनी प्रेरणा देणे हा 'मन में है विश्वास' या आत्मकथनाचा महत्त्वाचा उद्देश तसेच लेखनाचे कारण आहे. वाचकाला उपदेश करणे, त्याला प्रेरणा देणे, त्याचा आत्मविश्वास जागा करणे, त्याचे धैर्य व चिकाटी कायम ठेवणे इत्यादी मार्गांनी जीवनातील आशादायी मार्ग यातून दाखविला आहे. विशेषत: नोकरीधंद्याच्या शोधात असलेला व त्यामुळे गोंधळून गेलेला तरुण या आत्मकथनाचा मुख्य वाचक आहे. त्यामुळे यातील भाष्ये, उपदेश, मार्गदर्शनपर विवेचन या वाचकाला गृहित धरून केलेले आहे. हा प्रामुख्याने निष्क्रिय (passive) स्वरूपाचा वाचक आहे. सामाजिक व्यवस्था किंवा मानवी जगणे याबाबत त्याचा दृष्टिकोण हा घडण्याच्या प्रक्रियेत आहे. अशा टप्प्यावर मार्गदर्शनपर अशा ज्या पुस्तकांची गरज असते त्या प्रकारचे हे आत्मकथन आहे. थोडक्यात याला 'सेल्फ हेल्प मॅन्युअल' स्वरूपाचे पुस्तक म्हणता येईल. या प्रकारच्या पुस्तकांत काय आहे यापेक्षाही माणसाने याच पद्धतीने गोष्टी कराव्यात असा हेतू स्पष्ट असतो. त्यामुळे उपदेश किंवा मार्गदर्शनाद्वारे आदेशात्मक रूप याला येत असते. सेल्फ हेल्प स्वरूपाचे पुस्तक हे जाणीवपूर्वक जीवनविषयक मार्गदर्शनाचे काम करत असते. विशिष्ट वर्गाला किंवा खरे तर आपल्या प्रत्येकालाच वेगवेगळ्या टप्प्यावर आवश्यक असणारे मार्गदर्शन अशा प्रकारची पुस्तके करत असतात. खरे तर एकाचा मार्ग हाच किंवा तोच दुसऱ्याच्या विकासाचा मार्ग ठरेलच असे नाही परंतु संवेदनशील वयात किंवा मनाच्या संवेदनशील अवस्थेत या प्रकारच्या पुस्तकांची गरजही मोठी तसेच महत्त्वाची असते. यामुळे स्वाभाविकपणेच अशा पुस्तकांना यशाची गुरूकिल्ली सांगणाऱ्या बेस्ट सेलर स्वरूपाच्या पुस्तकांचे रूप प्राप्त होत असते. 'मन में है विश्वास' या आत्मकथनाचा बाजारातील खपाचा आकडा जरी पाहिला तरी हे सहज लक्षात येते. (आवृत्ती पहिली - मे २०१६, आवृत्ती एकोणिसावी - मे २०१७) याशिवाय या पलीकडे जाऊन या आत्मकथनाची जाहिरात ज्या प्रकारे केली गेली आहे तेही याचेच सूचन करतात. (लेखकाची अनेक मार्गदर्शनपर भाषणे, व्हिडिओ क्लिप्स, मार्गदर्शनपर वचनांचे ॲप महाजालावर अत्यंत लोकप्रिय असल्याचा येथे निर्देश करणे महत्त्वाचे वाटते.) या अर्थाने एका विशिष्ट "टार्गेट रिडर" करिता जाणीवपूर्वक लेखन केलेले हे आत्मकथन आहे असे म्हणता येईल. आत्मकथनाच्या शीर्षकापासून ते सुरूवातीच्या मनोगतात लेखकाने याचा स्पष्ट उल्लेखही केलेला आहे. मराठीत या हेतूने

अलीकडे लिहिलेल्या आत्मकथनांपैकी हे एक महत्त्वाचे आत्मकथन होय. या अर्थाने केवळ पोलिसी खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्याचे आत्मकथन याशिवाय एक प्रेरणादायी यशोगाथा म्हणूनही या आत्मकथनाकडे पाहता येईल.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न- तुमच्या वाचनात आलेल्या कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याच्या आत्मकथनाचे विशेष नोंदवा.

## २अ.७ सारांश

'मन में है विश्वास' हे अलीकडच्या पाच वर्षातले मराठीतील महत्त्वाचे आत्मकथन आहे. (आवृत्ती पहिली - मे २०१६) एका सर्वसामान्य मध्यमवर्गीय मुलाचा एक यशस्वी वरिष्ठ पोलिस अधिकारी होण्यापर्यंतचा प्रवास व या दरम्यान त्याला जाणवलेले जग हा या आत्मकथनाचा मुख्य विषय आहे. नायकाचा संघर्ष व त्याचे बरे - वाईट अनुभव यातून व्यक्त होतात. याशिवाय हे आत्मकथन विशेषत: तरुणांना मार्गदर्शक अशीही भूमिका बजावते. या सर्व बाबतींत या आत्मकथनाचा सविस्तर विचार करता येतो.

## २अ.८ पूरक वाचनासाठी संदर्भ

१) गोखले, द. न. : 'चरित्र – चिंतन', मौज प्रकाशन गृह, प. आ.२०००, मुंबई.

२) राजाध्यक्ष, विजया (सह. संपा.) : 'मराठी वाड्मयकोश', खंड चौथा, म.रा.सा.सं.मं., २००२, मुंबई.

## २अ.९ संदर्भग्रंथ

१) गोखले, द.न. : 'चरित्र – चिंतन', मौज प्रकाशन गृह, प. आ.२०००, मुंबई.

२) कुलकर्णी, गो. म व इतर (संपा.) : '*प्रदक्षिणा*', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, दु.आ. १९९८, पुणे.

३) राजाध्यक्ष, विजया व इतर (संपा.) : 'मराठी वाड्मयकोश', खंड चौथा, म.रा.सा.सं.मं., २००२, मुंबई.

## २अ.१० संभाव्य प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) 'मन में है विश्वास' या आत्मकथनाचा आशय स्पष्ट करा.

२) मन में है विश्वास हे 'सेल्फ हेल्प" स्वरूपाचे आत्मकथन म्हणता येईल काय? तुमचे मत सविस्तर स्पष्ट करा.

३) 'मन में है विश्वास' मधील नायकाच्या संघर्षाचे स्वरूप स्पष्ट करा.

४) 'मन में है विश्वास' या आत्मकथनाच्या वैशिष्ट्यांचा आढावा घ्या.

५) 'मन में है विश्वास' या आत्मकथनाच्या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

**ब) टिपा द्या.**

१) मन में है विश्वास मधील शैक्षणिक वातावरण.

२) मन में है विश्वास मधील उपदेशाचे स्वरूप.

३) मन में है विश्वास मधील शिक्षकांची भूमिका.

४) मन में है विश्वास मधील गावचे वातावरण.

❖❖❖❖

munotes.in

# २-आ

## 'मन में है विश्वास' : आकलन

**घटक रचना**

२-आ. १ उद्देश

२-आ. २ प्रास्ताविक

२-आ. ३ 'गाव आणि गोतावळा'तील भावविश्व

२-आ. ४ 'शाळे'तील आठवणी

२-आ. ५ 'हायस्कूल'- पुढची पायरी

२-आ. ६ 'आकारावी- बारावी'

२-आ. ७ 'बी. ए.' कॉलेजमध्ये पदार्पण

२-आ. ८ 'एम. ए. मुंबई विद्यापीठ' : महानगराकडे कूच

२-आ. ९ 'एस आय ए सी' : स्पर्धा परीक्षेचा प्रारंभ

२-आ. १० 'यू. पी. एस. सी. पूर्वपरीक्षा'

२-आ. ११ 'एम. पी. एस. सी.चे घोडा मैदान'

२-आ. १२ 'संयुक्त मोहीम' : अभ्यासाची पराकाष्ठा

२-आ. १३ यशाची 'अखेरची पायरी'

२-आ. १४ आत्मकथनाचे वाङ्मयीन विशेष

२-आ. १५ सारांश

२-आ. १६ संदर्भ ग्रंथ

२-आ. १७ संभाव्य प्रश्न

## २-आ. १ उद्देश

- हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला मराठी आत्मकथन साहित्य प्रकारातील असामान्य व्यक्तीचे जीवन चरित्र अभ्यासता येईल.

- 'मन मैं है विश्वास' या सबंध आत्मकथनाचे आशयात्मक व रचनात्मक गुण-वैशिष्ट्ये ध्यानात येतील.

- तसेच आपल्याला या आत्मकथनातील लेखकाच्या जीवनातील विविध संघर्षमय घटना प्रसंगांची माहिती मिळेल.



munotes.in

- या आत्मकथनातून येणारे सामाजिक संदर्भ नोंदविता येतील. तसेच रचनेतून दिसणारे वाङ्मयीन विशेष आपल्याला नोंदवता येतील.

## २-आ. २ प्रास्ताविक

'मन में है विश्वास' या विश्वास पाटील यांच्या आत्मकथनात लेखकाच्या आयुष्यातील येणाऱ्या वेगवेगळ्या टप्प्यांचे कथन वेगवेगळ्या शीर्षकांच्या अनुषंगाने येते. या प्रत्येक शीर्षकाच्या अनुषंगाने त्या त्या संदर्भातील आठवणी व भावनांचे एकत्रीकरण यात येते. यामध्ये 'गाव आणि गोतावळा', 'शाळा', 'हायस्कूल', 'अकरावी-बारावी', 'बी.ए.', 'एम-ए - मुंबई विद्यापीठ', 'एम.आय.ए.सी.', 'यू.पी.एस.सी. पूर्वपरीक्षा', 'एम.पी.एस.सी.चं घोडामैदान', 'संयुक्त मोहीम', 'अखेरची पायरी' असा प्रवास कथन केला आहे. या प्रत्येक टप्प्यावर घडणाऱ्या घटना-प्रसंग, त्या दरम्यान भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे विचारप्रभुत्व आणि या सर्वातून घडत जाणारे महाराष्ट्रातील एक यशस्वी व्यक्तिमत्त्व असा प्रवास या आत्मकथनात आला आहे. एक असामान्य व्यक्ती किंवा यशस्वी व्यक्ती नेहमी बरोबरच असते, तिच्या हातून कोणती चूक होऊ शकत नाही किंवा यश हे सहज साध्य असते अशा अनेक वाचक, तरुणांच्या मनातील समजूतीना दूर करण्याचे काम हे आत्मकथन करते. या काळात घडलेल्या घटना लेखकाच्या आयुष्याला विशेष कलाटणी देणाऱ्या आहेत.

मुळात लेखकाचे व्यक्तिमत्त्व हे समाजाच्या हरेक स्तराशी संलग्नित आहे. त्यामुळे भूत व वर्तमान काळ, बदलती मानवी जीवनशैली, लहानांपासून वयस्क लोकांपर्यंत बदलणारा जीवनस्तर, सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा वेगवेगळ्या स्तरांचा मानवी जीवनावर असणारा प्रभाव, विविध गुन्हे, त्यांचे निरसण, गाव-शहर-महानगर या प्रदेशपरत्वे बदलणाऱ्या व्यक्ती, घटना अशा अनेक बाबी लेखकाच्या जीवनाशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे या आत्मकथनातील आठवणी या भूतकालीन असल्या तरी त्यांचा वर्तमानाशी जोडला जाणारा धागाही लेखक आपल्या कथनातून मांडतो.

या आत्मकथनाची रचना ज्या मुद्यांच्या आधारे झालेली आहे त्यानुसार आपण हे आत्मकथन इथे विचारात घेणार आहोत.

## २-आ. ३ 'गाव आणि गोतावळा'तील भावविश्व

आत्मकथनातील हे पहिलेच प्रकरण आहे. त्यामध्ये लेखकाचा जन्म, गाव, घर व गोतावळा यासंबंधीच्या आठवणी आल्या आहे. "सह्याद्रीच्या कुशीत आणि वारणेच्या मुशीत वसलेलं 'कोकरुड' हे माझं गाव." (पृ.पाच) अशी आत्मकथानातील मनोगताची सुरुवात लेखक गावापासून करतो. लेखकाच्या गावाचे नाव कोकरुड. या गावाचे वर्णन लेखक पुढील शब्दात करतो. "येथे रोज भल्या पहाटे मशिदीवरील अजानाच्या भोंग्यानं किंवा ज्ञानेश्वरीच्या पारायणानं जाग येते. बारा बलुतेदार, अठरापगड जाती गुण्यागोविंदानं इथे राहतात." (पृ. पाच) असे गावाच्या विविधतेतही एकता असल्याचे अनुभववर्णन यात येते. गावच्या या स्वरूपामुळेच अजाण आणि ज्ञानेश्वरीचे पारायण यांचे एकत्रित आवाज रहिवासींमध्ये कोणताही धर्मद्वेष न बाळगता समतेतून त्याचा स्वीकार करतात. अशा

गावाच्या भूमीतून जन्मसंस्कार घेऊन लेखक पुढे प्रवास करताना दिसतो. पुढे या गावाचे आणि गाववाल्यांची वैशिष्ट्येही लेखक नोंदवितो. हे गाव माथा कोकणात वसलेले असून वारणा नदीनं या गावाला वेढा दिला आहे. "चौथ्या बाजूला गवळोबाचा डोंगर शिवलिंगासारखा उभा आहे. हिरवीगार वनराई, उसाची शेती, मस्तवाल मल्ल, कुस्त्यांचे फड, शड्डूंचा आवाज, लेझमाच्या चाली, कोल्हापुरी बोली आणि मटणाचा रस्सा" (पृ.१) अशी गाववाल्यांची वैशिष्ट्ये लेखक नोंदवितो. या साऱ्या वर्णनात लेखकाचे गावाबद्दलचे बारीक निरीक्षण स्पष्ट होते.

लेखकाच्या घराची कुळकथाही यात येते. लेखकाच्या आजोबांची विशेष ख्याती होती. ब्रिटीश राजवटीत व पत्री सरकारच्या काळात त्यांनी अन्यायी फौजदाराला जमिनीवर लोळवून बुटाने मारले होते व अनेक महिने फरारी होते. पण फौजदाराने आपली नामुष्की होईल म्हणून खटला चालविला नव्हता. नाहीतर लेखकाच्या आजोबांना स्वातंत्र्यसैनिक म्हणून आयुष्यभर पेन्शन मिळाली असती पण ती त्यांनी नाकारली. "ज्या दिव्यात खैरातीचं तेल आहे, त्या दिव्याचा उजेडही मला नको!" (पृ.१) असा स्वाभिमान त्यांच्या आजोबांनी जपला होता.

पूर्वीच्या काळी कुटुंबनियोजनाला महत्त्व नसल्याने आजी-आजोबांना पाच मुली व दोन मुलगे अशी सात मुले होते. लेखक आतेभाऊ व बहिणींच्या प्रभावातून त्यांच्या वडिलांना सुरुवातीला 'मामा' म्हणत. नंतर भावकीच्या प्रभावाने 'तात्या' म्हणू लागले. सर्व गाव त्यांना 'आबा' म्हणत असे. त्यांच्या वडिलांना लेखकाचे आजोबा पहिलवान बनविण्यासाठी कष्टत होते. सलग चार मुलीनंतर त्यांचा जन्म झाला होता त्यामुळे ते त्यांच्याकडे विशेष लक्ष देत असत. पहिलवान बनविण्यासाठी त्यांच्या व्यायाम व खुराकावर विशेष लक्ष ते देत असत. एवढंच नाही तर वडील माळावर प्रातर्विधीला गेल्यास ते 'कसं' झाले हे प्रत्यक्ष पहायलाही जात असत. इतकं कडवं लक्ष ते ठेवून असत. आजोबा आणि वडिलांच्या याबाबत घडलेल्या घटनांचे वर्णन इथे येते. वडिलांचा विवाह, मग त्यांच्या आईला झालेली पहिली मुलगी, मुलगी झाली म्हणून वडिलांनी तिला पहायलाही न जाणे, यावरुन तिचे नाव 'सीमा' ठेवणे. 'सीमा' म्हणजे बस्स! पुरे!! या घटनांचे कथन करतात. यानंतर सीमाच्या जन्मानंतर लेखकाची जन्मकथा येते. ज्यात 'परत मुलगी झाली तर दुसरे लग्न करण्याची' धमकीच आईला दिली जाते. लग्नासाठी मुलगीही निश्चित केली जाते. मग आईने निनाईच्या मंदिरात नवस बोलणे - व त्यानंतर लेखकाचा जन्म. ज्यात देवी निनाईने लेखकाच्या आईला तिच्या नांदण्याचा 'विश्वास' दिला. (पहा पृ. ३) असे कथन येते. या सर्व कथनातून तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा परिचय वाचकाला होतो. कुटुंबामध्ये पुरुषसत्ताकता असणे, सर्व निर्णय पुरुषाधिन असणे, स्त्रियांची अवस्था, देवभोळेपणा, गाव पातळीवरील सामान्य माणसांचा जीवनक्रम अशा अनेक बाबी लेखक इथे सूचीत करताना दिसतो. लेखकाचे वडील पहिलवान होते तर त्यांचे काका चांगले शिक्षण घेऊन पुण्यात चांगल्या कंपनीत काम करणारे, नेहमी सुटाबुटात असणारे, त्यांची मुले इंग्रजीत बोलणारी अशी तफावत ते अधोरेखित करतात. पण यात प्रेरणादायी गोष्ट म्हणजे मनातील न्यूनगंड फेकून देण्याचा, चांगले विचार अंगी बानवण्याचा सल्ला सतत त्यांचे काका त्यांना देत असत. ही त्यांच्या जमेची बाजू होती. एकूणच लेखकाचे बालपण, कुटुंब, गाव व गावपरिसराशी जोडलेल्या घटनांचे वर्णन या टप्प्यात येते. जे निरागस जग लेखकाने अनुभवले आहे ते तो कथन

करताना दिसतो. आपले हातचे काहीतरी राखून घटना, प्रसंगांना लेखक इथे डावलत नाही. उलट जे आहे ते तसेच मांडण्याचा प्रयत्न इथे करतो.

## २-आ. ४ 'शाळे'तील आठवणी

लेखक शाळेत जायला लागला त्या काळातील आठवणी या भागात येतात. लेखक जेव्हा प्रथमच शाळेत जायला लागला तेव्हा त्यांचे वडील गावचे सरपंच होते. 'जिल्हा परिषदेची मुलांची शाळा नं. १' या शाळेत त्यांनी प्रवेश घेतला होता. सरपंचाचा मुलगा म्हणून तर लेखकाला पोषण योजनेतून अख्खा भरलेला दुधाचा ग्लास मिळायचा. तर इतर मुलांना पाठीत गुद्दा मिळायचा. ही एक तफावत लेखक इथे विशेषत्वाने नोंदविताना दिसतो. शाळेत असताना लहान वयातील शाळेचे दिवस इथे नमूद होतात. यादरम्यानची विशेष आठवण लेखक वर्तमानाशी जोडताना दिसतो. शाळेत असताना लेखकाची आई वडिलांच्या जुन्या धोतराच्या फडक्यात ठेचा, तेल, चटणी, कांदा व भाकरी बांधून द्यायची. या जेवणाला आताच्या महागड्या पिझ्झाची सर येणार नाही. ती चव आपल्या मुलांना चाखता येणार नाही याची खंत लेखक इथे नोंदवितो.

शामू आबाच्या बलुत्यावर गोटा केल्यासारखे केस कापणे, जुन्या वह्यांची उरलेली कोरी पाने घेऊन सुई-दाबणाने वह्या शिवणे, थंडीच्या दिवसात हाता-पायांना तडा जाऊन ते माशासारखे खवले पडल्यासारखे दिसणे, शनिवारी लवकर शाळा संपली की बापूच्या टुरिंग टॉकीजमध्ये सिनेमा पाहणे अशा अनेक गोष्टी येतात. यातील अनेक गोष्टी लेखक वर्तमानाशी ताडून पाहतो. जसे सुंदर अक्षर असणारा घनशाम पिसे - ज्याचे वडील अपंग होते व टेलरकाम करत असत. या शामला त्यामुळे व्हिडियो सेंटरवर सिनेमाच्या पाट्या लिहिण्याचे काम करावे लागे. ज्यामुळे तो शाळेत मागे पडत गेला व कालांतराने व्यसनाच्या अधिन होऊन मृत्यूमुखी पडला. "गावात आलेल्या आधुनिक करमणुकीच्या साधनांच्या अतिरेकाचा तो पहिला बळी असावा!" असा उल्लेख लेखक या प्रसंगाचा करतो. तर दुसऱ्या एका प्रसंगात एकत्र कुटुंब पद्धती, मुलांचे आजारपण आणि त्या आजारावरती सामान्यपणे केले जाणारे उपचार याचे वर्णन येते जे तुलनेने आताच्या मुलांच्या उपचारासाठी साध्या साध्या गोष्टींसाठी होणारा भडीमार ही तफावत प्रकर्षाने दिसत असल्याचे लेखक इथे नोंदवितो. गावच्या परिसरात मनात भीती निर्माण करणाऱ्या विविध स्थळांचे वर्णन येते. तालमीत एकट्या झोपणाऱ्या मल्लाला खवीस उठवतो व त्याच्या तोंडाला फेस येईपर्यंत कुस्ती खेळतो. स्वत: तालमीत एकटा झोपून या आख्यायिकेला लेखक हाणून पाडतो. या घटनेचा संबंध लेखक २६/११च्या रात्रीशी जोडतो. मनातील भीती काढून टाकणारे दोन्ही प्रसंग जोखमीचे होते. पण जोखीम घेतल्याशिवाय यश मिळत नाही याची प्रचिती या दोन्ही प्रसंगातून येते.

शाळा ही मुलांना घडवत असते. शिक्षक विद्यार्थ्यांच्या बालमनावर संस्कार घडवत असतात. असा संस्कार घडवणारे प्रसंग लेखक वर्णन करतो. लेखक पाचवीत असताना सरपंचाचा मुलगा असल्याने मास्तर वर्गात येईपर्यंत तो खुर्चीत बसायचा. लेखकाला हुशारीचा व वडील सरपंच असल्याचा 'माज' चढला होता. इतर शिक्षक काही म्हणायचे नाहीत. पण नव्याने आलेल्या वर्गशिक्षिका कदमबाई त्याच्या कानशिलात भडकवतात व

त्याच्याकडून असणाऱ्या अपेक्षा व संस्काराचे बोल त्याला ऐकवतात. त्यानंतर लाकोळे गुरुजी त्यांचे वर्गशिक्षक बनतात. जे लेखकाला सांगतात की, "तुम्ही गाठलेली उंची ही तुम्ही कुठून सुरुवात केली, या मापकानं मोजली जाते." (पृ. १६) ही लेखकाच्या यशाकडे जाण्याची खऱ्या अर्थाने सुरुवात होती. आपण वडिलांच्या नावामुळे इतरांवर वर्चस्व दाखविण्यापेक्षा स्वत: शून्यातून सुरुवात करण्याचे विचार, संस्कार हे शाळेतील शिक्षक करताना दिसतात.

आपले विचार पटवून देण्यासाठी लाकोळे गुरुजींनी सांगितलेली वय वाढत जाणाऱ्या व पुन्हा पाच महिन्याचा अज्ञातवास सहन करुन पुन: ऊर्जा प्राप्त करुन घेणाऱ्या गरुडाची गोष्ट असेल. (पहा पृ. १७) किंवा सर्वात बुद्धीमान असूनही माणूस जात, धर्म, पंथात कसा विभागला गेला आहे व स्वत:चे मरण कसे ओढवून घेत आहे हे पटवून देणारी सुतार गुरुजींनी सांगितलेली गिधाड व त्याच्या पिल्लाची गोष्ट असेल किंवा 'माणुसकीचा धर्म' ही शिकवण देणारी सुतार गुरुजींनी सांगितलेली महाराज आणि विंचू यांच्यातील गोष्ट. या शिक्षकांनी सांगितलेल्या बोधकथा आयुष्यभरासाठीची शिकवण देणाऱ्या होत्या. म्हणूनच लेखक सांगतो की, या बालपणात सुतार गुरुजींनी सांगितलेल्या गोष्टीच्या प्रेरणेतून २००२ ते २००५ च्या दरम्यानच्या जातीय-धार्मिक दंगलींचा अभ्यास करुन पुढे तशी होणार नाही यासाठी 'जातीय दंगा काबू' योजना यशस्वीपणे राबवतो. ७५००० मुस्लीम समुदायाची मिरवणूक कोणतेही गालबोट न लागता दिल्ली गेटच्या बाहेर पडते. शिक्षकांनी लहान वयात दिलेले शहाणपण व व्यवहारज्ञानामुळे हे शक्य झाल्याचे लेखक नोंदवितो. केवळ कवितांचे पाठांतर व पुस्तकी ज्ञानाच्या पुढे जाऊन जगात वावरण्याचे सामर्थ्य आपल्या विद्यार्थ्यांच्यात निर्माण करणाऱ्या शिक्षकांचे अनुभव लेखक इथे कथन करताना दिसतो.

## २-आ. ५ 'हायस्कूल'-पुढची पायरी

शाळेनंतर हायस्कूलमध्ये दाखल झाल्यानंतरच्या लेखकाच्या आठवणी या विभागात येतात. तालुक्याच्या ठिकाणी आत्याच्या गावी 'न्यू इंग्लिश स्कूल'मध्ये इयत्ता सहावीत लेखक प्रवेश घेतो. इथला पहिला बदल म्हणजे शाळेतील वर्गात जमिनीवर पोत अंथरुन बसण्याऐवजी बाकड्यावर बसण्याची व्यवस्था केली होती. पांढरा शुभ्र सदरा आणि विजारीतल्या शिक्षकांच्या पोशाखाचे रूप शर्ट-पँट असे बदलले होते. 'लायब्ररी'चा व संस्कृत सारख्या विषयाचा प्रथम परिचय याच शाळेने करुन दिला. त्यातील अनेक सुभाषिते जी या शाळेतील दिवगडेकर सरांनी शिकविली होती ती अजूनही मुखोद्गत असल्याचे लेखक सांगतो.

"यौवनं धनसम्पति: प्रभुत्वमविवेकिता।

एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्ट्यम्।।"

म्हणजेच 'तारुण्य, संपत्ती, सत्ता व अविवेक यापैकी प्रत्येक कारण एकेकटंही अनर्थ घडवण्यास पुरेसं आहे; मग चारही एकत्र असल्यावर काय काय घडू शकेल?' (पृ. २६) या अशा ज्ञानवर्धक सुभाषितांचा परिचय घडत होता व नव्या अनुभव ज्ञानाचा परिचय होत होता.

या आधी 'वक्तृत्व' हा शब्द न ऐकलेला लेखक या शाळेच्या माध्यमातून वक्तृत्व स्पर्धा काय असतात, त्यातील सहभाग व वक्तृत्व कौशल्य विकसित करु शकला होता. 'लाल परी' या हिंदी सिनेमाचे कथानक 'मला पडलेलं स्वप्न' या विषयाच्या अनुषंगाने वक्तृत्व स्पर्धेत भावपूर्णपणे व स्वत:च्या बोलीभाषेत कथन केले होते. ज्यामध्ये पहिला नंबर येऊन 'स्टीलचा तांब्या व वाटी' अशी ट्राफी लेखकाला मिळाली होती.

मुले व मुली यांच्यात मोकळा संवाद असू शकतो याची जाणीव शाळेतील मुलांना असत नाही. त्यामुळे यातून एकमेकांप्रती न्यूनगंड निर्माण होतात. 'मुलींशी बोलायला टाबू होता.' (टाबू- **Taboo-** नैतिक तत्त्वावर निषिद्ध ठरवणे) (पृ. २९) असे लेखक सांगून स्वत:चाच एक अनुभव कथन करतो. यातून विरुद्धलिंगी असणारे आकर्षण बळावते व सामाजिक, कौटुंबिक दबावामुळे विकृत होते. याबाबतचे मतही लेखक इथे नोंदवितो. तसेच इंटरनेटच्या मोहजालाने निर्माण केलेले समस्यांचे वर्णन यातून येते.

सातवीतून आठवीत गेल्यानंतर लेखक एन.सी.सी.ला प्रवेश घेतो. या एन.सी.सी.चे लवटे सर प्रभारी होते. लवटे सर म्हणजे 'जमदग्नीचा अवतार' असे त्यांच्या रागाचे वर्णन लेखक करतो. एकदा थंडीचे दिवस असताना परेड सुरु होती. थंडीपासून बचाव म्हणून व पँट खाली घसरु नये म्हणून लेखक पँटच्या दोन्ही खिशात हात घालून होता. लवटे सरांना रिपोर्ट करुन सॅल्यूट करताना दुसरा हात चुकून खिशात राहिला. तेव्हा सरांनी रायफल घेऊन मैदानाचे दहा राऊंड मारण्याची शिक्षा लेखकाला दिली होती. कृष्णधवल टी.व्ही पाहण्याचा अनुभवही लेखक इथे कथन करतो. टी.व्ही.चा व त्यावर प्रदर्शित होणाऱ्या कार्यक्रमांचा महिमा ते आवर्जून सांगतात. "ज्यावेळी टी.व्ही.वर 'रामायण' सुरु झालं, रविवारी सकाळी रस्त्यावर शुकशुकाट व्हायचा. लोक सकाळी अंघोळ करुन टी.व्ही.समोर अगरबत्ती लावून या सिरीयलची वाट पाहायचे." (पृ. ३३) असा तो महिमा होता. अशा परिस्थितीतून लेखकही प्रवासत होता. शिक्षेची भीती आणि कौतुकाची ओढ असा मिश्र भावनांचा तो काळ होता. शाळेबद्दल प्रेम, तिरस्कार, असूया व आकर्षण अशा परस्पर विरोधी भावना लेखकाच्या वाढू लागल्या होत्या.

सुट्टीच्या दिवशी आत्याच्या घरातून कोकरुडला जाणाऱ्या लेखकाला 'आझाद पंछी' असल्यासारखे वाटे. शिराळ्यात 'पिंजऱ्यात' अडकल्यासारखे वाटे. हायस्कूलमधील कुमार अवस्थेला लेखक संभ्रमावस्था मानतो. कारण भूल टाकणाऱ्या शारीर, मानसिक भावना व निर्णय घेता न येणारी अवस्था यामुळे याच काळात भरकटण्याची, चुकीचा मार्ग निवडण्याची वेळ कित्येकदा येऊन ठेपत असते. पण लेखक याबाबतीत स्वत:ला सुदैवी मानतो. कारण चांगल्या-वाईटाची समज व संस्कार करण्याचे काम लेखकावर शिक्षक व अनेक जाणकारांनी केले होते. त्यातीलच एक म्हणजे डॉ.एस.एन. पाटील. ज्यांना लेखक 'डॉक्टरमामा' म्हणायचे. आहार व व्यायामाविषयी विशेष जागरुक असलेले आयुर्वेदातील सर्व नियम ते सर्वांना सांगायचे. त्यांचा दृष्टिकोन वैज्ञानिक होता. व्रतवैकल्य उपासतापास, अंधश्रद्धा, शुभ-अशुभ, अपशकुन, हात दाखविणे याला ते कडाडून विरोध करत असायचे. या साऱ्या गोष्टींमुळे गाव एक विद्यापीठ असल्याचे लेखक मानतो. अनौपचारिक स्वरूपाचं शिक्षण तिथे मिळायचे. डॉक्टरमामा, पोस्टमनकाका, शिपाईआबा, कोतवालभाई, ड्रायव्हरनाना अशी नात्यातील बिरुदं देण्याचे संस्कार घर व गावातून मिळायचे. पुढे

दहावीचा निकाल हा लेखकाच्या जगण्याला नवी उमेद देणारा होता. १९८८ साली लेखक केंद्रात प्रथम आला. ८८ टक्के मार्क लेखकाला मिळाले होते. जी गोष्ट पुढच्या भविष्याच्या प्रवासातील वाट प्रकाशमय करणारी ठरली होती.

## २-आ. ६ 'आकारावी-बारावी'

बत्तीस शिराळ्यातून दहावी झाल्यानंतर लेखक अकरावी-बारावीसाठी कोल्हापुरातील कॉमर्स कॉलेज निवडतो. इथे ॲडमिशन घेतल्यानंतरच लेखक स्वत:साठी 'हॉस्टेलची हवा लागली' असे शब्द वापरतो. इथेच असताना मित्रांसोबत 'A' दर्जाचे सिनेमे पाहणे, नको त्या विषयाच्या गप्पा मारणे, मेसचे जेवण आवडत नाही म्हणून आईला घरी पत्र लिहून सुकं मटण पाठवायला सांगणे अशा गोष्टी चालत. अकरावीला ८२ टक्के मार्क पडून लेखक बारावीला प्रवेश घेतो. यावेळी सायकल सोडून वडिलांकडून हट्टाने सेकंडहँड लुना घेतो. त्याच्या काळजीमुळेच लेखकाच्या आजीचे पंधरा दिवसात निधन होते. जी आजी लेखकाच्या खूप जिव्हाळ्याची होती. जिला लेखक 'म्हातारी आई' म्हणजेच 'म्हाताऱ्याय' म्हणायचा. तिच्या मृत्युमुळे एकटे पडल्याची भावना लेखक कथनात नोंदवतो.

बारावीत असताना हॉस्टेलवर एल.एल.बी.त शिकणारा 'मानकर' नावाचा नेता होता. तो हडकुळा असला तरी लेखकाची लुना त्याला न विचारता घेऊन जात असे. याचा राग लेखकाला येऊ लागला होता; पण तो काही करु शकत नव्हता. एके दिवशी अब्राहम लिंकनच्या पत्रातील 'गुंडाना भीत जाऊ नको, त्यांना नमवणं सर्वात सोपं असतं' असा मजकूर वाचून, त्याची प्रेरणा घेऊन लेखक या मानकरला बेल्टनी मारतो. मानकर त्याच्या त्वेषाला घाबरतो. त्यामुळे हॉस्टेलमध्ये नंतर लेखक 'छोटू दादा' म्हणून नामांकित होतो. अशी अनेक मुले यादरम्यान लेखकाच्या आयुष्यात आली. डोळ्यांची तलफ भागवण्यासाठी महाद्वार रोडला घेऊन जाणारा फुकट्या रवी मोहिते असेल, लेखकापेक्षा लहान असणारा, लेखकाची काळजी घेणारा अभ्यासू, शांत, सुस्वभावी आनंद पाटील असेल, हरहुन्नरी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणारा, धमाल विनोद करणारा, 'भारत माझा कधी कधी देश आहे' अशी व्यंगात्मक प्रतिज्ञा करणारा, अभिनय करणारा - अभिनय कुंभार असेल असे बरे वाईट मित्र लेखकाच्या आयुष्यात आले. आनंद पुढे जाऊन आय.एस. झाला तर अभिनय कुंभार आय.आर.एस. झाला.

बारावीचे वर्ष हे सर्वार्थाने वेगळे असणारे वर्ष. या वर्षाला लेखक "साली पहिले दहावी आणि नंतर बारावी मुलांना ऐन किशोरवयात पंक्चर करुन टाकत असते." असा उल्लेख करतो. 'शेंडी तुटो की पारंबी' (५४) असे म्हणत बारावीचे वर्ष अनेक मुले पार पाडतात. शिक्षणाचे हे दिवस पार पाडून नवे काहीतरी आत्मसात करणाऱ्या मुलांची, त्यांच्या स्वप्नाची वैशिष्ट्ये लेखक नमूद करतो. "ज्यांना स्वप्नं पाहायची असतात, त्यांना 'रात्र मोठी' हवी असते आणि ज्यांना स्वप्नं साकारायची असतात, त्यांना 'दिवस मोठा' हवा असतो. (पृ. ५५) स्वप्न पाहणाऱ्यांच्यात असणारी ही तफावत त्यांनी संपादन केलेल्या यशामध्येही दिसून येते. लेखक मुळात अकरावी-बारावी ही सायन्समधून पूर्ण करतो. पण प्रयोगशाळेत घडलेल्या एका घटनेने हे आपल्यासाठी नाही याची जाणीव लेखकाला होते. शिवाय 'ॲन्युअल डे' साठी प्रमुख पाहुणे म्हणून आलेले भूषण गगराणी यांचे भाषणही कारणीभूत

ठरते. मराठी माध्यमातून परीक्षा देऊन ते आय.ए.एस.मध्ये भारतात तिसरे आले होते. मराठी साहित्य विषय घेऊन हे यश संपादन करणाऱ्या गगराणीचा प्रभाव लेखकावर कायम होता. तसेच विज्ञान शाखेतून बारावीला दहावीपेक्षा कमी ७८ टक्के मार्क मिळाले होते. त्यामुळे लेखक पुढे बी.ए.साठी विज्ञान शाखा न ठेवता कला शाखा निवडतो व प्रवेश घेतो.

## २-आ. ७ 'बी. ए.' कॉलेजमध्ये पदार्पण

खरंतर विज्ञान शाखा सोडून लेखक कला शाखेला प्रवेशित झाला होता. अनेक शिक्षक व मित्रांच्या नजरेत तो वेडेपणा करत होता. पण हा वेडेपणा म्हणजे नवी दिशा शोधण्यासाठी भर समुद्रात प्रवासात असलेली ती बोट होती. या बोटीच्या पुढे 'मिशन गगराणी' साद घालत होते. रानफुलासारख्या या खेड्यातील मुलांना नव्या प्रकाशाची, खतपाण्याची, जमिनीची साथ मिळाली तर ती कशी फुलतात याचे ते उत्तम उदाहरण होते. लेखकानेही अशा नव्या जमिनीची निवड केली होती. कोल्हापुरातील राजाराम कॉलेजमध्ये त्याने प्रवेश घेतला होता व हॉस्टेललाही प्रवेश घेतला होता. या हॉस्टेलमध्ये हिंदी चित्रपट सृष्टीत यश संपादन केलेला आर. माधवन हा लेखकाचा रूम पार्टनर होता. इंग्रजी त्याच्याकडून शिकायला मिळावे हीच त्याची माफक अपेक्षा होती. या बाबतची आठवण लेखक नमूद करतो, 'थँक्यू' बोलताना 'क' चा अतिसूक्ष्म उच्चार कसा आवश्यक आहे, हे तो स्पष्ट उच्चार करुन शिकवायचा. पण "आमच्या ताठर झालेल्या खेडवळ जिभा वळायच्याच नाहीत." (पृ. ५९) अशी अवस्था लेखक व इतरांची व्हायची. असा हा सर्वांच्यात मिसळून वागणारा माधवन 'जस्ट ए मीनीट' नावाची वक्तृत्व स्पर्धा चालवायचा. दरम्यानच्या वर्षात चांगले कर्तृत्व गाजवणाऱ्या विद्यार्थ्याला 'बेस्ट राजारामीयन' ट्राफी मिळायची. माधवनला एका विषयात एटीकेटी मिळाल्याने केवळ शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारावर ती ट्राफी लेखकाला मिळाली. याची खंत लेखक प्रामाणिकपणे यात नमूद करतो.

दहावी बारावीच्या वर्गाप्रमाणेच बी.ए. मध्येही अशाच गुंड प्रवृत्तीच्या, नेता समजणाऱ्या मित्रांसोबत लेखकाची गाठ पडते. यातील राजाराम कॉलेजवर 'जी गँग'चा नेता हेमंत निंबाळकर होता. तर हॉस्टेलचा हिरो विकास धस होता. हेमंतचा उल्लेख लेखक 'गावावरुन ओवाळून टाकलेला हेम्शा अव्वल दर्जाचा हुशार आणि कल्पक होता.' (पृ. ६०) असा करतो. ज्याने 'आजच्या काळातील महाभारत' हे व्यंगात्मक स्कीट लिहिले होते. हेमंत कॉलेजचा चॉकलेट हिरो होता. या दोन्ही ग्रुपमध्ये नेहमी काहीतरी घडत राहायचे व या ना त्या कारणाने लेखक त्यामध्ये गुंतला जाऊन अडचणीत सापडत असे. या सगळ्या हॉस्टेल आणि कॉलेजच्या घडामोडीत 'अभ्यासाच्या नावानं शिमगा' (पृ. ६२) सुरु झाल्याचे लेखक सांगतो. पण पुढे हा विकास फौजदार म्हणून भरती होतो व "कराडमध्ये असताना निरपराध माणसांवर झेपावणाऱ्या बिबट्याला स्वत:च्या रिव्हॉल्वरमधून गोळ्या झाडून ठार करतो." (पृ. ६२) असे कॉलेजमध्ये उनाडक्या करणारे मित्र पुढे कोणते ना कोणते यश संपादन करताना दिसतात. दुसरा एक मित्र 'विल्या' हा टाँटमास्टर होता. एकदा एन.सी.सी.च्या गणवेशातील मुलींकडे पाहून 'सावधान-विश्राम', लेफ्ट-राईट' अस मोठ्यानं म्हणायला लागला. तेव्हा त्यातील एका मुलीने आपल्या मैत्रीणीला "ए, माकड बघ, माकड बघ!"

अशी फिरकी घेतल्याने विल्या अतिशय खजील झाला होता. असे अनेक वृत्तींचे मित्र दरम्यान लेखकाला भेटत होते.

राळेगणसिद्धीला भेट देणे, अण्णा हजारेंच्या विचारांची प्रेरणा घेऊन नसबंदी, नशाबंदी, कुऱ्हाडबंदी, चराईबंदी व श्रमदान या विचारांची पेरणी गावात करण्याचा प्रयत्न लेखक करु लागला. गणपती उत्सवानिमित्त ग्रंथप्रदर्शन व विविध व्याख्यानांचे आयोजन असे सकारात्मक उपक्रम राबविले जायचे. या ग्रंथ प्रदर्शनाचे कौतुक करुन विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री निधीतून ग्रामपंचायतीला ५०,००० रूपये देऊ केले होते.

लेखकाला कॉलेज आणि हॉस्टेलवरील शिवराळ व नकारार्थी मित्र परिवार सोडण्यास कारणीभूत ठरले ते विकास खारगे सर. हे पटवून देण्यासाठी त्यांनी राजा, दोन गरुड आणि शेतकरी यांची गोष्ट सांगितली. त्याची प्रेरणा घेऊन लेखक अभ्यासाला लागला. जगदाळे सरांनी सांगितलेल्या रामदास स्वामींचा 'सदासेवि अरण्य तारुण्य काळी' या मंत्रानुसार "मनामध्ये जर वाईट विचार आले किंवा कामवासना निर्माण झाली, तर गरम तव्यावर बसू; पण या विचारांच्या मोहापासून प्रयत्नपूर्वक दूर जायचं" असा निश्चय लेखक करतो. या काळात नरेंद्र दाभोळकर, शिवाजीराव भोसले, निर्मलकुमार फडकुले, नरेंद्र जाधव अशा सर्वांची व्याख्याने लेखक ऐकू लागला. लेखकामध्ये होणारा हा बदल मित्रांना रूचत नसे. मुलींची छेड काढण्यातही लेखक मागे. त्यामुळे मित्र त्याला 'सज्जन अभ्यासू' असे म्हणत असत.

या दरम्यानची भन्नाट आठवण लेखक सांगतो. स्नेहसंमेलनात संजय दत्तच्या 'सडक' चित्रपटातील 'रहने को घर नही, सोन को बिस्तर नहीं' या गाण्यावर ग्रुप डान्समध्ये लेखक सहभागी होतो. खूप साधा पोशाख घालून गाणे सादर करता येण्यासारखे असले तरी त्यासाठी लेखक जीन्स खरेदी करतो. त्याचा किस्सा लेखक इथे नमूद करतो. "धुलाईनंतर जीन्स तारेच्या कुंपणावर सुकत ठेवली होती. हॉस्टेल माळरानावर असल्याने हा काहीतरी खाद्यपदार्थ आहे, म्हणून गायीने नेमका सीटवरचा भाग चाऊन खाऊन टाकला. फिरुन फिरुन जीन्स रफू करणारा टेलर शोधला, जवळ जवळ मॅच होणारं ठिगळ नेमकं फिट केलं." (पृ. ८३) आणि अशी जिन्स घालून लेखकाने डान्स केला. अशा अनेक अनुभवांची सरशी करत लेखक बी.ए.ची परीक्षा देतो. इतिहास विषयात विद्यापीठात प्रथम येतो. या तीन वर्षाच्या दरम्यान भेटलेल्या बऱ्यावाईट, अभ्यासू - टवाळखोर, लहान मोठ्या अशा सर्वच मित्राचे अनुभव घेत पुढे पुढे लेखक प्रवास करत राहतो. सामान्य माणसांपासून प्रसिद्ध व्यक्तींसोबतचा वावर सारखाच असल्याचा पाया या कॉलेजमध्येच घातला गेल्याचे लेखक सांगतो. एखादा फोबिया घालवण्यासाठी स्वत:हूनच प्रयत्न केले पाहिजे याचे अनुभव लेखक सांगतो – "मी दहावी नापास नेर्ल्याच्या शिवज्या कदमबरोबर आज जेवढा मोकळा आणि दिलखुलास असतो, तेवढाच आत्मविश्वासानं मी ट्रेनिंगवेळी परदेशातील अधिकाऱ्यांशी समरस होतो. कोकरुडच्या लुगड्यातल्या पारू काकूबरोबर जसा बोलतो, त्याच विश्वासानं जावेद अख्तर किंवा अमिताभ बच्चन यांच्याशी माझ्या गप्पा होतात." (पृ. ७४) ही सर्व माणसांसोबत समान वागणूक ठेवण्याचा पाया कॉलेज वयातच घातला गेला. त्याचे अनेक किस्से लेखक या प्रकरणात नमूद करतो.

## २-आ.८ 'एम. ए.- मुंबई विद्यापीठ' : महानगराकडे कूच

लेखक एम.ए. करण्यासाठी मुंबई विद्यापीठात प्रवेश घेतो. त्याने यु.पी.एस.सी.चं स्वप्न सिद्ध करण्यासाठी मुंबई निवडली होती. या मुंबई महानगरीचे वर्णन लेखक पुढील शब्दात करतो. "जिथे चाकरमानी रोजगार शोधतात, षोडंशवर्णीय युवक युवतींना बॉलीवूड खुणावत, कॉर्पोरेट विश्वातल्या एकूण एक संधी जिथे महत्त्वाकांक्षीसाठी हात जोडून उभ्या असतात; ती मुंबई मला भारतातील सर्वात कठीण परीक्षा देण्यासाठी युद्धभूमी म्हणून हवी होती." (पृ. ८९) अशा युद्धभूमीचा स्वीकार केल्यानंतर तिथे पाय रोवणे खूप महत्त्वाचे होते. मुळात लेखकाचे बालपण, पदवीपर्यंतचे शिक्षण गाव व कोल्हापूरसारख्या शहरात व्यतीत झाले होते. तिथल्या तुलनेत मुंबई हे एकदम अजस्त्र महानगर होते. तिथे जीवनशैली प्रचंड वेगात बदलणारी. वेगवेगळ्या सुविधा, रस्ते, मोठ्या इमारती हे सगळ आत्मसात करणे थोडे कठीण होते. यासंबंधाने लेखकाचा पहिला लोकल प्रवास हा लेखकात न्यूनगंड निर्माण करणारा होता. लोकलच्या गर्दीतून डब्यात आत जाता न येणे, जिथे गर्दी कमी म्हणून लेडीज डब्यात शिरणे, तिथून खजील होऊन पुढच्याच स्टेशनला उतरणे, हवालदाराने पकडताच लेखकाचा अवतार पाहून तो गावाकडचा आहे याची खात्री पटून सोडून देणं हा किस्सा लेखक सांगतो. तसेच मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागात प्रवेश घेतल्यानंतर मरियम डोसल, रूबी मलोनी, जॉर्ज कॅमेरून ही प्राध्यापकाची नावे वाचल्यानंतर लेखकाला परदेशात शिक्षणासाठी आल्यासारखे वाटते.

चर्चगेटच्या विद्यापीठाच्या वसतिगृहात लेखक प्रवेश घेतो. तेथे ओरिसाचा डंगवाल व भोपाळचा पुनीत चतुर्वेदी हे लेखकाचे रूमपार्टनर. पण दोघांच्या विचित्र वागण्याने कालांतराने ती रूम तो सोडतो. हॉस्टेलच्या जवळच असणाऱ्या 'मेकर टॉवर' या ब्रिटीश कौन्सिलच्या लायब्ररीमध्ये दीडशे रूपये फी भरुन लेखक मेंबर बनतो. याच लायब्ररीत लेखकाला एसी म्हणजे काय ते प्रथम कळते. लायब्ररीबाहेर जाणवणारा उकाडा खोलीत गेल्या क्षणीच नष्ट होऊन थंडीसारखा गारवा कसा जाणवू शकतो हा प्रश्न लेखक लायब्ररी बाहेरच्या मराठी शिपायाला विचारतो. लेखकाच्या या गावंढळपणाला लक्षात ठेवून शिपाई उत्तर देतो व 'गावाकडनं आलं येडं आणि बर्फीला म्हणतंय पेढं" अशी म्हण म्हणून लेखकाची हेटाळणी करतो. असे अनेक टप्पे पार करत लेखक स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत होता. हा अभ्यास सर्वांगाने करायचा होता याची जाणीव लेखकाला होती. "आवडत्या विषयावर भर देऊन अभ्यास केला, की नावडते विषय तुमची विकेट काढतात." (पृ. ९४) या जाणिवेतून लेखक नावडत्या, बोअर करणाऱ्या विषयांनाही आवडते विषय करत होता. यातून लेखकाने पी.एस.आय. पदासाठीची पूर्वपरीक्षा दिली होती. त्या पूर्वपरीक्षेत लेखक पास झाला होता आणि त्याला पहिलंवहिलं यश प्राप्त झालं होत.

## २-आ. ९ 'एस. आय. ए. सी.' : स्पर्धा परीक्षेचा प्रारंभ

एस.आय.ए.सी. म्हणजे राज्य प्रशासकीय सेवा संस्था. एस.आय.ए.सी.ची पूर्वपरीक्षेची तयारी करण्यासाठी लेखक १९९४ मध्ये प्रवेश घेतो. एस.आय.ए.सी.च्या हॉस्टेलवर लांघी हा लेखकाचा रूम पार्टनर होता व ती रूम १० बाय १० ची होती. या परीक्षेचा अभ्यास

करणाऱ्यांची तऱ्हा लेखक नमूद करतो. "अभ्यास करणाऱ्यांमध्ये अर्धेअधिक अर्धेवेडे असलेले - काही ध्येयवेडे, काही अभ्यासवेडे, काही खाद्यवेडे, काही मद्यवेडे व काही बाईलवेडे." (पृ. ९६) असाच एक ध्येयवेडा मित्र म्हणजे बापू. जो आय.पी.एस. होईपर्यंत पायात चप्पल न घालणारा, "ज्या वेळी युनिफॉर्म चढवणार, त्याच वेळी ब्राऊन शूज घालणार" असे म्हणणारा, स्वत:चे व्हीजटींग कार्ड छापून घेणारा, घरचा गडगंज असला तरी भिकाऱ्यासारखा राहणारा हा बापू रात्रंदिवस मेहनत करणारा होता. "नवनव्या वेड्या प्रतिभावंतांची मांदियाळी या एस.आय.ए.सी. रूपी पंढरीमध्ये दरवर्षी भरते. त्यातले काही आरंभशूर असतात, तर काही घोकंपट्टी करणारे असतात. काही नक्राश्रू गाळणारे असतात. काही प्रचंड मेहनत घेणारे असतात." (पृ. ९७) मेहनत घेणाऱ्यांमध्ये बापू हा लेखकाचा मित्र मोडत होता. दरम्यान अनेक प्रलोभने सर्वांना आकर्षित करत होती. मुलींचे आकर्षणही भुरळ घालायचे. अशा एका भुरळ घालणाऱ्या मुलीचे वर्णन लेखक करतो. या आकर्षक मुलीच्या समोर ही सर्व मुले म्हणजे, 'खेड्यातले 'रंगीला छाप' आमीरखान' असल्याची भावना लेखक कथन करतो. (पृ. ९८)

एकूणच अभ्यास, अभ्यासासाठी असणारी चित्र-विचित्र मित्रांची सोबत, वेगवेगळी प्रलोभणे आणि या सर्वांतून अभ्यासाचे सातत्य ठेवून पूर्वपरीक्षा पास होण्याचे यश लेखकाने संपादन केले होते.

## २-आ. १० 'यू. पी. एस. सी. पूर्वपरीक्षा'

याच टप्प्यावर लेखक यू.पी.एस.सी. परीक्षेची तयारी करताना दिसतो. या परीक्षेसाठी इतिहास हा वैकल्पिक विषय लेखकाने निवडला. पण परीक्षेतील अभ्यासक्रमाचा आवाका खूप असल्याने तो अभ्यासताना 'रात्रंदिन लढाई सुरु' असल्याचे लेखक नमूद करतो. यादरम्यान घोलकर सर, यादव सर यासारख्या अभ्यासकांचे मार्गदर्शन लेखकाला लाभले. हा अभ्यास करताना दत्त, सुंदरम यांची अर्थशास्त्राची, लीला गोवीलकरांचे मराठी व्याकरणाचे, बिपिनचंद्र, रोमिला थापर यांची इतिहासाची, भीष्मराज बाम यांचे मानसशास्त्रावरची, नॉर्मल लेवीस आणि डेल कार्नेजा यांची व्यक्तिमत्त्व विकासाची पुस्तके अशा अनेक पुस्तकांचे संदर्भ लेखक सांगतो. वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करुन, अभ्यासाच्या तऱ्हा आत्मसात करुनही या पूर्वपरीक्षेची तयारी अवघड असल्याचे लेखक सांगतो. "कमजोर हाडांचा काडी पैलवान असूनही हिंद केसरीच्या जोडीची कुस्ती खेळायचा आग्रह" करत असल्याची भावना या परीक्षेबाबत लेखकाची बनत होती. अभ्यास करत असतानाच्या काळात अनेकदा ढळत जाणारा तोल आणि तो सांभाळण्यासाठी यादव सरांसारख्यांचे मार्गदर्शनपर विचार यांची संवेदनशील जाणीव लेखक व्यक्त करतो. पण एकूणच प्रगती पाहता लेखकाचा या परीक्षेचा निकाल नकारार्थी लागला. पण थकून चालणार नव्हते याची जाणीवही लेखकाला होती. पण एस.आय.ए.सी. बिल्डिंगमधील खोली परीक्षेत नापास झाल्यामुळे सोडावी लागणार होती याचे दु:ख लेखकाला होते. कारण इथे यू.पी.एस.सी.ची तयारी करणाऱ्या मुलांनाच प्रवेश मिळत होता व त्याआधी लेखकाने विद्यापीठाचे वसतिगृहही सोडले होते. त्यामुळे लेखकाची थोडी कुचंबना झाली होती. जी देशमुख साहेबांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वसतिगृहात प्रवेश मिळवून देऊन काम सोपे केले होते.

एकूणच लेखकाच्या यशाच्या मार्गातील प्रत्येक टप्पा सहजी, सुलभ नव्हता. त्यामध्ये अनेक अडचणींची साथ होती. तशी यावेळीही अशा अडचणी आल्या. पण त्यावर मात करत पुढे जाण्याची लेखकाची वृत्ती इथे विजयी झालेली दिसते.

## २-आ. ११ 'एम. पी. एस. सी.चे घोडामैदान'

याआधीच्या टप्प्यावर लेखक पूर्वपरीक्षा पास झाला होता आणि मुख्य परीक्षेतील लेखक समाजशास्त्र आणि इतिहास हे दोन विषय घेऊन या परीक्षेची तयारी करुन पासही झाला. मुख्य परीक्षा पास झाल्याचा आनंद लेखकासोबत गावाकडेही साजरा केला होता. मुलाखतीसाठी वेळ असल्याने लेखक गावी जातो. कोल्हापूरच्या लायब्ररीत अभ्यास करताना लेखक 'वासरात लंगडी गाय शहाणी', 'एस.आय.ए.सी. रिटर्न' यासारख्या नावाने ओळखला जाऊ लागला होता. इथे असताना खारगे सरांचे मार्गदर्शनही लेखकाला मिळते. पण जेव्हा मुलाखत होते त्यामध्ये मात्र एकवीस वर्षाचा लेखक नापास होतो. मुलाखती दरम्यान झालेल्या चुका व इतर घडलेले प्रसंग लेखक वर्णन करतो. ज्यामुळे लेखकाचा निकाल 'नापास' या वर्गात मोडतो. याच कालखंड़ात भास्कर भाऊ, पक्या सुतार, गणेश कुलकर्णी, पांडू पाटील, बाळ्या कदम, शिवाजी निमट या सर्व मित्रांच्या आठवणी लेखक सांगतो. काहीच्या तऱ्हेवाईक जगण्याचे नमुनेही सांगतो. 'टू बी ऑर नॉट टू बी, दॅट इज माय क्वेशन' असे शेक्सपीअर संचारल्यासारखे गवताची गंजी रचलेल्या गाडीत बसून भाषण म्हणणारा-भाऊ, रोज सकाळी गुरुदेव दत्ताची अर्धा तास पूजा करुन जिद्दीने अभ्यासाला लागणारा-गणेश कुलकर्णी, पिळदार शरीर स्नायू, राकट चेहरा पण अत्यंत हळवा अभ्यासू-पांडू पाटील, मुंबईच्या गर्दीतल्या बसमध्ये जागा मिळावी म्हणून लंगडणारा-बाळ्या कदम, आठ आठ तास सलग अभ्यासाला बसणारा-शिवाज निमट असे वेगवेगळ्या जीवनशैलीत राहणारे लेखकाचे मित्र. त्यांच्यासोबत लेखक वाढत राहतो.

आतेबहिणीकडे गेला असता आतेबहिणीच्या नवऱ्याने दिलेला सल्ला, पीएसआयच्या परीक्षेवेळी भेटलेले गावाकडील पीएसआय कांबळे व त्यांचा सल्ला, वर्षभरात अभ्यासासाठी केलेल्या अनेक क्लृप्त्या, बदललेल्या खोल्या, जेवणाचे आलेले अनुभव, पाहुण्यांकडून मिळालेली वागणूक, नृसिंह वाडीवर परीक्षेचा सकारात्मक निकाल लागत नाही तोपर्यंत प्रिय गोष्ट म्हणजे मटण खाणार नाही असा केलेला पण, वर्षभरात मिस परांजपे पासून मंदिरात दिसणाऱ्या तरुणींना पाहून हेंदकळणारे तरुण मन अशा सर्व गोष्टींची सरमिसळ या वर्षभरात दिसते. एम.पी.एस.सी.चं हे घोडा मैदान अशा अनेक गोष्टींनी भारुन गेलेले दिसते. यश-अपयशाची मूलभूत जाणीव करुन देणारे अनेक मार्गदर्शकांचे विचार व स्वानुभव याची वाच्यता या त्यांच्या विभागातून होताना दिसते.

## २-आ. १२ 'संयुक्त मोहीम' : अभ्यासाची पराकाष्ठा

याआधी लेखकाने परीक्षेमध्ये अपयश मिळविले होते; पण यानंतरच्या आय.पी.एस. साठीची व उपजिल्हाधिकारी पदासाठीच्या परीक्षांसाठी लेखक जीव तोडून अभ्यास करत होता. अभ्यास करतानाच्या काळात जीवाला थकवणाऱ्या अनेक गोष्टी, प्रलोभने यांच्या प्रसंगांचे कथन लेखक यात करतो. 'लाथ मारील तिथं पाणी काढीन' अशी स्वतःशी प्रतिज्ञा करतो.

त्यासाठी नामदेव ढसाळांच्या कवितेप्रमाणे लेखक 'रक्तात अगणित सूर्य' पेटवतो. यासाठी अत्यंत आवडती गोष्ट-मांसाहार लेखकाने वर्ज केला होता. याची नोंद लेखक "ऐन बाविसाव्या वर्षी मांसाहार व मांसाहारी दृश्यांचा त्याग मला 'अभ्यासयोगी' बनवू लागला होता." या शब्दात करतो. या अभ्यास योग्याच्या हाती यशही मिळत होते. एम.पी.एस.सी.च्या पूर्वपरीक्षेचा निकाल 'पास' या वर्गात लागला होता. त्यामुळे यू.पी.एस.सी. आणि एम.पी.एस.सी.च्या मुख्य परीक्षांची तयारी एकत्रितपणे लेखकाला करायची होती. ही तयारी लेखकाची कसोटी पाहणारी होती. एकूण अत्यंत कठीण असणारे लेखनाचे कौशल्य पणाला लावणाऱ्या परीक्षांमधील पेपरचे वृत्तांकन लेखक करतो. या वृत्तांकनादरम्यान आय.पी.एस.च्या सेवेत असतानाच्या रेव्ह पार्टी केस, ८० वर्षाच्या वृद्ध स्त्रीने दरोडेखोरांसोबत केलेला संघर्ष, बांद्र्यामधील जर्मन मुलीवर झालेला बलात्कार, पुण्याजवळील शिक्रापूर जवळील पोलीस चौकीत हिंसाचाराला बळी पडलेली मुलींची आई अशा काही केसेस लेखक वर्णन करतो. ज्यातून सामाजिक मानसिकता, स्त्रीविषयक प्रतिगामी दृष्टिकोन, आधुनिक-पाश्चात्त्य जीवनशैलीचा स्वीकार, वाढत चाललेला चंगळवाद, नशेत वाहत जाणारी तरुणाई अशा गोष्टींवर लेखक स्वतःचे म्हणणे मांडतो. नव्या पिढीने काय आत्मसात करावे व कशाचा त्याग करावा याची जाणीव करुन देण्यासाठी लेखक अशी अनेक उदाहरणे देतो. हा लेखकाचा वर्तमान काळ आहे. भूतकाळापेक्षा वर्तमानकाळ सतत नव-नव्या गोष्टींनी भारावलेला असतो. पण या वेळी स्वत:चा संयम कसा राखावा व स्वत:च्या ध्येयपूर्तीसाठी कसे झिजावे याची जाणीव नवपिढीला लेखक करुन देतो.

महासागरासारखी खोल, अफाट वाटणारी परीक्षा देत असताना अनेकदा निराशेचे क्षण येतात तेव्हा लेखकाला त्याचे गाव आणि तिथला भवताल जगण्याचे व निराशेतून बाहेर पडण्याचे बळ देतात. "आईची कुशी, बाबांची मांडी, आजीची गोधडी, शाळेची घंटा, बापूचं थिएटर, पतंगाची दोरी, गुऱ्हाळाची गंजी, नदीत उडी, गारीगारची कांडी, बापूची टुरिंग टॉकीज, पारंब्याचा झोका" (पृ. १७४, १७५) अशा एक ना अनेक गोष्टींची यादी लेखक देतो व या सगळ्यातून बळ घेऊन मोहीम फत्ते करतो.

## २-आ. १३ यशाची 'अखेरची पायरी'

याआधीच्या टप्प्यावर लेखकाने यू.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी.च्या मुख्य परीक्षा दिल्या आहेत व त्यांचे निकाल बाकी होते. या टप्प्यावर या दोन्ही परीक्षांचे निकाल सकारात्मक लागतात. पण मुख्य व अखेरची पायरी अजूनही शिल्लक असते आणि ती म्हणजे मुलाखतीची. मुख्य यासाठी की याआधी लेखक मुलाखतीमध्ये नापास होऊन पुन्हा शून्याजवळ आला होता. मुलाखत पास झाला तरच लेखकाला हे दैदिप्यमान यश प्राप्त होणार होते. अन्यथा पुन्हा नव्याने पूर्व परीक्षेपासूनची तयारी करावी लागणार होती. तसेच आयुष्यातील आणखी काही वर्षे-महिने झिजावे लागणार होते. त्यामुळे लेखक मुलाखतीच्या तयारीसाठी जोमाने सुरुवात करतो.

कोणते कपडे घालावीत, कसे बसावे, हॉबी म्हणून काय सांगावे, उत्तरांचा कल स्वत:च्या माहीत असलेल्या ज्ञानाच्या आधाराने कसा उंचावत न्यावा या अशा अनेक गोष्टींची तयारी लेखक करु लागतो. यू.पी.एस.सी.च्या मुलाखती दरम्यानचे किस्से लेखक नमूदही करतो.

लेफ्टनंट जनरल सुरेंद्रनाथ जे यू.पी.एस.सी.चे चेअरमन होते त्यांची असणारी ख्याती, नागपूरच्या उमेदवारासमोर स्वत:चा असलेला कमकुवत बायोडेटा - ज्याचे वर्णन लेखक 'इंद्राचा ऐरावत व गंगू तेल्याची घोडी' या शब्दात करतो. तसेच कमिटीने मुद्दाहून 'मि. नारायणनं' हा चुकीचा केलेला उल्लेख लेखक दुरुस्त करतो. मराठी संदर्भातील 'घाशिराम कोतवाल''या नाटकावर विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना 'स्त्रीलंपट' या शब्दाला इंग्रजीमध्ये 'behind women' असा वापरलेला शब्द. जो नंतर ट्रान्सलेटर 'womaniser' असा दुरुस्त करुन सांगते व सुरेंद्रनाथांनी शेवटी हिंदीमध्ये विचारलेल्या 'इस दुनियामे आप क्यू आये हो?' या प्रश्नाचे उत्तर लेखक 'ला मांचा' या कवीची कविता म्हणून देतो. असे क्षण लेखक नेमकेपणाने वाचकांसमोर मांडतो. या मुलाखतीप्रमाणेच एम.पी.एस.सी.च्या मुलाखतीचेही काही क्षण लेखक वर्णन करतो. या सर्व प्रसंगातून लेखकाचे प्रसंगावधान, चातुर्य, विषयाभ्यासाचे गांभीर्य, समाजचिंतन व प्रामाणिकपणा अशा अनेक गोष्टींचे दर्शन घडते. त्यांच्या या प्रभावशाली गुणामुळेच १५ जून १९९७ ला लेखकाचा निर्णय सकारात्मक लागून लेखक पास होतो. हे यश सहजसाध्य नव्हते. त्यामागे अनेक संघर्षाचे, प्रतिकूल परिस्थितीचे धडे लेखकाने गिरवले होते. लेखकाच्या वडिलांनी लेखकाला पाठविलेल्या पत्रातील "भावड्या, माझे डोळे मिटायच्या आधी तुला लाल दिव्याच्या गाडीतून आलेलं मला बघायचं आहे" (पृ. १८३) हे शब्द लेखकाच्या मुलाखती दरम्यान प्रेरणादायी ठरतात. यातून लेखकाच्या संवेदनशीलतेला चालना मिळत राहते व लेखक या स्पर्धा परीक्षेतील यशाच्या अखेरच्या पायरीपर्यंत पोहोचतो.

## २-आ. १४ आत्मकथानाचे वाङ्मयीन विशेष :

एकूणच आत्मकथन हे ध्येयपूर्तीसाठी संघर्ष करणाऱ्या एका अभ्यासयोग्याची ही कहाणी आहे. आत्मकथनातील लेखकाच्या बालपणापासून ते आय.पी.एस. होईपर्यंतच्या कालखंडातील घडामोडींचा लेखनभाग यात आहे. गाव व गोतावळा ते आय.पी.एस. पदासाठी दिलेली मुलाखत या टप्प्यांतून हे लेखन येते. यामध्ये ध्येयाकडे सरकत राहणाऱ्या एका अभ्यासू व्यक्तिमत्त्वाची जडणघडण वाचकाला होताना दिसते. या कालखंडातील लेखकाच्या आयुष्यातील प्रसंग व अनुभव निवड ही याच अनुषंगाने झाली आहे. हे प्रसंग तपशील पुरविणारे असले तरी त्याची मांडणी मात्र आकर्षित पद्धतीने झाली आहे. प्रसंगांचे वर्णन गणितीय पद्धतीने एका पाठोपाठ एक असे साचेबद्धपणे न ठेवता ते कसे वाचनीय होतील अशा पद्धतीने रचले गेले आहेत. त्यामुळे एकूण लेखनाला वाङ्मयीन मूल्य प्राप्त झालेले आहे. आत्मकथनाचा लेखक हा कोणी साहित्यिक नाही तो एक शासकीय सेवेतील अधिकारी आहे. पण असे असूनही मराठी भाषेची जाण, त्यातील संस्कार त्यांच्या या लेखनातून प्रकर्षाने जाणवतात. त्यांची भाषेवर कमालीची पकड दिसते. प्रसंगांचे नेमके वर्णन, त्या प्रसंग वर्णनापूर्वी आणि नंतर निवेदन, प्रसंगावरील लेखकाचे मनोगत, भाष्य, म्हणी, वाक्प्रचार यांचा सढळ हाताने केलेला वापर, तसेच अनेक ठिकाणी भाषेने घेतलेले अलंकारिक वळण हे सर्व वाङ्मयविशेष या लेखनात दिसून येतात.

लेखकाने पाहिलेल्या अनेक प्रसंगांचे, क्षणांचे अचूक वर्णन हे त्यांच्या लेखनाला विशेष मूल्य प्राप्त करुन देते. त्या त्या क्षणांचे निरीक्षण व त्यातील बारकावे लेखक नेमकेपणाने वर्णनातून टिपतो. असेच एक वर्णन मुंबईतून गावाकडे येणाऱ्या चाकरमाण्यांचे येते. गावाकडे त्याचा

असणारा रुबाब व शहरात असणारे त्यांचे जीवन यातील विरोधाभास लेखक नेमकेपणाने वर्णितो. "मुंबईमध्ये काम करणारा चाकरमानी सुट्ट्यांमध्ये किंवा जत्रेच्या वेळी गावी यायचा, त्यावेळी त्याचा रुबाब काही औरच असे. पांढराशुभ्र सदरा, त्यावर पांढरी पँट व त्यावर पांढरेशुभ्र मॅचिंग सँडलही असायचे. गळ्यात काळ्या रंगाचा, स्वत:च्या रंगाशी जुळणारा मर्फीचा रेडिओ घेऊन तो गावच्या बाजारपेठेतून रुबाबात चालायचा. अनेकदा त्यावेळी त्याच्या पांढऱ्या शुभ्र शर्टावर इस्त्रीनं गुलाबांच्या फुलाचं स्टिकर उमटवलेलं असायचं. त्याच्या या स्टाईलच मला खूप अप्रूप होतं. पण ज्यावेळी मुंबईला आलो व डिलाईट रोडवर वाण्याच्या चाळीत गाववाल्यांच्या दहा बाय पंधराच्या रूमवर या हाफ चड्डीतल्या श्रमवीरांना पाहिलं, तेव्हा माझा भ्रमनिरास झाला." (पृ.१०१) हे चाकरमान्यांचे गावाकडील व शहरातील विरोधाभासी जीवनशैलीचे चित्रण येते. यातून लेखकाची सूक्ष्म निरीक्षण शक्ती ध्यानात येते. अशी गावाकडच्या भवतालाची, माणसांच्या जीवनशैलीची, प्रसंगांची वर्णने येतात. मित्रांसोबतच्या सहवासात घडलेल्या अनेक प्रसंगांचे वर्णन अशाच पद्धतीने होते. लेखकाचा मित्र पांडू पाटील याच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन पुढीलप्रमाणे येते. "विठ्ठलाचा रंग, पिळदार स्नायूंचे शरीर, राकट चेहरा व बेरकी आवाज, मराठी सिनेमातल्या खर्जातल्या खलनायकासारखी दिसणारी ही व्यक्तिरेखा प्रत्यक्षात मात्र कमालीची हळवी व भावनाशील होती." (पृ. १२१) असे वर्णन येते. व्यक्तीच्या बाह्यरंगासोबतच त्याच्या अंतरंगातील गुणांचे वर्णन लेखक करतो व त्याच्या खऱ्या अनुभवलेल्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन वाचकाला घडवून आणतो.

वर्णनासोबतच निवेदनातूनही लेखकाचे भाषिक कौशल्य दिसते. परीक्षेतील उत्तरांचे स्वरूप कसे असावे किंवा त्याचा अभ्यास कशा पद्धतीने केला याचे कथन लेखक करतो. याचे निवेदनात्मक भाष्य करत असताना ते अत्यंत लालित्यपूर्ण व कल्पकतेने लेखकाने पुढील निवेदनातून केले आहे. "पूर्वीच्या पश्नपत्रिकांचा अचूक मागोवा घेऊन बनवलेल्या 'राव'च्या नोट्स दिल्लीहून मागवल्या. या नोट्सचा आराखडा समोर ठेवून त्यामध्ये मूळ पुस्तकांतील इतिहासाच्या पार्श्वभूमीचा मार्मिक आणि तार्किक मसाला भरु लागलो. उत्तरं 'स्पायसी' होऊ लागली. उत्तरांत नकाशांची फोडणी असायची, त्यामुळे उत्तरांची चव वाढू लागली." (पृ. १४०) कल्पक व लालित्यपूर्ण भाषा वापरामुळे अशी निवेदने आकर्षक झालेली दिसतात. तसेच "विचारचक्रं फिरायची आणि पेनाला नेमके शब्द फुटू लागायचे." (पृ. १४१), "गवताचे भाले, तलवारी होतात; तशा माझ्या 'लक्झर'च्या पेनांची रोज शस्त्रं व्हायची." (पृ. १५४), "बोटांमध्ये पेनानं 'पेन' होईपर्यंत स्वच्छ, सुंदर अक्षरांमध्ये पेपर सोडवला." (पृ. १६९), "टोप्या घातलेले टपोरे शब्द बघून मन हरवून गेलं." (पृ. १६९) किंवा "'मी' समाजशास्त्र निवडून गळ्यात धोंडा बांधून परीक्षेच्या नदीत उडी मारली आहे, हा धोंडा मला बुडवणार; अशी भीती वाटू लागली." (पृ. १११) "म्हणून पुन्हा मनाचा पदर घट्ट खोचला" (पृ. १०७) अशी ही निवेदनाची भाषा लालित्यपूर्ण होताना दिसते. पेनाचे शस्त्र होणे, बोटामध्ये पेनाने पेन होणे म्हणजेच (वेदना होणे), अक्षरांवरील रेषा म्हणजे त्यांनी टोप्या घालणे, मनाचा पदर घट्ट खोचणे यासारख्या अनेक आलंकारिक रचना लेखनाला आलंकारिकतेकडे नेतात. काही वेळा आवाजांचे जग मानवी व्यक्तिमत्त्वाच्या वर्णनासाठी लेखक वापरतो. उदा. शेषन साहेबांचे व्याख्यान म्हणजे, "पत्र्याच्या डब्यात गोट्या

टाकल्यावर येतो; तसा त्यांचा ऐकलेला खडखडणारा आवाज" असल्याचे लेखक सांगतो. या निवेदनातून साहित्यिक गुणांचा परिचय होतो.

निवेदनातून उभे राहणारे प्रसंग हे सूक्ष्म निरीक्षण व संवेदनशील मनाने टिपलेले आहेत. यातील एक निरीक्षण लेखकाची समाजोन्मुखता स्पष्ट करणारा आहे. आंबिवली मध्ये रूम करुन राहत असताना लेखक ज्या मेसवर जेवणासाठी जात होता तेथील खानावळीचा मालक आणि त्याची बायको यांच्या संभाषणाचा नमुना देऊन दोघांमधील शिवराळ भाषा वाचकांना ज्ञात करुन देतो. नवरा बायकोला बोलवताना भटकभवानी, सटवाई, चेटकीण अशा लाडीक शिव्या देतो याचा नमुना लेखक देतो. "अहो चेटकीण बाई, ऑफिसलो चाललो हा; येताना तुमच्या कुत्रीच्या पिलांसाठी अभ्यासाचं काही आणायचं आहे का?" (पृ. १२९) अशा शब्दात संवाद साधताना दिसतो. यात पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यामध्ये स्त्रीला दिला जाणारा दुय्यम भाव हे सूक्ष्म निरीक्षणातून लेखक मांडतो.

एखादा विशिष्ट प्रसंग नेमका, अचूक अशा पद्धतीने वाचकांच्या मनात उभा करण्यासाठी वातावरण निर्मितीचे तत्त्व लेखक अनेक ठिकाणी वापरताना दिसतो. "पावसाळ्याचे दिवस होते. रापराप पाऊस पडायचा. मी राहत होतो, ती ओसाड इमारत होती. माझ्या खोलीच्या मागे किट्ट झाडी होती. अनेकदा इराणी गुंडांची टोळी मोटारसायकलवर बाहेर येऊन उभी असायची." (पृ. १२५) अशी वातावरण निर्मिती होताना दिसते. असे वर्णन निवेदन, वातावरण निर्मिती व आलंकारिक भाषेच्या वळणातून आत्मकथन साकारताना दिसते.

यश-अपयश यातील द्वंद्वभाव सांगणारी, निर्देशित करणारी वाक्ये आत्मकथनात अनेक ठिकाणी येतात. उदा. "जिकांयची मजा तेव्हाच आहे, जेव्हा अनेक जण तुमच्या पराभवाची आतुरतेनं वाट पहात असतात." (पृ. १२२, १२३) किंवा "यश हे अंतिम नसतं, तसं अपयशही अखेरचं नसतं." (पृ. १२३) 'यशाच्या मागे धावता धावता अपयशाने ठेचकळणारा (लेखक) गलितगात्र" दिसू लागे. मुंबईतील आंबिवलीमध्ये भावाच्या खोलीत राहणारा लेखक स्वत:चे वर्णन "खुंट असणारी दाढी, गोल गळ्याचा टी शर्ट व जीन्सच्या वर स्लीपर अशा पेहरावामुळे सुशिक्षित भिकाऱ्यासारखा दिसायचा." अशा शब्दात करतो. लेखकाच्या या दिसण्यावरुन अनेक पाहुणे "वाया गेलेला हुशार मुलगा" या शब्दात अवहेलना करायचे.

या सर्व विशेषांबरोबरच आत्मकथनातील वाङ्मयीन विशेष हे वाक्प्रचार आणि म्हणींच्या वापरातूनही दिसतात. खूप मोठा आशय नेमक्या व मोजक्या शब्दात सांगण्याचा पारंपरिक हातोळा लेखक इथे वापरताना दिसतो. 'शेंडी तुटो की पारंबी', 'कुंपणच शेत खायला लागलं', 'लाथ मारीन तिथे पाणी काढेन', 'वाघ्याला वाघ्या म्हणा किंवा वाघोबा तो खाणारच' (१८२), 'बुडत्याला काडीचा आधार' (पृ. १९१) यासारखे वाक्प्रचार येतात. तर अशाच पद्धतीने म्हणींचाही वापर लेखनात होताना दिसतो. 'गावाकडनं आलं येडं आणि बर्फीला म्हणतंय पेढं' (पृ. ९२), 'रात्र थोडी, सोंग फार' (पृ. ११०), 'वासरात लंगडी गाय शहाणी' (पृ. ११४), 'नाव सोनूबाई, हाती कथलाचा वाळा' (पृ. १२०), 'धरलं तर चावतंय, सुटलं तर पळतंय' (पृ. १५२), 'घर का न घाट का' (पृ. १५२) यासारख्या कितीतरी म्हणी कथनातील प्रसंगावधानता नेमकेपणाने सूचित करण्यासाठी येतात.

एकूणच संपूर्ण आत्मकथनातील भाषाशैली ही लक्षणीय आहे. प्रसंगवर्णने, निवेदन, भाषेचा कलात्मक वापर, वाक्प्रचार व म्हणींचा सढळ हाताने केलेला वापर यामुळे या आत्मकथनाला वाङ्मयीन मूल्य प्राप्त होते.

### आपली प्रगती तपासा

प्रश्न-१ तुम्ही अभ्यासलेल्या कोणत्याही आत्मकथनातील तुम्हाला भावलेल्या घटना-प्रसंगांचे चित्रण करा.

## २-आ. १५ सारांश

५ ऑक्टोबर १९७३ ला लेखकाचा जन्म झाला. १९८० ला Commissioner of Police पदी निवड होऊन २०२१ पर्यंत सातत्याने सरकारी नोकरीत कार्यरत. १९७३ ते २०२० या कालखंडातील एका यशस्वी व्यक्तीच्या आयुष्यात घडणाऱ्या बऱ्या-वाईट घडामोडींचा इतिहास यात येतो. लेखकाने बालपणातून एक यशस्वी सरकारी अधिकारी होईपर्यंतच्या काळात लेखकाच्या आयुष्यात आलेल्या व अनुभवलेल्या अनेक व्यक्ती, घटना-प्रसंगांचे अनुभवांचे हे चरित्र आहे. लहानपणापासून काहीतरी मिळवले पाहिजे, ते मिळवण्यासाठी कष्ट केले पाहिजे याची जाणीव व ध्येय बाळगणारी ही व्यक्ती आहे. एखादी व्यक्ती प्रसिद्ध असते तेव्हा तिची प्रसिद्धी आपल्याला आश्चर्यचकीत करत असते. पण या प्रसिद्धीच्या मागे त्या व्यक्तीने उपसलेले कष्ट, त्याच्या अज्ञात पैलूंबद्दलची मांडणी आत्मकथनात - चारित्रात येत असते. याही आत्मकथनात एका यशस्वी अधिकाऱ्याचा संघर्ष कथन झाला आहे. जो नव पिढीला अत्यंत प्रेरणादायी आहे.

## २-आ. १६ संदर्भ ग्रंथ


- नांगरे-पाटील, विश्वास : 'मन में है विश्वास', राजहंस प्रकाशन, पुणे. प. आ. २०१६, सव्विसावी जनावृत्ती २०२१.
- राजाध्यक्ष, विजया (सह. संपा.) : 'मराठी वाङ्मयकोश', खंड चौथा, म.रा.सा.सं.मं., २००२, मुंबई.


munotes.in

## २-आ. १७ संभाव्य प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. आत्मकथनातील लेखकाच्या बालपणीचे चित्रण तुमच्या शब्दात करा.

२. लेखकाला स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शक ठरलेल्या गोष्टींचे वर्णन करा.

३. लेखकाच्या आयुष्यात घडलेल्या महत्त्वाच्या घटना प्रसंगांचे कथन तुमच्या शब्दात करा.

**ब) टीपा लिहा.**

१. लेखकाचा गाव आणि गोतावळा

२. संयुक्त मोहीम

३. आत्मकथनाचे वाङ्मयीन विशेष

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. नरसिंह वाडीवर गेल्यानंतर परीक्षेचा निकाल लागत नाही तोपर्यंत लेखक आपली कोणती आवडती गोष्ट वर्ज्य करतो?

२. लेखकाच्या बहिणीचे नाव काय?

३. कोणाच्या व्याख्यानानंतर लेखक स्पर्धा परीक्षा द्यायचा निर्णय घेतो?

❖❖❖❖

munotes.in

# ३

## 'जसं घडलं तसं' - नीलम माणगावे

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ लेखिकेचा परिचय

३.२ प्रस्तावना

३.३ आत्मचरित्राचे/ आत्मकथनाचे स्वरूप

३.४ स्त्रियांची आत्मकथने

३.५ 'जसं घडलं तसं' आत्मकथनाचा आशय

३.६ 'जसं घडलं तसं' आत्मकथनाचे महत्त्व

३.७ आत्मकथनाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये

३.८ सारांश

३.९ संदर्भग्रंथ

३.१० पूरक वाचन

३.११ संभाव्य प्रश्न

## ३.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्दिष्टे साध्य करता येतील.

- प्रस्तुत घटकातून आत्मकथन या साहित्यप्रकाराचे स्वरूप, संकल्पना ध्यानात येईल.
- आत्मकथन प्रवाहातील स्त्रियांची आत्मकथने व त्यांचे महत्त्व ध्यानात येईल.
- या अभ्यासक्रमासाठी निवडलेल्या 'जसं घडलं तसं' या नीलम माणगावे यांच्या आत्मकथनाचे विशेष लक्षात येतील.
- स्त्री आत्मकथन परंपरा आणि 'जसं घडलं तसं' या आत्मकथनाची सामर्थ्यस्थाने लक्षात येतील.
- नीलम माणगावे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व लक्षात घेऊन व त्यांचा समकाल समजून घेता येईल.
- एकूण वाङ्मय परंपरेत लेखकाचे योगदान समजून घेता येईल.

munotes.in

## ३.१ लेखिकेचा परिचय

लेखिका नीलम माणगावे यांचा मराठी साहित्यपरंपरेत महत्त्वपूर्ण असा लेखनप्रवास आहे. सांगली जिल्ह्यातील जयसिंगपूर येथे नीलम माणगावे स्थायिक आहेत. त्यांनी कथा कादंबरी, कविता, बालसाहित्य, कुमारसाहित्य, लोकसाहित्य, सामाजिक, वैचारिक व समीक्षात्मक स्वरूपाचे लेखन केले असून काही महत्त्वाच्या ग्रंथांचे संपादनही केले आहे. 'किती सावरावा तोल', 'शांते तू जिंकलीस!' (कादंबरी), 'गाथा उत्क्रांतीची' (कवितासंग्रह), 'निर्भया लढते आहे' (कथासंग्रह), 'गौरी आणि चमेली'(बालकादंबरी), 'डॉलीची धमाल' (बालसाहित्य), 'आपला तो बाब्या' (शैक्षणिक) अशी काही त्यांची महत्त्वाची साठेएक पुस्तके प्रकाशित आहेत. त्यातील तीन पुस्तकांना महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा 'बाबुराव बागूल पुरस्कार' (कथासंग्रह), महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'कुसुमाग्रज पुरस्कार'(कवितासंग्रह) तसेच 'निर्भया लढते आहे' या कथासंग्रहासाठी 'दिवाकर कृष्ण' पुरस्कार, दीपा निसळ स्मृती पुरस्कार, अहमदनगर (जसं घडलं तसं) असे नावजलेले जवळजवळ वीस पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. तसेच आकाशवाणीवरून कथा व कवितांचे वाचन व कौटुंबिक स्वरूपाचे श्रुतिकालेखन त्यांनी केले आहे. विविध वर्तमानपत्रातून त्यांनी बहुमोल स्वरूपाचे सदरलेखनही केले आहे. बालकुमार साहित्य संमेलन, नेसरी व ग्रामीण युवा साहित्य संमेलन, चिंचवाड या संमेलनाचे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले आहे. स्त्रीजीवन हा त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या कथा, कविता, कादंबरी व सदरलेखनातून स्त्रीजीवनाचा विविधांगी पट त्यांनी मांडला आहे. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक दबावामुळे स्त्रियांची होणारी कुचंबना हा त्यांच्या लेखनाचा केंद्रिभूत विषय आहे.

## ३.२ प्रस्तावना

साहित्याचा अभ्यास करत असताना साहित्याच्या विविध प्रकारानुसार अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. साहित्याचे कविता, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन, प्रवासवर्णन इ. अनेक प्रकार योजिले जातात. या प्रत्येक प्रकाराचे अंतरंग आणि बाह्यरंग दोन्ही वेगवेगळे आहेत. आकृतिबंध, आशय, भाषाशैली इ. घटकांतून हे वेगळेपण दिसून येते. प्रस्तुत अभ्यासक्रमामध्ये आपल्याला साहित्याचा आत्मकथन हा प्रकार अभ्यासावयाचा आहे. 'आत्मकथन' या शब्दाची फोड केली असता यामध्ये 'आत्म' आणि 'कथन' अशा दोन संज्ञा पुढे येतात. पैकी 'आत्म' म्हणजे स्वतःच्या जीवनानुभवासंबंधीचे कथन करणे म्हणजे सांगणे. म्हणजे स्वतःच्या जीवनाचे सत्य कथन करणे होय. हे कथन म्हणजे मूल्यगर्भ दृष्टिकोनातून 'स्व'चा घेतलेला शोध होय. स्वत्वाकडून समाजोन्मुख होण्याचा प्रयत्न म्हणजे आत्मकथन होय. यामध्ये 'स्व'जीवनाचे संपूर्णतः चित्रण असते किंवा विशिष्ट कालखंडातील जीवनघटनांचे चित्रणच यात असते. यापूर्वी आत्मकथन या साहित्यप्रकाराचे स्वरूप, वैशिष्ट्ये आपण अभ्यासले आहे. यासोबत आत्मकथनाचा प्रत्यक्ष अभ्यास म्हणून आपण नव्वद नंतरच्या कालखंडातील नीलम माणगावे लिखित 'जसं घडलं तसं' हे आत्मकथन अभ्यासायचे आहे.

हे आत्मकथन म्हणजे नीलम माणगावे यांचा आणि त्यांच्या आईचा जीवनसंघर्ष आहे. खरेतर हा जीवनसंघर्ष म्हणजे भारतीय समाजजीवनातील बाईचा आहे. कुटुंब, नातेवाईक, घर, गाव, समाज, धर्म, संस्कृती, परंपरा या सर्वांसोबतचा हा लढा आहे. माणूस म्हणून जगू पाहणाऱ्या लोकांवर इथली शोषणव्यवस्था कशा पद्धतीने वर्चस्व गाजवते, यामध्ये घुसमटल्या जाणाऱ्या स्त्री-जीवनाचा हा पट आहे. याबद्दल लेखिका म्हणतात, "त्यात कुटुंबाबरोबरच गल्ली, गाव, समाज, नातेवाईक, धर्म, रूढी, परंपरा, परिस्थिती या सर्वांचा एक बेहिशोबी परिपाक आहे." (पृ.५) यातील लेखिकेचा व त्यांच्या आईचा संघर्ष म्हणजे मूलभूत हक्कांसाठीचा विविध पातळ्यांवरील लढा आहे. समाजस्तरातील विविध विभाजीत घटकांतील स्त्री जीवनाचा आणि त्यांच्या संघर्षाचा आलेख या आत्मकथनातून मांडला आहे.

## ३.३ आत्मचरित्राचे/ आत्मकथनाचे स्वरूप:

आत्मचरित्र लेखनाच्या प्रेरणा किंवा उद्देश हे वेगवेगळे असतात. आपले जगणे जसे आहे तसे, कोणताही आडपडदा न ठेवता आपल्या भावना व विचारांसहीत जाणकार वाचकांपुढे ठेवण्याच्या उद्देशाने आत्मचरित्राचे लेखन होत असते. काही वेळा याचे स्वरूप आपल्या जगण्यात होऊन गेलेल्या चुकांची कबुली देण्यासाठी, त्यामुळे दुखावलेल्या माणसांच्या क्षमा मागता येण्यासाठी किंवा स्वतः अनुभवलेल्या दुःखाची सल बोलता यावी म्हणूनही आत्मचरित्राचे लेखन होते. पण बहुतांश आत्मचरित्रे ही आपल्या जीवनाची गाथा प्रांजळपणाने जाणकार वाचकांना सांगावी या हेतूतून निर्माण झालेली आहेत. आत्मचरित्राचा कर्ता हा केवळ एक व्यक्ती असला तरी त्याच्यासोबत जोडलेल्या अनेक व्यक्तींच्या जगण्याचे संदर्भही त्यामध्ये असतात. त्या अनुरोधाने संपूर्ण समाज, तिथल्या प्रथा-परंपरा, रूढी, समज, गैरसमज, राजकीय, आर्थिक, धार्मिक वातावरण यांचेही जोडलेपण त्यामध्ये असते. या सर्वांमुळे स्त्री-पुरुषांचे, लहान-मोठ्यांचे आयुष्य व्यापून राहिलेले असते. त्यामुळे आत्मचरित्रात या सर्वांचे संदर्भ म्हणजेच त्या व्यक्तीच्या जगण्याचे संदर्भ ठरत असतात.

सामान्यपणे आयुष्य किती सुंदर आहे याची जाणीव भूतकाळात घडलेल्या घटनांच्या आठवणीसरशी होणारी असते. काही घटना, आठवणी विरंगुळा निर्माण करणाऱ्या असतात. ते जग पुन्हा नव्याने जगण्याची आस निर्माण करणाऱ्या असतात. पण जीवन हे सुख आणि दुःख अशा दोन्हींच्या मिश्रणाचा भाग असतो. सुखाचे क्षण हे दुःखावर फुंकर घालणारे असतात. त्यामुळे दोन्हीचे आगमन एकापाठोपाठ एक असे होत असते. आत्मचरित्र लिहिण्यामागे आपल्या जीवनातील सुखात्मता व्यक्त करणे हा एकमेव हेतू असत नाही. त्यामुळे आत्मचरित्रातून उद्धृत होणाऱ्या घटना ह्या केवळ सुखदच असतात असे नाही. तर काही क्लेष देणाऱ्या, दुःख देणाऱ्या, भरून आलेल्या जखमेला पुन्हा वाहतं करणाऱ्या, मनाच्या खोल कप्प्यात दडपून गेलेल्या असतात. ज्याची सल बोचरी असली तरी ती कोणालातरी सांगितल्यानंतर त्याचे ओझे हलके झाल्यासारखे वाटते. अशा लेखनकृतीचा विषय खुद्द लेखकच असतो. त्यामुळे काहीवेळा त्रयस्थपणे स्वत:बाबत घडलेल्या घटनांचे विश्लेषण लेखकाला करावे लागते. त्याबाबतचे चिंतन मांडावे लागते. क्रिया-प्रतिक्रिया नोंदवाव्या लागतात. त्या प्रतिक्रिया कुणावरही आग ओकणाऱ्या असू नयेत याचीही काळजी

लेखकाला घ्यावी लागते. तसेच ज्या व्यक्तींमुळे आपल्याला हे भोगावे लागले त्यांना तुटकपणे मांडणे हेही योग्य असत नाही.

हे सर्व मांडत असताना केवळ घटनांच्या नोंदी करत पुढे जाणे योग्य नसते. तर त्यासोबतच जगलेल्या आयुष्याबद्दलच्या आत्मियतेसोबतच ते वाचनीय होण्याकडेही लेखकाला लक्ष पुरवावे लागते. साधारणत: अशा स्वरूपाने आत्मकथन साकारत असते. आत्मकथनाचे हे स्वरूप पाहिल्यानंतर मराठी साहित्यात आत्मकथनाची जी परंपरा आहे त्यातील स्त्रीलिखित आत्मकथनाचा आढावा आपण इथे थोडक्यात घेऊ.

## ३.४ स्त्रियांची आत्मकथने

स्त्रियांनी लिहिलेल्या एकूण आत्मचरित्रातील एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे कुटुंबापासून समाजापर्यंत अनेकांकडून त्यांचे झालेले अपार शोषण होय. आणि याविरुद्ध सतत लढा देत त्यांचे टिकून राहणे, त्यांची जिद्द याचा परिचय त्यांच्या या आत्मकथनातून येतो. समाजरचनेतील दुय्यम स्थान, जात, वर्ग, प्रथा, परंपरा, संस्कृती, पुरुषसत्ताकता इ. अनेक कारणामुळे मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेला स्त्रीजीवनाचा पट स्त्रियांच्या आत्मकथनातून आविष्कृत होतो. कुटुंबापासून ते समाजापर्यंत विविध मर्यादांचे कधी पालन तर कधी विरोध-विद्रोह करत यशस्वी झालेल्या स्त्री जीवनाची चित्तरकथा म्हणजे स्त्रियांची आत्मकथने होत. स्त्रियांच्या आत्मचरित्रातील पहिले आत्मचरित्र म्हणजे रमाबाई रानडे यांनी १९९० मध्ये लिहिलेले 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे होय. आपल्याला स्त्री म्हणून वाट्याला आलेल्या दुःखाची आणि शोषणाची निखळ भाषेतील मांडणी म्हणजे हे आत्मचरित्र म्हणावे लागेल. सोसलेल्या दुःखाला अलवार शब्दात मांडून स्त्री हृदयाच्या औदार्याची प्रचिती या आत्मकथनातून होते. अशी अनेक चरित्रे या कालखंडात लिहिली गेली. त्यानंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९६० नंतरचा-नव प्रवाहांच्या उदयाचा. यातील दलित साहित्य प्रवाहात आत्मकथन हा साहित्य प्रकार अधिकतेने हाताळला गेला. स्त्री–पुरुषांनी आतापर्यंत मराठी साहित्यात न अवतरलेल्या दलित जीवनातील दुःख, वेदनांचे वास्तव चित्रण केले. वर्ग आणि लिंग या दोन्हीमध्ये दुय्यम स्थानावर असणा-या स्त्रियांच्या जीवनातील दुःख तर पराकोटीचे होते. त्याची मांडणी स्त्रियांच्या आत्मकथनातून झाली आहे .

दलित आत्मकथनामधील शांताबाई कांबळे यांचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा' हे पहिलेच आत्मकथन होय. जीवनप्रवासातील वाचकांना व्यथीत करणारे प्रसंग शांताबाईंच्या या आत्मकथनात येतात. या ना त्या प्रकारे सोशिक स्त्रियांचे मनोगतच त्यांच्या आत्मकथनातून व्यक्त होते. 'सांगत्ये ऐका' (हंसा वाडकर), 'अजून चालतेच वाट' (आनंदीबाई विजापुरे), 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' (मलिका अमर शेख), 'अशी मी जयश्री' (जयश्री गडकर), 'स्मृतितरंग' (इंदिरा मायदेव), 'स्नेहांकिता' (स्नेहप्रभा प्रधान), 'जेव्हा माणूस जागा होतो' (गोदावरी परुळेकर), 'आहे मनोहर तरी' (सुनीताबाई देशपांडे), 'पानाआडचं फूल' (आशालता सावे), 'नाच ग घुमा' (माधवी देसाई), 'भोगले जे दुःख त्याला'...(आशा अपराद) इ. आत्मकथनातून भिन्न काळातील वास्तव स्त्री जीवनाचे चित्रण आले आहे. सर्वच स्त्रिया या 'दलित', 'दुय्यम' या गटातच मोडतात याची प्रचिती स्त्रियांच्या या आत्मकथनांनी मराठी साहित्याला करून दिली आहे.

आत्मकथनातील घटना-प्रसंग हे कार्यकारणभावाने जोडलेले असतात. यामध्ये कथनकर्त्याच्या जाणिवा महत्त्वाच्या असतात. काहीवेळा प्रसंगांची पुनरावृत्ती होत असते. व्यक्तीच्या खाजगीपणाला महत्त्व असते. काही गोष्टींची वाच्यता ही स्वतःसाठी हानीकारक असू शकते याची जाणीव लेखकाला असते. काहींच्या उल्लेखामुळे आपली प्रतिमा डागाळेल, लोकांच्या नजरेतील आपले स्थान दुय्यम होईल या भीतीपोटी अनेक खाजगी जीवनातील घटना-प्रसंग-भावनांचे चित्रण टाळले जाते. स्त्रियांच्या बाबतीत हा मुद्दा आवर्जून उपस्थित होतो. गतकालातील होऊन गेलेल्या घटनेच्या उच्चाराने वर्तमान आणि भविष्यकाळ गढूळणार असेल तर स्त्रिया असे करत नाही. यामध्ये संस्कृती, परंपरा म्हणून स्त्रियांचे मर्यादशील असणे म्हणजे तिची समाजात चांगली प्रतिमा असते. म्हणून असे लोकांना कळू न देणे हे त्यांच्यासाठी फायद्याचे नसते. कुणा एका प्रसिद्ध व्यक्तीचे, समूहगटाचे नाव यातून बाधित होऊ शकते याचीही जाणीव त्यांना असते. व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाज हे विविध नात्यांनी परस्परांशी गुंतलेले असतात. त्यामुळे हे खाजगीपण जपले जाते. पण असे असतानाही लोकांच्या विचारांची तमा न बाळगता सर्व सत्य मांडण्याचे धाडस काही लेखिकांनी केलेले आहे. मलिका अमर शेख यांच्या 'मला उद्ध्वस्त व्हायचंय, या आत्मकथनाचा उल्लेख इथे करावा लागेल. त्यांच्या आत्मकथनातून येणारा धीटपणा हा उल्लेखनीय आहे. जो की दुसऱ्या स्त्री आत्मकथनातून दुर्मिळतेने दिसतो. पण काही आत्मकथने ही तितकीच निर्भिड आहेत. एकोणिसाव्या - विसाव्या शतकाच्या तुलनेत एकविसाव्या शतकातील स्त्रियांच्या राहणीमानात बदल झाला. पण स्त्रीचा सामाजिक दर्जा, त्यांचे हक्क, आर्थिक आणि धार्मिक क्षेत्रातील स्थान यातील बदल मात्र काही अंशानेच फक्त बदललेला होता. या सर्व पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकात प्रकाशित झालेले स्त्री आत्मकथन म्हणून नीलम माणगावे यांच्या 'जसं घडलं तसं' या आत्मकथनाचा अभ्यास आपण करणार आहोत.

## ३.५ 'जसं घडलं तसं' आत्मकथनाचा आशय

लेखिका नीलम माणगावे यांचे बालपणातील नाव तारा. रुकडी हे ताराचे गाव. ताराचे आजोबा (वडिलांचे वडील) राघोबा पाटील हे शंभर एकर शेतीचे मालक होते. त्यांनी स्वत:च्या हिमतीवर रुकडीमध्ये एकरभर आवारात चौसोपी वाडा बांधला होता. मुख्य घराला दहा आखणी खोल्या होत्या. गडीमाणसं, जनावरं, दूध-दुभतं, बारा बलुतेदार, दररोजचा शंभरेक माणसांचा वावर घरात असायचा. वाड्यातल्या बायका बग्गीशिवाय बाहेर कुठेही जायच्या नाहीत. असे वाड्याचे वैभव होते. राघोबा पाटलांना दोन मुली आणि दोन मुलगे. भिमगोंडा, पिरगोंडा हे दोन मुले आणि रुक्मिणीबाई, लक्ष्मीबाई ह्या दोन सुना.

एकदा प्लेगच्या साथीत वाड्यातली शंभरभर माणसं किड्या मुंग्यांसारखी पटापट मेली. यात राघोबा पाटलांची दोन्ही मुलं गेली. राघोबा पाटील बचावले पण त्यांचा वंश पुढे चालवणारा एकही वाचला नाही. विधवा सुनांना बघणारे हवालदील पाटील पुढे प्लेगच्या साथीनंतर चुकार उंदीर चावल्याचे निमित्त होऊन मृत्यूमुखी पडले. भल्यामोठ्या वाड्यात लक्ष्मीबाई आणि रुक्मिणीबाई उरल्या. त्यातील लक्ष्मीबाईला एक मुलगी होती. रुक्मिणीबाई ही वयाने खूपच लहान होती. बालविधवा म्हणून तिने आपले सारे आयुष्य आपल्या माहेरी म्हैशाळला व्यतीत केले.

ताराचे वडील (रायगोंडा पाटील) यांना रुक्मिणीबाईने दत्तक म्हणून घेतले होते. रुक्मिणीबाईने राघोबा पाटलांच्या एका मुलीच्या मुलग्याला दत्तक म्हणून घेतले. ज्यांचे नाव रायगोंडा पाटील. हे रायगोंडा पाटील म्हणजे ताराचे वडील होय. ही दत्तक योजना अशी होती की लक्ष्मीबाईच्या मुलीशी प्रथम रायगोंडा पाटील यांचे लग्न लावून द्यायचे आणि मगच रुक्मिणीबाईंनी त्यांना दत्तक घ्यायचे. कारण आधीच दत्तक घेतले असते तर त्या दोघांचे नाते बहीण भावासारखे झाले असते. म्हणून आधी लग्न करवून मगच त्यांना दत्तक घेतले होते. ही दत्तक योजना म्हणजे सर्व संपत्ती घरातल्या घरात राहणार होते. यात बाहेरचा कोणीही भागीदार असणार नव्हता. ताटातले वाटीत आणि वाटीतले ताटात अशातला हा प्रकार होता. पण काही दिवसांनी लक्ष्मीबाईंनी दुसऱ्याच एका मुलाला दत्तक घ्यायचे ठरवले. तेव्हा भडकलेल्या जावयाने लक्ष्मीबाईंचा गळा दाबून खून केला व पोतंभर मीठ घालून त्यांच्या मित्रांच्या सोबतीने शेतातच पुरुन टाकले. या गोष्टीचा कुणालाही पत्ता लागत नाही. पण ताराच्या वडिलांना झोपेत बडबडण्याची सवय असल्याने ते स्वतःच तो खून केल्याचे आणि प्रेत शेतात पुरल्याचे बोलून जातात. वडिलांनी स्वतः खून केला नव्हता तर त्यांच्या मित्रांकडून करवून घेतला होता. त्यामुळे त्यांना या खूनाच्या आरोपात फक्त दोन वर्षाची शिक्षा होते व मित्रांना चौदा वर्षांची. ते तुरुंगात असताना लक्ष्मीबाईच्या मुलीचा म्हणजे ताराच्या वडिलांच्या पहिल्या बायकोचा बाळंतपणात मृत्यू होतो. दत्तक आई त्याला सोडून माहेरी जाऊन राहते. त्यांच्या चांगल्या वागणुकीमुळे त्यांची लवकर सुटका होते व ते पुन्हा गावी येतात. यादरम्यान राघोबा पाटलांच्या वाड्याचा निर्वंश झाल्यामुळे त्या वाड्यात त्यांचा चुलतभाऊ राहत असे. त्याचे स्थान गावाने मान्य केलेले असते. ते काही दिवसांनी वाड्याबाहेर पडतात. पण ताराचे वडील हयात असताना आणि नसतानाही ते या ना त्या प्रकारे त्या कुटुंबाला त्रास देत राहतात. ताराचे वडील दुसऱ्या लग्नासाठी प्रयत्न करतात. याच दरम्यान दत्तकपत्र रद्द व्हावे म्हणून केलेली केस अजून चालू असते. लेखिकेचे वडील यासंदर्भात सहानुभूती मिळावी व हे दत्तकपत्र रद्द होऊ नये म्हणून न्यायाधिशांना लांबलचक पत्र लिहितात. ज्यामुळे या केसचा निकाल वडिलांच्या बाजूने लागतो.

ताराच्या वडिलांचे लक्ष केवळ चैन आणि इतर गोष्टींकडेच असायचे. शेताची, वाड्याची दुरावस्था तर अटळ होती. बायकोला छळणे, मारणे, शिव्या देणे हा त्यांचा प्रकार असायचा. पण ते गेल्यानंतर अख्ख्या गावाने ताराच्या आईला व सबंध कुटुंबाला छळले. ताराच्या आईचे वाड्यातील स्थान, तिचे अधिकार अमान्य करून विधवा असहाय्य स्त्री म्हणून तिच्यावर अधिकतर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. की ज्यामुळे ती ते घर, शेत सोडून निघून जाईल. पण जिद्दी असणाऱ्या ताराच्या आईने आपला अधिकार सोडला नाही. तालमीतील मुलं उगाचच "काकू मेली रे मेली" म्हणून ओरडत असत. ती अनेक वाईट प्रसंगांना सामोरे जात स्वतःच्या मुलींना मोठे करते. बालपणातील तारा, तिने पाहिलेला भवताल, मतलबी माणसांचे जग, श्रद्धा आणि धर्म म्हणून येणारे लादलेपण, आई-वडिलांच्या नात्यातील ताण, आईचा परिस्थितीविरोधातील संघर्ष या सर्वांचे चित्रण या आत्मकथनातून आला आहे.

आत्मकथनाचा प्रारंभ हा ताराचे कुटुंब, त्यांची परंपरा, इतिहास व त्यानंतर आईचा संघर्ष याने भारलेला आहे. गावातील श्रीमंत असूनही कसे होत्याचे नव्हते झाले याचा इतिहास येतो. या सर्व घडामोडीत ताराच्या आईने अनेक प्रकारचा सोसलेला अन्याय कथन केला आहे. तसेच तिच्या संघर्षाच्या अनेक तऱ्हाही यातून कथन झाल्या आहेत.

munotes.in

## ३.६ 'जसं घडलं तसं' आत्मकथनाचे महत्त्व:

स्त्री लिखित आत्मकथनामध्ये नीलम माणगावे याच्या आत्मकथनाचे विशेष महत्त्व आहे. स्त्रीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन, स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान अशा अनेक कारणांनी स्त्री व तिच्या जीवनाचा पट या आत्मकथनात आहे. तसेच साहित्यिक मूल्य म्हणून या कथनात येणाऱ्या अनेक बाबी महत्त्वाच्या ठरतात. या अनुषंगाने आत्मकथानातील लेखिकेचा जीवनपट, सामाजिक, सांस्कृतिक पट व आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्य या आधारे हे महत्त्व आपल्याला इथे तपासायचे आहे.

### १. लेखिकेचे बालपण:

आत्मकथनातील मी म्हणजे लेखिका नीलम माणगावे. त्यांचे मूळचे नाव ताराबाई आणि शाळेतील नाव म्हणजे नीलम. या आत्मकथनातील 'स्व' म्हणजेच तारा. लेखिकेने त्यांच्या बालपणापासून ते कळत्या वयातील जीवनात स्थिरस्थावर होईपर्यंतचा काळ या आत्मकथनात कथन केला आहे. यातील बऱ्याच आठवणी या न कळत्या वयातीलच आहेत. कळत्या वयाबरोबर बदलत गेलेल्या मानवी वागणुकीचे संदर्भ तीक्ष्ण आणि तीव्र आहेत. बालपणाकडेही याच कळत्या वयातून बघितले आहे. त्यामुळे बालपणी तारावर आणि कुटुंबावर बेतलेल्या प्रसंगाची चर्चा कळत्या वयाने केलेली आहे. तो काळ भोगून झालेला आहे. त्या काळातल्या भोगलेल्या वेदना जितक्या तीव्र नव्हत्या तितक्या तीव्र त्या कळत्या वयातल्या अर्थाच्या स्पष्टीकरणाने झालेल्या आहेत. तसेच बालपणातील काही सुखद आठवणी आत्मकथनातून अगदी सहजगत्या येतात.

अनेक रम्य घटनांच्या आठवणी ताराच्या मनाला आनंद मिळवून देतात. शाळेतील काही सुखद आठवणी लेखिका इथे नमूद करते. शाळेत शेती हा विषय शिकवला जायचा. हा तास म्हणजे धान्य, कडधान्यं, शेतीची अवजारं, खतं, बी-बियाणं, वनस्पती सगळ्यांची ओळख करून देणारा तास. या सर्वांची प्रात्येक्षिके या तासाला व्हायची. पावसाळा सुरू होण्यापूर्वी पेरणीसाठी भुईमुगाच्या शेंगा फोडल्या जायच्या. सर्व मुले मिळून या शेंगा फोडत. त्यातील शेंगदाणे कितीही खाल्ले तरी मुलांना कोणी काही बोलायचे नाही. एकदा तर एका मुलीने शेंगासोबत खाण्यासाठी गुळाचा मोठा खडा खिशातून आणला. पण सगळ्यांना तो फोडून दिल्यानंतर तिला काही शिल्लक राहिले नाही. म्हणून तिने हाताची बोटंच चाटली. यावर सर्व मुलांनी तिला 'वाटी ते बोटं चाटी' म्हणूनही चिडवले. (पृ.१६०, १६१) खेळपणातील अशा आठवणी सुखावणाऱ्या होत्या. तर दुस-या बाजूला इतर मुलींच्या वागण्या-बोलण्यातील नीटनेटकेपणा पाहून आपल्यात काहीतरी कमी आहे या उणीवेची जाणीव तीव्र स्वरूपाची आहे.

शाळेतील ताराच्या वर्गातील मोजक्या मुली नोकरदार व श्रीमंत घरातील होत्या. त्यांचे राहणीमान नीटनेटके होते. बोलताना-येते, जाते म्हणणाऱ्या, इस्त्रीचे कपडे, सॉक्स-बूट घालणाऱ्या, सँडल घालणाऱ्या, इतर मुलीत जास्त न मिसळणाऱ्या, इंग्रजी 'फाडफाड' बोलणाऱ्या 'गर्विष्ठ' होत्या. याची उणीव ताराला वाटायची म्हणून आपण इंग्रजी फाडफाड वाचतो हे दाखविण्यासाठी लेखिका दुसऱ्याकडून विचारून इंग्रजीतील धडे वहीत देवनागरीत लिहून काढून वर्गात वाचायची. इतरांना फसवत व आपली फजिती सर्वांसमोर

होऊ नये म्हणूनचा तिचा हा प्रयत्न असायचा. या काळात आपल्याला हे येत नाही किंवा मिळत नाही ही जाणीव ताराला सतत जाणवत राहते.

तारा आणि तिची मैत्रीण सुली मराठीचे वाचन उत्तम करायच्या. म्हणून त्यांचे शिक्षक या आठवीतल्या मुलींना त्यांच्या पुढच्या वर्गात नेऊन वाचायला सांगायचे. ताराचे मन शाळेतल्या मैदानी आणि शाळेबाहेरच्या खेळात जास्त रमायचे. शाळेत लंगडी, कबड्डी, खोखो हेच खेळ असायचे. तर शाळेबाहेर जेवण-पाणी, खड्यांचे खेळ, झोपाळ्याचे झोके, काचा-कवड्या, गजगे हे खेळ चालायचे. खेळ हा ताराच्या त्यावेळच्या जगण्यातील आनंदाचा वेळ असायचा. वाड्याला भले मोठे अंगण होते पण तालमीतील मुलांच्या भीतीने घरातील मुली कधी अंगणात खेळायला जाऊ शकल्या नाहीत. लपाछपीसाठी आडोशाला लपून बसले असता तालमीतील मुले येऊन या मुलींना नको ते स्पर्श करत रहायचे. हे जर आईला सांगितले तर आई आपला खेळ बंद करेल या भीतीपोटी हे शोषण त्या तोंड दाबून सहन करायच्या. घरातच शिकवण्यासाठी येणारा शिक्षक ताराचा हात धरून आपल्या नको त्या भागावरून फिरवत रहायचा. याचा अर्थही न उमगलेल्या ताराला हे स्पर्श किळसवाणे वाटायचे. न कळत्या वयातील खेळ खेळणा-या मुली आणि त्यांच्या खेळाला विस्कटवून टाकणारी कळती माणसे हा द्वंद्व या कथनातून येतो.

शाळेतल्या काही चांगल्या आठवणीबरोबर काही त्रासदायक आठवणीही होत्या. त्यातील एक म्हणजे त्यांना त्यांच्या नावावरून चिडवण्याचा प्रकार. लेखिकेचे मूळ ताराबाई हे नाव एका बहाद्दर स्त्रीच्या नावावरून ठेवलेले होते. पण शाळा, कॉलेजमध्ये शिकत असताना या नावामुळे लेखिकेला अनेकदा मनस्ताप सहन करावा लागला होता. त्यांना हिंदी, मराठी चित्रपटातील 'तारा' नाव येणारे गाणे गाऊन चिडवले जायचे. विविध विषयातील शिक्षकांच्या विश्लेषणात तारा हे नाव आले असता वर्गात हल्लकल्लोळ माजायचा. संक्रातीच्या एका सणाला तर मुले "तारेखाली तिळगूळ वाटप सुरू आहे. सगळ्यांनी तिळगूळ घेऊन गोड बोलावे." असे शाळेबाहेर ताराच्या नावाचे विकृतीकरण करून हल्लकल्लोळ माजवितात. हे सर्व ताराला मनस्ताप देणारे होते.

मुलींच्या पौगंडावस्थेतील प्रवेशाचा टप्पा हा एक वेगवेगळ्या अनुभवांना जन्म देणारा असतो. मासिक धर्म सुरू होणे हे जसे मुलींच्या शरीराशी वेदनेसोबत जोडलेले असते तसेच सामाजिक आणि धार्मिक प्रथांमुळे यातील वेदना अधिक दुःखद ठरतात. हाच अनुभव तारालाही अनुभवायला मिळतो. ताराचे बालपण संपले आणि मासिक धर्म सुरू झाले तेव्हा आईने शाळा सोडून बाहेर जाण्यासाठी अटकाव केला. वयात आल्यानंतर पाचव्या दिवशी बस्तीला जाऊन धार्मिक विधी केला जायचा. या विधीमुळे सर्वांना कळायचे की मुलीला मासिक धर्म सुरू झाला आहे. तर या विधीला जाताना आसपासची मुले तिला 'घोडी लग्नाला तयार झाली' असे म्हणून चिडवतात. ज्या गोष्टीची पूर्णतः जाणीवही मुलीला झालेली नसते, ही गोष्ट म्हणजे तिची अत्यंत खाजगी गोष्ट असूनही अशा विधीतून ती इतरांपर्यंत कळवून दिली जाते. अशा वातावरणामुळे मुलींना मासिक धर्म आणि त्यासोबत पाळल्या जाणाऱ्या गोष्टींबाबत व स्वतःच्या शरीराबाबत एक नकारात्मकता वाढू लागते.

ताराची आई जैन धर्मामध्ये सांगितलेल्या गोष्टींचे काटेकोर पालन करायची. या गोष्टीमुळे इतरांवर काय परिणाम होतो याची जाणीव त्यांना नसायची. याचा एक विपरित परिणाम

ताराच्या बालमनावरही व्हायचा. धर्माचरणाचा एक भाग म्हणजे ताराची आई काटेकोरपणे शिवाशिव पाळायची. याचे पालन घरातल्या सर्वांनाच करावे लागायचे. त्यामुळे ताराला शाळेतून आल्यानंतरचा फ्रॉक काढून बाहेरच्या दिवळीत ठेवायला सांगत असत. पण तो ठेवण्यापेक्षा कोंबलेलाच असायचा. त्यामुळे दुसऱ्या दिवशी तोच चुरगळलेला गलिच्छ फ्रॉक तिला घालून जावा लागायचा. कोणत्याही पद्धतीची फॅशन आई मुलींना करू द्यायची नाही. ताराच्या अनेक मुस्लिम व दुसऱ्या जातीच्या मुली ताराच्या मैत्रिणी होत्या. पण त्यांच्या घरी काही खायचे, प्यायचे नाही, त्यांच्या घरी सतत जायचे नाही हा आईचा दंडक नेहमीच असायचा. त्यामुळे सर्वात मिसळण्याच्या ताराच्या स्वभावावर त्याचा परिणाम सतत होत राहायचा.

इतर मोठया मुलांचा, शिकवण्या घ्यायला येणा-या पुरुषांचा असे नको असलेले स्पर्श ताराने अनुभवले होते. विकृत मानसिकता पोसणा-या समाजात हे अनुभव येतात. अशाच काही विकृत गोष्टी ताराला पहायला मिळतात. पुरुष नसलेल्या ताराच्या घराचा आणि घरातल्या आसपासच्या भागाचा सर्वच जण फायदा घ्यायची. त्यामुळे वाड्याच्या मागच्या बाजूला सर्वांनाच नको ती दृश्य बघायला मिळायची. एकदा तर एक विकृत मनुष्य गोठ्यात रवंथ करत बसलेल्या म्हशीशी घासाघीस करायचा. हे सर्वच विकृत मानसिकतेचे प्रतीक होते. आणि ही सर्व दृश्य बालवयातील ताराच्या मानसिकतेवर शोषणात्मक परिणाम घडवून आणायची. अशा सर्व भवतालामुळे आपल्या मुली सुरक्षित रहाव्यात म्हणून आईनेच अनेक बंधने त्यांच्यावर घातली होती. अशा अनेक मिश्र मानसिकतेच्या, वर्तनाच्या खुना ताराच्या बालपणावर उमटलेल्या दिसतात.

### २. ताराची आईः

या आत्मकथनातून लेखिकेसहीत अनेक स्त्रियांचा संघर्ष वर्णिला आहे. त्यामध्ये जन्मदात्या आईच्या संघर्षाचा भाग अधिकतेने येतो. आईची अनेक स्वभावचित्रे लेखिकेने आत्मकथनातून रेखाटलेली आहेत. कधी रागवणारी, मुक्यानेच मुलांवर प्रेम करणारी, मुलांसाठी त्यांच्या भल्यासाठी निष्ठूरपणाने निर्णय घेणारी, टोकाची शिवाशिव पाळणारी व त्याचे दुसऱ्यावरही बंधन घालणारी, विधवा, टाकलेल्या, म्हाताऱ्या माणसांपासून भिकाऱ्यापर्यंत सर्वांना कुवतीप्रमाणे मदत करणारी, दारात बांधलेल्या मुक्या जनावरांचेही करणारी, ढेकणं, मुंगी, दुधात पडणारी माशी यांचाही विचार 'जगा आणि जगू' द्या या तत्त्वाने त्यांना जीवनदान देणारी आई अशी अनेक स्वभावचित्रे येतात. अशा आईचा उल्लेख लेखिका 'जागरूक आई' म्हणून करते. या विविध परस्परविरोधी वृत्तीचे स्वभावमिश्रण असणाऱ्या आईला लेखिकेने या आत्मकथनातून रेखाटले आहे.

प्रस्तुत आत्मकथन हे जरी लेखिका नीलम माणगावे यांचे असले तरी या आत्मकथनाचा बहुतांश भाग हा त्यांच्या आईच्या जीवनसंघर्षाचा, धर्म म्हणून आचरणात आलेल्या त्यांच्या सवयी, विचार, भूतदया, स्त्री म्हणून असणाऱ्या जाणिवेचा आहे. त्यांनी स्वतःच्या जगण्यासाठी कोणाची सोबत नसताना तीन मुलांना वाढवण्यासाठी केलेल्या संघर्षाला या आत्मकथनातून रेखाटले आहे. नवरा असताना आणि नसताना अशा दोन्ही काळातला हा संघर्ष आहे. आईच्या विविध रूपांचा परिचयच लेखिका त्यांच्या या लेखनातून करून देते. म्हणून या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेत लेखिका आईला बुरुजावरच्या 'हिरकणीची' व

स्वसामर्थ्याने खिंड लढवणाऱ्या 'झाशीच्या राणीची' उपमा देऊन "तुझीच असणारी ही छोटीशी भेट तुलाच" असे म्हणून आईला ही कलाकृती अर्पण करते.

जेमतेम सात ते आठ महिनेच शाळेत गेलेल्या आईला केवळ अक्षरओळख होती. त्याचा उपयोग केवळ शब्दाला शब्द जोडून वाचण्यासाठी ती करत असे. तिला वाचायची एक सवयच झालेली. ही सवय म्हणजे धार्मिक ग्रंथ वाचणे होय. हे धार्मिक ग्रंथ वाचनाचा उद्देश म्हणजे, "ज्ञान मिळवण्यापेक्षा पुण्य मिळवणं ही भावनाच तिच्या वाचनात होती." (पृ. १०३) वाचने म्हणजे एक धमर्कृत्य आहे ही वाचनामागची आईची भूमिका होती. त्या वाचलेल्या मजकुरातील तिला फारसं काही समजायचे असे नाही. ते समजतं की नाही असा प्रश्न लेखिकेनेच विचारला असता, "प्रत्येक गोष्टीचा अर्थ समाजायलाच पाहिजे असं कुठं आहे? हे वाचल्यावर मला समाधान मिळतंय म्हणून मी वाचते." (पृ. १०३) म्हणजे या सगळ्यामागे आईचा समाधान मिळवण्याचा हेतू असायचा. स्वाध्यायासारखा ती रोज तासभर धार्मिक ग्रंथ वाचायची. सर्वांकडून त्रास सहन करणारी आई स्वतःच्या विरंगुळ्याचे, समाधानाचे स्थान म्हणून ती देवा-धर्माच्या गोष्टी करायची. हे केल्यानंतर दिलासा मिळेल, भीती कमी होईल याचा विश्वास तिला यातून मिळायचा. त्यामुळे तिच्या वर्तनात या विविध छटा दिसतात.

आईचा जितका देवावर विश्वास होता तसाच भूता-खेतांवरही होता. मंत्र-तंत्र-मांत्रिक-अंगारा-धुपारा हेही त्या विचारासोबत यायचे. कुठल्यातरी संकटात सापडल्यावर, भीतीवर जय मिळवण्यासाठी ती हा मार्ग वापरायची. अशा प्रसंगी नेहमी 'णमोकार मंत्र' ती म्हणत राहायची व मुलींनाही म्हणायला सांगायची. कोर्टातील दत्तक पत्राबाबतची केस जिंकावी म्हणून आई देवीला नवस करते की, ही केस जर जिंकली तर देवाला सोन्याची पुतळी घालीन. आणि कोर्टातील निकाल आईच्या बाजूने लागतो. घरात खायला काही नसतानाही आई देवीला सोन्याची पुतळी अर्पण करते. आईचे हे वर्तन म्हणजे श्रद्धेचे अंधश्रद्धेत झालेले रूपांतर होय. हे लेखिकेला अजिबात आवडत नाही.

आईची शिकवण-ग्रामीण भागातील स्त्रियांबाबत असणारे समज आणि गैरसमजाचे प्रतिरूप आईच्या माध्यमातून उभे राहते. मुलींना दिली जाणारी शिकवण ही पुरुषप्रधान समाजरचनेला पोषक असणारी अशीच असते. उदा.ताराची आई ताराला धान्य पाखडताना सुपाच्या पुढे बसू नको असे म्हणायची. याचे कारण विचारले असता ती सांगायची की, सुपाचा वारा घेतला की ती पुढे नवऱ्याला घाबरणार नाही. नवऱ्याला घाबरले तरच संसार टिकतो असा या शिकवणीमागचा उद्देश होय.

आईच्या स्वभावाची अजून एक बाजू म्हणजे स्वतः कमी शिकलेली असूनही ती मुलींच्या शिक्षणासाठी झटत होती. रुकडीच्या मुलांना घाबरून कोल्हापूरला शाळेत घालणारी आई, कॉलेजमधल्या मुलांच्या हरकतींना घाबरली नाही. ती फक्त एकच म्हणायची, "तू लक्ष देऊ नको. हत्ती जातंय कुत्रं भुंकतंय. तं भुंकू दे त्यांना. लग्न होईपर्यंत शिक तू आपली." (पृ. १६७) स्वतः जेमतेम शिकलेली असूनही किमान लग्न होईपर्यंत ऐपत नसताना शिक्षणासाठी मुलीच्या पाठीशी उभी राहणारी आई असे आईचे विविध वर्तनस्वभाव दिसतात.

शिवाशिव पाळणारी आई-जैन धर्मातील 'जगा आणि जगू द्या' या आचारधर्मानुसार वागते. भुकेलेल्यांना अन्न देते. तहाणलेल्यांना पाणी देते. अडल्या-नडलेल्यांना हरेक तऱ्हेची तिच्या परीने मदत करते. मागच्या गोष्टी विसरून लोकांशी पुन्हा चांगली वागते. दारात कुणीही भिकारी आला की रिकाम्या हाती परत पाठवत नाही. 'तोंडाने नाही म्हणण्यापेक्षा हातानं नाही म्हणावं.' (म्हणजे फार नाही, थोडं तरी द्यावं) हे तत्त्व ती पाळते. श्रद्धाळू, शिवाशिव पाळणारी, बाहेरच्यांचा राग मुलींवर काढणारी, आपला संघर्ष एकटीनेच करायचा आहे याची जाणीव असल्याने आपल्याच मुलींना मर्यादेत राहायला शिकवणारी, गरीब, उपाशी पोटाला भाकर देणारी, नव-याचा कोणताही प्रेमाचा ओलावा मिळाला नसतानाही त्याचे सर्व निमुटपणे करणारी एक सोशीक स्त्री म्हणजे ताराची आई आहे. समाजातून मिळालेल्या वेगवेगळ्या वागणुकीमुळे तिच्या स्वभावात अनेक छटा दिसतात. आईच्या या विविध स्वभावरूपांचे दर्शन लेखिकेने यातून घडविलेले आहे.

**३. जनजीवनात पाळली जाणारी शिवाशिवः**

'जसं घडलं तसं' या आत्मकथनाचा कालखंड हा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील आहे. प्राचीन काळापासून माणसाला माणसापासून विभक्त करणारी व जात, धर्माची चौकट अधिक बंधिस्त करणारी गोष्ट म्हणजे स्पृश्य-अस्पृश्य असा केला जाणारा भेदभाव. यातून जन्माला आलेली शिवाशिवीची पद्धत. या पद्धतीचे वास्तव्य विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही ठाण मांडून होते. याची वाच्यता लेखिकेने या आत्मकथनातून केली आहे.

बालपणातील तारावर जास्त परिणाम करणारी कुठली गोष्ट असेल तर ती आईकडून पाळली जाणारी शिवाशिव ही होती. आणि ती पाळण्यासाठी तारावर घातली जाणारी बंधने. ही तिच्यासाठी फार जाचक ठरत होती. इतर धर्माच्या किंवा जातीच्या मुलींसोबत खेळू न देणे, त्यांच्या घरी जाऊ न देणे किंवा त्यांच्या घरातील काही खाऊ, पिऊ न देणे, शाळेतून आल्यानंतर फ्रॉक काढून बाहेरच्या दिवळीत ठेवणे अशा अनेक गोष्टींची बंधने तारावर असत. ताराची आई स्वतः अनेकांच्या बाबतीत पाळत असलेली शिवाशिव ही तर पराकोटीची होती.

व्यालेल्या जनावरांचे दूध काढल्यानंतर आंघोळ करणे व त्यानंतर त्या दूधाला हातही न लावणे ही जनावरांच्या बाबतीत आई शिवाशिव पाळत असे. माणसामाणसातल्या शिवाशिवीच्या प्रकारापेक्षा हा प्रकार वेगळा होता. माणसातील शिवाशिव ही ज्याच्या संदर्भात पाळली जाते तो कनिष्ठ आहे, अस्पृश्य आहे याची जाणीव त्याला करून देण्यासाठी पाळली जात असते. जनावरांना याबाबतल्या जाणिवेचा संदर्भही इथे नसताना अशी शिवाशिव पाळणे म्हणजे मुर्खपणाचे होते. तरीही अशी शिवाशिव पाळली जायची.

शिवाशिवीचे असे अनेक संदर्भ आत्मकथनातून येतात. कोल्हापूरला गेल्यानंतर रेल्वेतील शिवाशिव झाली म्हणून घरी आल्याबरोबर आई अंगावरचे वस्त्र बदलून आंघोळ करायची. कुणाच्याही घरी नवीन मुलाचा जन्म झाला असेल तर तिही शिवाशिव आई पाळायची. शौचाला जाताना वेगळी साडी नेसायची व घरात आल्यानंतर ती बदलून दिवळीत ठेवायची. ही दिवळीतली साडी एकीपेक्षा अनेकांनी वापरलेली असायची. हे बंधन लेखिका मामाकडे कोल्हापूरला शिकायला गेल्यानंतरही लादले जायचे. म्हणजे ही शिवाशिव माणसांपासून मुक्या जनावरांपर्यंत पाळली जायची तशीच ती ग्रामीण अशिक्षित भागापासून ते शहरी

शिक्षित लोकांपर्यंत पाळली जायची. त्यामुळे आत्मकथनातून लेखिका या गोष्टीच्या सतत विरोधात वागत असल्याचा सूरही ऐकायला येतो.

आई पाळत असलेल्या सोवळ्याचा अर्थ लेखिका सांगते की, "रूढी, परंपरेतून आलेलं सोवळं तिच्यात, स्वतःच्या श्वासासारखं ठाण मांडून बसलंय. 'स्वच्छता म्हणजे सोवळं' असा तिचा पक्का समज. यातून आलेली शिवाशिव ती फारच कडक पाळते." (पृ. १०९) धर्माच्या आचरणाचा एक भाग म्हणून त्याचे पालन आई करताना दिसते. पण आयुष्यभर माणसांसोबत जनावरांचीही शिवाशिव बाळगणा-या आईला असाच एक अनुभव येतो. जिथे आईला ती अस्पृश्य असल्यासारखी वागणूक मिळते. इचलकरंजीला एका पेशंटला बघायला गेल्यानंतर तिथले डॉक्टर जैनांचे असतात. आपल्याच धर्मातील डॉक्टर म्हणून आई त्याच्या घरी दशम्या घेऊन जेवायला जाते. तर तिथे गेल्यानंतर डॉक्टरची बायको तिला बाहेरच्या खोलीत बसवते. याचा तिला राग येतो. वाईट वाटतं. तेव्हा लेखिका तिला तिने आतापर्यंत जात, धर्म, बाळंतीण आणि माणसासोबत जनावरांचीही पाळलेली शिवाशिव याची आठवण करून देते. इतरांशी वागलेल्या आणि त्यातून दुसऱ्याला झालेल्या दुःखाच्या मनस्थितीची जाणीव करून देते. आपण दुस-यासोबत करत असलेली शिवाशिव आणि आपल्याला कुणीतरी अस्पृश्यासारखी वागणूक देणं या दोन्ही बाजूंचे अनुभव लेखिकेने यात मांडलेले आहेत. या पद्धतीमुळे माणसामाणसांत केलेल्या भेदाचे स्वरूप आणि त्याचा मनावर होणारा विपरित परिणाम लेखिकेने यातून अधोरेखित केला आहे.

### ४. सत्तासंबंध आणि शोषणः

स्वतःचे वर्चस्व टिकवण्यासाठी सत्तेचा अंकूश एक व्यक्ती किंवा समूहगट इतरांवर ठेवत असतो. पुरुषसत्ताक पद्धतीत पुरुषी मानसिकतेचे स्थान नेहमीच वरचढ राहिले पाहिजे यासाठी जात, धर्म, अर्थकारण, राजकारण व बल यांचा प्रयोग नेहमीच केला जातो. या सत्तासंबंधात स्त्री ही नेहमीच दुय्यम स्थानावर ठेवली जाते. कुटुंबात किंवा विशिष्ट समूहात, समाजात पुरुषी सत्तेचे वर्चस्व असते आणि ते स्त्रियांवर व इतरांवर लादले जाते. ज्यामध्ये शोषणाचा भाग हा अटळ असतो.

समाजजीवनातील सत्तासंबंधाचे जाळे सर्वदूर आहे. विविध जाती, धर्म, पंथ, वर्ग, स्त्री-पुरुष अशा विविध जाणिवांतून सत्तासंबंधाचे स्तर समाजात स्थिरावलेले दिसतात. हे सत्तासंबंधात विशिष्ट एका संकेताने निर्माण झालेले असतात. त्यामुळे विशिष्ट लिंगी व्यक्तीच सत्ताप्रबळ असत नाही. तर विशिष्ट मानसिकता ही सत्ताप्रबळ असते. म्हणूनच कुटुंबात स्त्रीच दुस-या स्त्रीचा छळ किंवा शोषण करताना दिसते. अशा सत्तासंबंधाचा दिसून येणारा स्तर लेखिकेने आत्मकथनातून निर्देशित केला आहे.

सत्तासंबंधाचे पहिले चित्र म्हणजे आई आणि वडिलांच्या नाते. काळा कोट आणि डोकीवरचा पटका ही वडिलांची ताराच्या मनातील बाह्य ओळख होती. पण त्याशिवाय आईला सतत नको त्या कारणावरून शिव्या देणारे, मारहाण करणारे, मुलाबाळांना प्रेमाने जवळ न घेणारे ते होते. आपले वर्चस्व अबाधित राहावे म्हणून कुटुंबातील सर्वांवर अशा विविध त-हांनी अंकुश ठेवणारे वडील लेखिकेने जवळून पाहिले होते. स्वतः करत असलेल्या कृत्याबद्दल, ऐशोआरामीबद्दल कुणीही काहीही विचारू नये यासाठी पत्नीवर

वचक ठेवण्यासाठी ते आपल्या बळाचा वापर करत. शिव्या देणे आणि मारहाण करणे हा त्यातीलच एक भाग होय. हे लेखिकेच्या कुटुंबातील सत्तासंबंध होते. ते कुटुंबातल्या माणसांमधील परस्परांतील होते. पण यासोबतच कुटुंबाचा प्रमुख पुरुष मरण पावल्यानंतर शेजारी, नातेवाईक व गावक-यांकडून मिळणारी वागणूक हीही या सत्तासंबंधाचा एक भाग होती.

एकटी बाई आपल्याला काय विरोध करणार आहे म्हणून गावातील अनेक लोक ताराच्या घरासमोरील आंगण व परसदार वापरत असत. कुणी जनावरे आणून बांधत. त्या जनावरांनी केलेली घाणही तिथेच पडू देत असत. कित्येकदा जनावरांना गाभण घालवण्याचा प्रकार अंगणातच चालत. घरामागच्या परसदारात अनेक स्त्रिया शौचास येऊन बसत. कित्येक बाया-माणसे वाडयाच्या पडक्या भिंतीची माती खणून काढून चोरून नेत असत. एवढेच नाही तर परसदाराला लैंगिक दुष्यकृत्ये चालत. काहीजण तर असे लैंगिक चाळे जनावरांसोबतही करत. याबाबत ताराची आई कुणालाही जाब विचारू शकत नव्हती. कारण तिला त्याच्यासाठी मिळणारी उत्तरे विचित्र असत. म्हणून ती स्वतःच चरफडत रहायची किंवा शिव्या देत राहायची. ज्याचा परिणाम कुणावरही होणारा नसतो. कुटुंबाच्या शोषणातला हा एक भाग होता तर दुसरा भाग म्हणजे न कळत्या वयातल्या मुलींचे होणारे शोषण. तालमीतील मुलांचा त्रास होतो म्हणून तारा आणि तिच्या मोठ्या दोन बहिनींना त्यांच्या आईने घराबाहेर जाऊ न देणे, शिक्षणासाठी पुढे न पाठवणे, लवकर लग्न करून देणे हे त्यांचे एकप्रकारचे शोषणच होते. परिस्थितीचे भान आलेली एक दुर्बळ आई या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही पर्यायांची निवड करू शकत नाही. एवढेच नाही तर लपाछपीचा खेळ खेळत असताना तारा व तिच्या मैत्रिणी अंधारात लपल्या असताना तालमीतील धटिंगन मुले या मुलींच्या नको त्या ठिकाणी दाबत असत. हा स्पर्श नको असणारा असला तरी त्याबद्दलची तक्रार त्या कधीच आईजवळ करत नाहीत. कारण आई आपला खेळ खेळू देणार नाही आणि या खेळासाठी त्या अशा शारीरिक शोषणाला बळी पडत राहतात.

लेखिकेने अनुभवलेल्या या शोषणाबरोबर शहरातील स्त्रियांच्या शोषणाच्या त-हाही त्यांनी नोंदविलेल्या आहेत. कोल्हापुरात राहत असलेल्या चाळीतील विधवा स्त्रिया, दारू पिऊन येणारे पुरुष, त्यांच्याकडून होणारी मारहाण, शिवीगाळ, ऐन तारुण्यात विधवा झाल्यानंतर स्वतःच्या मुलांसाठी काबाडकष्ट करणा-या स्त्रिया, विधवा म्हणून विशिष्ट पद्धतीनेच जीवन कंठणा-या स्त्रिया अशा विविध स्त्रियांच्या शोषणाच्या त-हा लेखिकेने रेखाटलेल्या आहेत. समाजातील चाली, रीती, परंपरांच्या नावाखाली स्त्रियांच्या होणा-या या शोषणाला या आत्मकथनातून रेखाटले आहे.

ताराच्या वडिलांच्या मृत्यूनंतर आजूबाजूच्या लोकांचे वाड्याचा व तिथल्या अंगणाचा मन मानेल तसा वापर करणे, घरातील स्त्रियांनाच भीती दाखवणे, त्यांच्यावर दबाव टाकणे हे एक सामाजिक शोषणाचे छोटे रूप आहे. घरचा पुरुष म्हणून असणारी सुरक्षितता हरवल्यानंतर त्यांच्या वाट्याला अशा प्रकारची हतबलता येते. याबाबत लेखिका म्हणते, “तेव्हाही आणि आताही मुलींना-स्त्रियांना मुलांची, प्रौढ पुरुषांची भीती वाटते. त्यांच्याबद्दलचा ठाम विश्वास देता येत नाही. स्त्री नेहमी पुरुषांच्या बाबतीत शंकित असते, ही खरं तर रोगट समाजजीवनाची लाजिरवाणी प्रवृत्ती आहे.” (पृ. १७०) सामाजिक

दुय्यमत्व व लिंगभानातून येणाऱ्या शोषणाला बळी पडत असलेल्या स्त्रियांचा लेखाजोखा यातून मांडलेला दिसतो.

या आत्मकथनातील उल्लेखित काळातील सत्तासंबंध आणि स्त्रीशोषण यांचेही नाते दिसून येते. त्या त्या काळात विशिष्ट प्रथा, परंपरा, संस्कृतींचे काटेकोर पालन होत असते. कुमारिका, विवाहित, विधवा स्त्रियांना दिलेल्या हक्क, अधिकारात तफावत असते. त्याच्या मर्यादा सोडून वागणाऱ्या स्त्रियांना अपमान, मानहानी सामाजिक बहिष्कारासारख्या गोष्टींना सामोरे जावे लागते. याचे प्रातिनिधिक चित्र आत्मकथनातून रेखाटलेले दिसते.

### ५. धर्म, संस्कृतीतून स्त्रियांवर लादलेली बंधनेः

लेखिका जन्माने जैन धर्मीय आहे. काळाचा विचार करता जैन धर्माचरण म्हणून काही गोष्टींचे पालन करणे हे स्त्रियांसाठी काटेकोर असायचे. त्याविरुद्ध कोणी आवाजही उठवायचे नाही. शिवाशिव हा त्यातीलच एक प्रकार. पण विशिष्ट विधी वेळी विशिष्ट कपडेच घालायची किंवा बाहेरून आल्यानंतर बाहेरची कपडे बदलून ती विशिष्ट जागी ठेवायची हा संकेत जाचक असायचा. लेखिकेची मामी ही पक्की जुन्या जैन विचारांप्रमाणे वागणारी. तारा कोल्हापुरात रहायला गेल्यानंतर तिथल्या चाळीत एकच बुट्टीचा संडास असायचा. सोवळं-ओवळ्याचा प्रकार मामी खूप सांभाळायची, त्यामुळे संडासला जाताना देवळीत कोंबून ठेवलेले, न धुतलेले, एकमेकींच्या अंगावरचे एकच जुनेरं घरातल्या सर्व स्त्रियांना वापरावं लागायचं. ते एकच वस्त्र असल्यामुळे त्याला ब्लाऊजही नसायचा. अशा अवस्थेत त्या रस्त्याकडेला शौचास गेल्यानंतर बाहेरच्या लोकांच्या नजरा शरीराला आरपार भेदल्याची जाणीव लेखिका इथे व्यक्त करतात. आणि असे वस्त्र वापरण्याचे बंधन फक्त स्त्रियांनाच असायचे. पुरुषांना नाही. हे एक प्रकारचे धर्मकारणातून येणारे विचार स्त्रीच्या मानसिकतेचा अनादर करणारे शोषणच होते. (पृ. १९६)

कोल्हापुरात राहात असताना लेखिकेची मामी रोज सकाळी दसरा चौकातल्या जैन बोर्डिंगमधल्या मंदिराला जायची. आणि ती लेखिकेलाही चल म्हणून आग्रह करायची आणि पुढे घालून मंदिराला न्यायची. त्यावेळी लेखिकेच्या कॉलेजमधील कितीतरी मुलं जैन बोर्डिंगमध्ये राहायची. आणि ती या मुलींना पाहताच शिट्ट्या वाजवायचीत. कोणाच्यातरी नावाचा पुकारा करायची. 'मैं तुझसे मिलने आई मंदिर जाने के बहाने!' (पृ. १९२) अशी गाणी मोठ्याने म्हणायची. हे त्या सर्वांनाच अपमानास्पद वाटायचं. तेव्हापासून त्यांचे मंदिरात जाणेही बंद झाले.

घरापासून कॉलेज तसे कमी अंतरावर होते. म्हणून सर्व मुली जैन बोर्डिंगला वळसा घालून कॉलेजला चालत जायच्या. थंडीच्या दिवसात त्यांना अंगावर धुके घेत जायला आवडायचे. अंगावर व पापण्यांवर पाण्याचे मोती जमा झालेले बघायला आवडायचे. पण नंतर तिथल्या मुलांच्या बोर्डिंगमधून शिट्यांचे आवाज येऊ लागले. गाण्यांच्या लकेरी व असभ्य-अश्लील टोमणे व प्रत्येकीच्या नावांची आरोळी येऊ लागली. हे फार विचित्र आणि मुलींना अपमानास्पद वाटणारे होते. त्यामुळे हा आवडणारा प्रवास असला तरी मुलांच्या भीतीपोटी आणि लज्जेपोटी त्यांनी त्या मार्गांनी जाणे बंद केले. (पृ. १९३) अशाच प्रकारचे अनुभव त्यांना वयाच्या चाळीशीनंतर अनेकदा आले. म्हणून त्या याचे वर्णन पुढील ओळीतून करतात की 'मुलांना स्त्रियांच्या वयाचं बंधन नसतंच. तर ती फक्त बाई असणं पुरेसं असतं.'

(पृ. १९४) स्त्रियांची अशी सर्वांसमोर केलेल्या छेडछाडीला समाज काटेकोर शिक्षा देत नाही. कित्येकदा तर मुलीमध्येच काहीतरी खोट असेल असे उलटे अनुमान समाज लावत असतो. म्हणून स्त्रियांनाच दोन पाऊल मागे जावे लागते. हा प्रकार स्त्रियांवर इथल्या संस्कृतीतून लादला जातो.

कॉलेजमध्ये असताना प्राचार्यांच्या कडक शिस्तीमुळे मुलांचा त्रास कमी झाला होता. त्यादरम्यान खेळामध्ये सहभाग नोंदवावा असे लेखिकेला सतत वाटायचे म्हणून एकदा त्या कबड्डीच्या स्पर्धेसाठी एक संघ तयार करतात. कबड्डी खेळताना अर्धी चड्डी घालावी लागायची. रोज कॉलेजला साडी नेसून जाणारी मुलगी म्हणून लेखिकेचे व्यक्तिमत्त्व सगळ्यांनी पाहिले होते. म्हणून घरातून बाहेर पडताना साडी घालणे व कॉलेजमध्ये गेल्यावर साडी काढून चड्डी आणि टी शर्ट घालून सर्वच मुली सराव करायच्या. ज्यादिवशी विद्यापीठात मुख्य स्पर्धा होणार होती त्या दिवशी त्यांनी मैत्रिणीच्या खोलीवर जाऊन स्कर्ट घातले होते. नेमके त्याच दिवशी लेखिकेचे मामा वाटेत भेटतात. आणि अंगभर साडी नेसणारी भाची गुडघ्याएवढ्या झग्यात पाहून आश्चर्यचकीत होतात. तेव्हा ते तिला काही बोलत नाही. आणि स्पर्धेच्या ठिकाणी त्यांचा मामेभाऊही हजर असतो. त्याच्यासमोर चड्डीवर कसे जायचे म्हणून त्या कपडेच बदलत नाहीत. या दोन्हीची धास्ती घेतल्याचा परिणाम म्हणजे मुख्य स्पर्धेवेळी त्या सरांना तब्बेतीचे कारण सांगून राखीव गडी म्हणून बाहेरच बसून राहतात. संध्याकाळीही घाबरत घरी येतात. पण त्यांना ज्या गोष्टीची भीती वाटत होती त्यातील काहीच घडत नाही. पण आपण या कारणामुळे खेळू शकलो नाही याची चूटपूट त्यांना नेहमीचीच लागून राहते. स्त्रियांच्या पोशाखाबद्दलची निकोपता समाजात असू नये, विशिष्ट पोशाख म्हणजेच संस्कृतीचे पालन या गोष्टी स्त्रियांना त्यांच्या पूर्ण विकासासाठी मारक ठरतात याचेच हे उत्तम उदाहरण म्हणावे लागले. असे कितीतरी खेळ, स्पर्धा, आवड स्त्रिया आपल्यावरील बंधनापोटी जपू शकत नाहीत.

केवळ स्त्री म्हणूनच स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या बंधनांमुळे शोषण होते याचे भान लेखिकेला आहे. याबद्दची खंत लेखिका घटनेबाबत मांडल्या गेलेल्या चिंतनातून सर्वत्र दिसते. म्हणूनच अंगणात खेळावेसे वाटत असताना केवळ तालमीतील मुलांमुळे आपल्याला बाहेर खेळायचे बंधन आले ही बोच लेखिका अनेकदा बोलून दाखवते. हे फक्त स्त्री असल्यामुळेच आहे याची समज या खेदाच्या पाठीशी असल्याचे दिसते. 'केवळ मुली म्हणून, स्त्री म्हणून, आयुष्यात असे किती रस्ते कारण नसताना सोडावे लागतात. नको असलेले नाईलाजाने स्वीकारावे लागतात. तर काही लादलेही जातात. याचा न्याय कुणाजवळ मागायचा?' (पृ. १९४) या शब्दात लेखिक या धर्म, संस्कृतीतून येणा-या बंधनाबद्दल नाराजी नोंदवितात.

### ६. आत्मकथनातून येणारे स्त्रियांचे भावविश्वः

प्रस्तुत आत्मकथनामध्ये विविध स्त्रियांची स्वभावचित्रे रेखाटली आहेत. यामध्ये स्त्रीजीवनाचा एक पट त्यांच्या लेखनातून येतो. अशिक्षित, अडाणी, परिस्थितीपुढे नाडलेल्या, लबाड, स्वतःचा चरितार्थ कष्ट करून चालवणाऱ्या, कुटुंबाची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतलेल्या अनेक स्त्रियांचा जीवनपट यातून येतो. त्यांच्या भावजीवनासहीत तो उद्धृत होतो. त्यातील काही मोजक्या स्त्रियांचा विचार आपल्याला इथे करता येईल.

कोल्हापुरात चंपाबाई निटवे यांच्या घरी भाडेकरू म्हणून रहायला गेल्यानंतर अनेक स्त्रियांचे भावविश्व लेखिकेसमोर उभे राहिले. भाडं घेऊन असलं तरी त्यांनी अनेक विधवा स्त्रियांना आसरा दिला होता. लहान वयात लग्न झालेली आणि कोवळ्या वयातच दारू पिऊन नवरा मेल्यानंतर विधवा झालेल्या सख्ख्या बहिणी-सख्ख्या जावा, आपल्या आठ मुलांवर ताबा ठेवून स्वतःचे सर्व करून घेणारी विधवा आहे अशा अनेक स्त्रियांचे जीवन याठिकाणी लेखिकेने जवळून पाहिले.

१. या स्त्रियांच्या खाजगी आयुष्यात त्यांच्यावर अंकुश ठेवणाऱ्या गोष्टींनी त्यांना गुलाम केले आहे हे चित्र आत्मकथनातून दिसते. कोल्हापुरात भाडेकरू असणाऱ्या एका विधवेची दोन मुले दारू पिऊन मरण पावतात. त्यांच्या दोन्ही जावा-सख्ख्या बहिणी कुटुंब चालवण्यासाठी दिवसरात्र राबतात. त्यातील एक तर तारापेक्षाही वयाने लहान. कुठल्याही गोष्टीचे भान यायच्या आत दोन मुले झालेली, दारू पिऊन येणाऱ्या नवऱ्याच्या शिव्या खाणारी, मार खाणारी आणि काही वर्षातच वैधव्य आलेली स्त्री. (पृ. १८४)

२. याच चाळीत राहणारी व दोन चार घरात स्वयंपाकाची कामे करणाऱ्या एका विधवेला एकच मुलगा होता. त्याला वरचेवर फिट येत असे. फिट आली की तोंडातून फेस येऊन गरगर डोळे फिरायचे, तो हातपाय झाडायचा. हे त्याचे रूप भयावह असायचे. पण असे असतानाही ती विधवा आपल्या मुलाचे लग्न एक सुस्थित मुलीशी करून देते. तेव्हा सर्व चाळकरी त्या मुलीची वाट लावली म्हणून रागात असायचे. ती मुलगी वयाने लहान होती. ती सतत घाबरून रडत राहत असे. पण अशातच तिला दोन मुले झाली. आणि आईला आपल्या एकुलत्या एका मुलाचे घर बसल्याचा आनंद झाला. या सुखासाठी ती अनेक घरात राबत राहिली. पण आपल्या सुनेला तिने कुठल्याही कामासाठी पाठविले नाही. (पृ. १८१)

३. चौथी - पाचवीत असणारी तारा एकदा सुट्टीसाठी म्हणून आजोळला सांगवड्याला गेली असता तिच्या दोन जिवलग मैत्रिणी किरकोळ आजाराचे निमित्त होऊन मरण पावतात. हे रुकडीला परत आल्यानंतर कळताच तीही धास्ती घेतल्याने आजारी पडते व तिला टायफॉईड होतो. इंजलकरंजीला तिला दवाखान्यात ॲडमिट केले जाते. सांगवड्याची आजी तिच्यासोबत थांबते. दरम्यान सांगवडेची एक मामी आपले मुल आजारी आहे म्हणून त्याला दाखवण्यासाठी दवाखान्यात येते. तर तिच्या पदराखाली झोपलेले मूल वाटेतच कुठेतरी मरण पावल्याचे डॉक्टर सांगतात. अशा अवस्थेतही ती आपल्या सासूसमोर त्या मुलाला पदराखाली घेऊन येते आणि मग सासूसमोर बांध फुटल्यासारखी रडत राहते. अशा परिस्थितीत धीराने राहणारी मामी एक स्त्री म्हणून फार मोठी होऊन जाते.

४. पुढे त्यांच्या रुकडीतल्या घरात भाड्याने राहणाऱ्या जिद्दी शांताची गोष्ट येते. नवऱ्याला दारूचे व्यसन होते. त्यामुळे लोकांची भांडी घासणे, शेणकुटं लावून देणं, शेतावर कामाला जाणे असे करून तिने तीन मुलांना वाढवले. "बाई कामाला वाघ हाय!" पण तोंडानं फटकळ" (पृ. २४१) अशी तिची ख्याती होती. या शांताला एकदा पहाटे स्वप्न पडलं की, शेतावर बांधून नेलेला जेवणाचा डब्बा कुणीतर नेला. ग्रामीण समजानुसार जेवण कुणीतरी नेणे म्हणजे घरची लक्ष्मी जाणे असा होतो. तेव्हा ती हा समज खोटा ठरावा म्हणून आपल्या लक्ष्मीलाच कशी जाते तेच बघतो म्हणून दुपटीने काम करायला लागते. दारू पिणाऱ्या नवऱ्याला तिने कधी सांभाळले नाही म्हणून सगळा गाव तिला नावं ठेवायचा. पण त्याला ती

बघली नाही. पण आपल्या तीनही मुलांना तिनं मोठे केले व त्यांची व्यवस्थित घडी बसवून लग्नही लावून दिले. व आपल्या लक्ष्मीला आपल्याचा मुठीत घट्ट पकडून ठेवले.

५. एक भाडेकरू जी चौथी शाळा शिकलेली होती. पण तिला आपल्या चार मुलांपैकी एकतरी मुलगा सैन्यात जावा अशी तिची अपेक्षा होती. तिच्या म्हणण्यानुसार, “मरायचं तर सगळ्यांनाच हाय. किडा, मुंगीसुद्धा मरत्यात की! तेला काय अर्थ हाय? देशासाठी मरणं महत्त्वाचं हाय.” (पृ. २४४) पण पुरुषसत्ताकतेने तिच्या या म्हणण्याला थारा दिला नाही. तिच्या अपूर्ण राहिलेल्या इच्छेबद्दल ती म्हणते, “बायकांच्या सगळ्याच इच्छा कुठं पुऱ्या होत्यात? ही पण त्यातलीच! बाप्या असतो तर मीच भरती झालो असतो. पण पोरगी म्हणून बानं नाही पाठवलं” (पृ. २४४) चौथी शिकलेल्या पण उच्च विचारांच्या बाईला ‘बाई’ म्हणून वाट्याला आलेली खंत यातून व्यक्त होते.

६. लेखिकेच्या आयुष्यातील अजून एक महत्त्वपूर्ण स्त्री म्हणजे श्रीराम. तिचे नाव काय होते हे लेखिकेलाही माहीत नाही पण तिला सर्व ‘श्रीराम’ किवा ‘हरे राम’ असे म्हणायचे. ती जैन होती आणि सतत तोंडात ‘राम’ असायचे. जात्याच हुशार असणारी पण स्पष्टवक्ती असल्याने सर्वजण तिला फटकळ म्हणायचे. धर्माचा अभ्यास असल्याने धर्माच्या नावावर खपवल्या जाणाऱ्या गोष्टीचा तिला राग यायचा. म्हणूनच तिचा कर्मकांड व सोवळ्यावर विश्वास नसायचा. ताराची आई शिवाशिव पाळायची म्हणून ही तिला मुद्दामहून काहीतरी शिवाशिव मोडणारे कृत्य करायची. गावातल्या तरुण वयात आलेल्या मुलींना, वयात येणं म्हणजे काय?, पाळी म्हणजे काय?, लग्न म्हणजे काय?, शरीरसंबंध म्हणजे काय, वयातले धोके काय असतात हे सर्व ती सांगायची. क्वचितच अशा पद्धतीचे मार्गदर्शन मुलींना मिळायचे की जे काम ही श्रीराम करायची. तिचे मोठेपण आणि शहाणपण वर्णन करणारे अनेक प्रसंग लेखिकेने आत्मकथनात वर्णिले आहेत.

अशा कितीतरी स्त्रियांची चित्रणे या आत्मकथनातून येतात. समाजाच्या परंपरा, रूढी सांभाळत कुटुंबाला तोलून धरणा-या, अनेक शोषणाला बळी पडूनही खंबीरपणे जगणा-या, मुलांसाठी अहोरात्र राबणा-या, निश्चयी, परिस्थितीपुढे हतबल झालेल्या अशा अनेकविध स्त्रिया आणि त्यांची भावविश्वे आत्मकथनातून येतात.

## ३.७ आत्मकथनाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये

आत्मचरित्र हे एकाचवेळी इतिहासाचे पुनर्वाचन करत असते. म्हणजेच काळाचा व्यक्तिगत स्वरूपाचा एक आलेख आत्मचरित्रातून मांडला जात असतो. तो जसा वास्तववादी घटना, प्रसंगांनी भारलेला असतो तसाच तो व्यक्तिगत भावना, प्रतिक्रियांचाही परिपाक असल्याने सौंदर्यात्मक, कलात्मक रीतीने मांडून तो वाचनीयही बनविण्याची कसब चरित्रकार करत असतो. लेखनातील अनेक विशेष आत्मचरित्राला वाचनीय व सौंदर्यात्मक बनवत असतात. या अनुषंगाने प्रस्तुतच्या आत्मकथनातील वाङ्मयीन विशेषांचा विचार आपण इथे करू.

**अ. व्यक्तिचित्रणः**

चरित्र कथनकर्ता हा आपल्यासोबतच्या इतर व्यक्तीसोबत असणाऱ्या परस्परसंबंधांचे चित्रणही करत असतो. हे चित्रण शारीर-आणि-मानसिक स्तरावरूनही केले जाते. काहींच्या

चित्रणात केवळ मानसिकतेतून अशारीर (शारीरिक वर्णने नसाणारी) व्यक्तींचे चित्रण होते. पण काही चेहरे नसणा-या व्यक्ती या त्यांच्या स्वभावावरून, त्यांच्या वर्तनातून कशा असाव्यात याचा कयास वाचकच स्वपरीने आपल्या मनात लावत असतो. कथनकर्ता हा वास्तव जीवन जगलेल्या जीवनाचा पट आपल्या शब्दात मांडत असतो. त्यामुळे आत्मकथनातून येणा-या व्यक्ती या वास्तव असतात. कथा, कादंब-यांमध्ये वर्णन केल्यासारखी ती कल्पित पात्रे असत नाहीत. त्यामुळे ख-याखु-या व्यक्तींची प्रतिकृती वाटावी म्हणून कथा-कादंब-यातील लेखकाला पात्र उभे करण्यासाठी शारीर आणि मानसिक पातळीवरचे पात्रांचे वर्णन करावे लागते. आत्मकथनामध्ये याची गरज असत नाही. कारण आत्मकथनातील व्यक्ती ह्या पात्रे नसून त्या वास्तवातील व्यक्तींच असतात. आत्मकथनाच्या या विशेषामुळे लेखक व्यक्तीच्या बाह्य वर्णनापेक्षा त्यांच्या वर्तनाचे, स्वभावांचे चित्रण करत असतात. लेखकाने पाहिलेली, अनुभवलेली लेखकाच्या नजरेतील व्यक्तींचे चित्रण यातून होत असते.

प्रस्तुतच्या आत्मकथनातून ताराच्या आई, वडील, मामा, कोल्हापुरातील मामी अशा काही ठळक व्यक्ती येतात. पण या सर्व व्यक्तींचे बाह्य वर्णने येत नाहीत. मात्र त्यांच्या स्वभावाचे विशेष त्या नोंदवितात. व्यक्ती म्हणून त्यांच्याठिकाणी असणाऱ्या सामर्थ्याचे व त्यांच्यातील थिटेपणाचे चित्रण होते. व्यक्ती-व्यक्तीतील संभाषण आणि खुद्द निवेदकाचे घडणाऱ्या घटनांवरील चिंतन यातून इतर व्यक्तींची स्वभावचित्रे यातून उभी राहतात. आईचे संपूर्ण आत्मकथनातून येणारे चित्र हे खूप कष्ट करणारी, पुरुषसत्ताक कुटुंबपद्धतीत नव-याचे सर्व ऐकणारी, सहन करणारी, नव-याच्या मृत्यूनंतर सर्व कुटुंबाला विशेषतः मुलींना जपत वाढवणारी, देवधर्माचे काटेकोरपणे करणारी, शिवाशिव बाळगणारी अशी येते. तर वडिलांचे चित्रण हे तुटक येते. त्यांचा विशिष्ट पोशाख, कुटुंबाचा सर्वेसर्वा म्हणून असलेला सत्ताधारी, लोभापायी गुन्हा केलेला बाप असा नकारात्मतेचा सूर या चित्रणाला आलेला आहे.

सबंध आत्मकथनामध्ये ताराच्या बालपणीच्या अनेक मैत्रिणींचे चित्रण येते. तसेच जिच्या मैत्रीखातर चोरी करण्यासही तयार होणा-या ताराच्या मैत्रिणीचे व तिच्या आईचे वर्णन येते. स्वकष्टाने कुटुंब चालवणा-या कष्टकरी अनेक स्त्रियांची चित्रणे त्यांच्या वर्णनातून उभी राहतात. त्यातील हरी ओम ही विशेष लक्षात राहणारी स्त्री. अशा अनेक व्यक्तींची चित्रणे या आत्मकथनातून आलेली आहेत.

**ब. वर्णनशैलीः**

वर्णनपरता हा आत्मकथनाचा आणखी एक महत्त्वाचा विशेष होय. आत्मकथनातील कथनकर्त्याच्या आयुष्यात घडलेल्या घटनांची वर्णने ही वाचकाच्या मनात एक भान निर्माण करणारा घटक. हे भान तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे, त्या व्यक्तीने जगलेल्या काळाचे असते. त्यामुळे आत्मकथनातून मांडलेल्या जीवनाचे, त्यातील दुःखपरतेचे, लेखकाच्या निरंतर संघर्षाचे नेमके मोल वाचकाला कळत असते. प्रस्तुत आत्मकथनामध्येही वर्णनपरता हा एक महत्त्वाचा वाङ्मयीन विशेष आहे.

प्रसंग नेमकेपणाने उभे करण्याची हातोटी लेखिकेच्या लेखनात आहे. वर्णनपरता हे त्यांच्या शैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बालमनावर परिणाम करणा-या शाळेची अनेक वर्णने

आत्मकथनात येतात. त्यातील चौथीनंतर नरसोबाच्या देवळात भरणा-या शाळेचे वर्णन येते. “ती शाळा कधी शाळा वाटायची नाही. देवळातल्या गर्दीचा कोलाहल, वाजणा-या पीपाण्या, शिट्या, देवळात सतत वाजवली जाणारी घंटा कानावर आदळायची. लक्ष शाळेतल्या शिकवण्यापेक्षाही बाहेरच लागलेलं असायचं. शिवाय तिथंच बाजूला जनावरांचा सरकारी दवाखाना होता. एखादी म्हैस किंवा बैल सदा तिथं हंबरडा फोडत राहिलेला असायचा.” (पृ.२१६) हे वर्णन ज्या ठिकाणी शाळा भरायची तिथल्या आवाजी जगासहीत उभे राहते. विविध प्रकारचे लहान, मोठे आवाज आणि अशा परिसरात शिकवली जाणारी शाळा या दोन्ही विरोधात्मक गोष्टींची जाणीव वाचकाला झाल्याशिवाय राहत नाही.

बालपणातील अनेक प्रसंगांचे चित्र वाचकाच्या मनात तंतोतंत उभे करण्यासाठी त्या वर्णनपरतेचा अवलंब करतात. बालपणातील घटनेकडे बघतानाच्या भावना या तितक्याच निरागस असू शकतात याचे चित्रण त्यांच्या या वर्णनातून येते. हे वर्णन बालपणातील आहे. पण संबंधित घटनेचा अर्थ मोठेपणीच्या लेखिकेचा आहे. त्यामुळे ती घटना वर्णन करून झाल्यानंतर लेखिका त्याबद्दलचा आपला विचार व्यक्त करते. म्हणूनच परदेशातून आलेल्या मामांच्या खिशातील पंचवीस रुपये ऐवजी पाचशे रुपये चोरणारी निरागस तारा आणि ते पैसे चोरण्यामागचा तिचा उद्देश वाचकाला निरागस वाटतो. काही वेळांनी मामांच्या खिशातील पंचवीस रुपयाऐवजी पाचशे रुपये चोरी झाले हे कळताच घाबरलेली तारा वाचकासमोर उभी राहते. कारण वाचकाला तिच्या या कृतीमागच्या गोष्टी आधीच माहीत झालेल्या असतात. पण ज्या व्यक्तीला (मैत्रिणीच्या आईला) हे पैसे नेऊन दिले त्या व्यक्तीला पंचवीस आणि पाचशे यातील नेमका फरक माहीत असूनही खोटेपणाने तिने तो न सांगणे यावरचे भाष्य वयाने मोठे असणारी लेखिका करते. तिथे तिचे हे म्हणणे वाचकाला योग्यच वाटते.

त्यांनी आत्मकथनातून वर्णन केलेल्या व्यक्तीचे चेहरे आपल्याला ठळकपणे लक्षात येत नाहीत. कारण कथनकर्त्या फक्त काही ठिकाणीच व्यक्तीचे वर्णन करताना दिसते. उदा. “विटकं धोतर, मळलेला कोपऱ्यावर फाटलेला शर्ट, पायात अंगठा तुटलेली चप्पल, डोळ्यांवर चष्मा आणि मळक्या टोपीतून बाहेर झेपावलेले पांढरे शुभ्र पिंजारलेले अस्ताव्यस्त केस! अंगठा तुटलेल्या चपलेमुळं की वृद्धत्वामुळं कोण जाणे, पण तो एक पाय ओढत होता. अंगण ओलांडून आत यायला त्याला किती तरी वेळ लागला.” (पृ. २३१) असे वर्णन लेखिकेच्या घरी पूर्वी कामाला येणा-या शंकरचे येते. लेखिकेने तरुणपणातला बघितलेला शंकर आणि आता म्हातारपणाने रया गेलेला शंकर यातील तफावत अधिक ठळक करणारे हे वर्णन आहे. असेच रुकडीच्या घरात भाड्याने राहणाऱ्या एका विधवा बाईचे वर्णन लेखिका करतात. “काळी सावळी... उंच... छान मोठा आंबाडा... ओचा खोचलेली, नीटनेटकी स्वच्छ नऊवारी साडी आणि गळ्यात अडकवलेली मोठी शबनम पिशवी... अतिशय शुद्ध आणि चांगलं बोलायची ती. डोक्यावरून पदर न घेता दोन्ही खांद्यावरून घ्यायची. नेहमी मनगटापर्यंतचा ब्लाऊज घालायची. एखाद्या सुशिक्षित ब्राह्मण बाईसारखी दिसायची.” (पृ. २४५) असे वर्णन येते. अशी मोजकीच व्यक्तीवर्णने येतात. यावरून दिसते की, प्रसंगवर्णनावर त्यांचा अधिक भर आहे पण व्यक्तीवर्णनाला त्या बगल देतात. पण त्यांच्या स्वभावाचे दर्शन मात्र त्या या वर्णनातून घडवून आणतात. चेहरा कुठलाही असू शकतो पण एकाच स्वभाव-प्रवृत्तीची माणसे कुठेही आणि केव्हाही भेटू शकतात याचे एक सार्वजनिक तत्त्व त्यांच्या या शैलीतून दृश्यांकीत होते. तसेच

आत्मकथनातून येणाऱ्या व्यक्ती ह्या खऱ्या वास्तव जगतातील व्यक्ती असल्याने त्यांचे वर्णन इथे येत नाही. कथा, कादंबऱ्यांमध्ये येणाऱ्या व्यक्ती ह्या काल्पनिक असल्याने त्यांच्या बाह्य रूपाचे वर्णन केल्याशिवाय ती व्यक्तिरेखा वाचकाच्या मनात उभी राहू शकत नाही. त्यांचे आयुष्य हे त्या कलाकृतीपुरतेच मर्यादित असते. त्यामुळे व्यक्तींच्या बाह्य वर्णनापेक्षा त्या व्यक्तींसोबतचे सहजीवन, अनुभव व त्यांचे वर्तन –स्वभाव लेखिका इथे कथन करतात.

आत्मकथनात येणारे प्रसंग हे एकरेषीय नाहीत. निवेदक आपल्या सोयीनुसार काळाच्या मागे पुढे जात संदर्भानुसार प्रसंगांचे चित्र काहीवेळा रेखाटतो. त्यामुळे थोडा विस्कळीतपणा येत असला तरी एकाच संदर्भाने येणाऱ्या घटना त्या वर्णन करतात.

**क) प्रवाही  निवेदनः**

आत्मकथनातील निवेदन हे नेहमी प्रथमपुरुषी असते. कथनकर्त्याच्या आयुष्यात घडलेल्या घटनांचे चित्रण तो स्वतःच्याच भाषेत करत असतो. त्या घटनांचा तो स्वतः साक्षीदार असतो. काही कथनकर्ता दुस-या एखाद्या पात्राची योजना आत्मकथनात करत असतो. आणि ते पात्र लेखकाचे जीवन आत्मकथनातून मांडत असतो. जसे 'बलुतं' मध्ये दया पवार यांनी दगडू हे पात्र योजिलेले आहे. दगडू हे एक वाङ्मयीन पात्र मानले जाते. तसेच 'जसं घडलं तसं' या आत्मकथनातील वर्तमानातील लेखिका नीलम माणगावे असली तरी लहानपणापासूनचा प्रवास करणारी ती ताराबाई उर्फ तारा आहे. हे लेखिकेचे लहानपणाचे नाव आहे. त्यामुळे लेखिकेच्या बालपणातील कथन वयाने लहान असणारी तारा करते. बाल सुलभ मनाची आकलन क्षमता ध्यानात घेऊन हे आत्मनिवेदन तारा करताना दिसते. त्याचे काही नमुने आपल्याला इथे पाहायला मिळतील.

ताराची आई, गाव आणि घर सोडून जात नाही म्हणून काही गावकऱ्यांनी आईला मारण्यासाठी नरंदे गावच्या भंडारी नावाच्या गुंडाला सुपारी दिलेली असते. पण, "मर्द गडी असता तर एका सपाट्यात भुईसपाट केला असता. पण एका बाईवर-आणि तेही एका विधवेवर मी हात टाकणार नाही." असे म्हणून तो कधी हल्ला करत नाही. हे सर्व गावभर झाल्यानंतर आईलाही कळते. तेव्हा आई या लोकांच्या प्रवृत्तीचे वर्णन, "बगळ्यात लपल्याली ही कावळं हाईत." (पृ. ९९) या शब्दात करते. असे निवेदनाचे काही प्रभावी नमुने आत्मकथनात दिसतात. त्यांच्या अशा या शैलीमुळे लेखन प्रवाही व आकर्षक झाले आहे. आत्मकथानातील अनेक भावूक प्रसंगांचे वर्णन अत्यंत संयमी पद्धतीने केलेले आहे. ज्या व्यक्तींमुळे आयुष्यात अनेक दुःखाचे प्रसंग आले त्यांच्याबद्दल कोणतीही कटुता न दर्शविता संयमीपणे केवळ कथन करून नेमकी असलेली परिस्थिती मांडण्याचा प्रयत्न लेखिका करते. दुसऱ्याच्या दु:खाबद्दल सहानुकंपा असल्यामुळेच अनेक स्त्रियांच्या दु:खाची, त्यांच्या संघर्षाची कहाणी कथन होताना दिसते. बालपणातील ताराचे भावविश्व, तिचा भवताल व त्यात तिच्या होणाऱ्या मनाची अवस्था अत्यंत तरलपणे कथन होते. ताराच्या आजारी दोन मैत्रिणींचा मृत्यू, पैसे चोरल्याची घटना अशा अनेक घटना प्रसंगातून बालसुलाभतेचा विचार करून निवेदन झालेले दिसते.

munotes.in

**ड. वाक्प्रचार, म्हणींचा वापरः**

निवेदन प्रवाही होण्यामध्ये ज्या भाषिक सामर्थ्यांचा उल्लेख करता येईल त्यामध्ये वाक्प्रचार आणि म्हणींचा निवेदनातील वापर ही महत्त्वाची गोष्ट आहे. कोल्हापूर, रुकडी व तिथला आसपासचा भाग हा निमशहरी आणि बराचसा ग्रामीण आहे. त्यामुळे त्या त्या प्रदेशातील व्यक्तींचे चित्रण होत असताना त्यांच्या तोंडच्या भाषिक लकबी निवेदनामध्ये-संवादामध्ये येताना दिसतात. लेखिका या शैलीचा अवलंब अत्यंत प्रभावीपणे करतात.

स्त्रियांच्या भाषेचे वैशिष्ट्य म्हणजे महत्त्वपूर्ण आशय थोडक्याच शब्दात बोलण्यासाठी म्हणी, वाक्प्रचारांचा वापर करत असतात. आत्मकथनातून येणाऱ्या अनेक व्यक्तींच्या तोंडी ही वाक्प्रचार व म्हणीयुक्त भाषा दिसते. विशेषतः ताराच्या आईच्या तोंडात येणाऱ्या विविध म्हणींचा उल्लेख लेखिकेने आईच्या संवादादरम्यान केला आहे. 1. 'तू म्हणजे खायला आधी, झोपायला मधी, कामाला कधी?', 2. 'भटाला दिली वसरी आणि भट हातपाय पसरी'(७८), 'लोकाचं घर थुकीचं डर, आपलं घर हागून भर' (९६), 'काळजाला लाज नाही आणि तळपायाला शिसारी नाही' (९८), 'कळतं पण वळत नाही.' (१०४), 'नालेसाठी घोडा घेणे' (२३४) अशा अनेक म्हणी ह्या आईच्या तोंडून येतात. सामाजिक वास्तव आणि महत्त्वपूर्ण आशय थोडक्यात व्यक्त करणा-या या म्हणी व वाक्प्रचारांचा वापर लेखिकेच्या वाङ्मयीन शैलीचे विशेष आहे.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न: तुमच्या वाचनात आलेल्या कोणत्याही स्त्री लिखित आत्मकथनाचे विशेष नोंदवा.

## ३.८ सारांश

आत्मचरित्र, आत्मकथन हे एकाच वेळी कलाकृतीही असते आणि इतिहासही असतो. आत्मचरित्रात किंवा आत्मकथनात येणारा इतिहास हा एका व्यक्तीच्या जीवनाचा पट मांडणारा असतो. लेखकाच्या सबंध आयुष्याचा पट यामध्ये येत नसला तरी लेखकाला महत्त्वाच्या वाटणा-या प्रसंगांचे, घटनांचे वर्णन यामध्ये आलेले असते. प्रवासवर्णन, रोजनिशी, वृत्तांतलेखनाप्रमाणे घटनांचे एकसलग लेखनाचे स्वरूप त्याला असतेच असे नाही. तर गुणात्मकदृष्ट्या आणि विशिष्ट संदर्भांच्या अनुषंगाने यात इतिहासाची मांडणी असते. एक विशिष्ट काळ आणि त्या काळातील प्रभावक्षेत्रेही त्यातून सहजगत्या आविष्कृत होत असतात. म्हणजे काही सामाजिक परंपरा, प्रथा, संस्कृती, राहणीमानाच्या पद्धतीचे

वैशिष्ट्यत्व ठराविक काळातच अधिक गडद दिसत असते. जसे सतिप्रथा आणि तिच्या प्राबल्याचा काळ आताच्या काळापेक्षा वेगळा होता हे आपल्या सहज लक्षात येते. हे ठळक उदाहरण सोडले असता काळाच्या अनेक बारीक सारीक छटांवरूनही काळाचे नेमके भान यातून येऊ शकते. 'जसं घडलं तसं' या आत्मकथनातूनही विशिष्ट काळाची प्रचिती येते. उदा. कॉलेजला जाताना मुलींचे साडी नेसून जाणे, अख्ख्या कॉलेजमध्ये एखाद-दुसऱ्याच मुलीने जिन्स-शर्ट सारखे कपडे वापरणे. या राहणीमान पद्धतीतूनही तो काळ आपल्या नजरेसमोर उभा राहतो. या काळातील स्त्री जीवनाचा पट या आत्मकथनातून येतो. शिक्षित, अशिक्षित, ग्रामीण-शहरी भागातील, विधवा, परितक्त्या, धार्मिक, सामाजिक बंधनाखाली दडपलेल्या, पुरुषसत्ताकतेच्या दबावात जीवन कंठणा-या अशा अनेक स्त्रियांच्या जगण्याचे संदर्भ या आत्मकथनातून येतात. त्यामुळे या आत्मकथनाचे वैशिष्टय म्हणजे या तत्कालीन स्त्रियांचा सामाजिक दर्जा काय होता याचा अंदाज यातून बांधता येऊ शकतो. तसेच लेखिकेच्या विशिष्ट लेखनशैलीमुळे आत्मकथन अधिक वाचनीय होण्यास मदत झाली आहे. ग्रामीण व्यक्तिरेखा उभ्या करण्यासाठी संवादातून ग्रामीण भाषारूपाचा अवलंब, व्यक्तिचित्रण, प्रसंगवर्णन व प्रवाही निवेदनामुळे ही लेखनशैली घडलेली आहे. काळाचे भान देणारे व विशिष्ट लेखनशैलीमुळे स्त्रियांच्या आत्मकथन लेखनपरंपरेमध्ये हे आत्मकथन खूप मोलाचे ठरते.

## ३.९ संदर्भ ग्रंथ


१. माणगावे, नीलमः 'जसं घडलं तसं', शशीकिरण प्रकाशन, कोल्हापूर. प.आ.2005

२. राजाध्यक्ष, विजया (संपा) : मराठी वाङ्मयकोश', खंड चौथा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, २००८ मुंबई.


## ३.१० पूरक वाचन


१. 'सांगते ऐका'- हंसा वाडकर

२. 'मला उद्ध्वस्त व्हायचंय'-मलिका अमर शेख

३. 'नाच ग घुमा'- माधवी देसाई

४. 'भोगले जे दुःख त्याला...' -आशा अपराद

५. 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ'-प्रतिमा प्रकाशन, पुणे, प.आ.१९८९-डॉ.अंजली सोमण

६. 'उत्तरशक्ती की हिन्दी-मराठी स्त्री आत्मकथा'-डॉ.आरिफा गालिब शेख


## ३.११ संभाव्य प्रश्न

### अ) दीर्घोतरी प्रश्न

१. नीलम माणगावे यांच्या आत्मकथनातून येणा-या आईच्या संघर्षाचे चित्रण तुमच्या शब्दात मांडा.

२. 'जसं घडलं तसं' या आत्मकथनातून व्यक्त झालेली सामाजिक परिस्थिती आणि स्त्री जीवनाचा पट परस्पर संबंध स्पष्ट करा.

३. 'जसं घडलं तसं' मधील अनुभवविश्व तुमच्या शब्दात नोंदवा.

**ब) टीपा लिहा.**

१. लेखिकेचे बालपण

२. आत्मकथनाची भाषिक वैशिष्ट्ये

३. जात धर्मातून येणाऱ्या शिवाशिवीचे चित्रण

४. जसं घडलं तसं' मधील तारा

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. लेखिका नीलम माणगावे यांच्या बालपणीचे नाव काय?

२. कशाच्या साथीमुळे लेखिकेच्या वाड्यातील शंभर माणसे मरण पावतात?

३. रोघोबा पाटलांच्या दोन मुलांची नावे काय होती?

४. रुक्मिणीबाई विधवा झाल्यानंतरचे आयुष्य कोठे व्यतीत करतात?

५. रुक्मिणीबाई ज्यांना दत्तक घेतात त्या मुलाचे नाव काय?

❖❖❖❖

munotes.in

## नमुना प्रश्नपत्रिका
## द्वितीय वर्ष कला
## सत्र-IV, मराठी अभ्यासपत्रिका क्र. II

**सूचना:**

१. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

३. प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात

प्रश्न १. आत्मकथन या साहित्यप्रकाराचे स्वरुप, वैशिष्ट्ये स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

आत्मकथन या साहित्यप्रकाराचे घटक व वैशिष्टे सांगून मराठीतील पाच आत्मकथनांची नावे सांगा.

प्रश्न २. 'मन में है विश्वास' या आत्मकथनाचा आशय स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

'मन में है विश्वास' मधील नायकाच्या संघर्षाचे स्वरूप स्पष्ट करा.

प्रश्न ३. 'जसं घडलं तसं' या आत्मकथनातून व्यक्त झालेली सामाजिक परिस्थिती आणि स्त्री जीवनाचा पट परस्पर संबंध स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

'जसं घडलं तसं' मधील अनुभवविश्व तुमच्या शब्दात मांडा.

**प्रश्न ४. टिपा लिहा.** **(३०)**

अ) आत्मकथनातील स्वकथन

**किंवा**

आत्मकथन: एक साहित्यप्रकार

ब) 'मन में है विश्वास' मधील उपदेशाचे स्वरूप.

**किंवा**

'मन में है विश्वास' मधील गावचे वातावरण.

क) 'जसं घडलं तसं' आत्मकथनाची भाषिक वैशिष्ट्ये

**किंवा**

'जसं घडलं तसं' मधील तारा

munotes.in

प्रश्न ५. खालीलपैकी कोणतेही पाच प्रश्न सोडवा. **(१०)**

अ) ——— आत्मकथनामध्ये अशोक पवार यांनी स्वत:च्या समाजाच्या व्यथा, वेदनांसोबतच इतर समाजाच्या व्यथा, वेदना मांडल्या आहेत.

ब) यशवंतराव गडाख यांच्या आत्मचारित्राचे नाव ......................आहे.

क) कोणाच्या व्याख्यानानंतर विश्वास नांगरे-पाटील स्पर्धा परीक्षा द्यायचा निर्णय घेतो?

ड) एम. ए. करण्यासाठी लेखक विश्वास नांगरे-पाटील कोणते शहर निवडतो?

इ) लेखिका नीलम माणगावे यांच्या बालपणीचे नाव काय?

ई) नरसिंह वाडीवर गेल्यानंतर परीक्षेचा निकाल लागत नाही तोपर्यंत विश्वास नांगरे-पाटील आपली कोणती आवडती गोष्ट वर्ज्य करतो?

उ) 'जसं घडलं तसं' या आत्मकथनातील रुक्मिणीबाई विधवा झाल्यानंतरचे आयुष्य कोठे व्यतीत करतात?

ऊ) कशाच्या साथीमुळे लेखिका नीलम माणगावे यांच्या वाड्यातील शंभर माणसे मरण पावतात?

❖❖❖❖

munotes.in